# पश्चिमेचें अपादवृति

द्वा. भ. कर्णिक

म. ग्रं. सं. ठाणें
विषय भू-प्रवास
सं. क्र. २५८६

REFBK 0010786
REFBK-0010786

स्था० १९५८

स्वीकृत
अनुक्रम २६४५१ वि. भू-प्रवास
क्रमांक ... २५८० ... नौं० दि० २४/३/५०



# पश्चिमेचें क्षणदर्शन


क्र. १०८०६६
द्वारकानाथ यशवंत कर्णिक

ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
२५८४१ दि: २२-५-९१/३१
९६८ नों: दि: २८/३/६०
२५६

REFBK-0010786



बहुरुपी प्रकाशन
९ सनी साइड, जिमखाना रोड, माटुंगा
मुंबई १९

© १९५९, द्वा. भ. कर्णिक

मुद्रक
वि. पु. भागवत
मौज प्रिंटिंग ब्यूरो
खटाववाडी
मुंबई ४

प्रकाशक
ह. वि. मोटे
ह. ग. गोडसे
९ सनी साइड
जिमखाना रोड
माटुंगा, मुंबई १९

# निवेदन

युरप व अमेरिका यांची गणना पाश्चिमात्य राष्ट्रांत होते. त्या राष्ट्रांना मी भेट दिली त्यावेळीं माझ्या मनांत ज्या भावना उचंबळून आल्या व तेथें मीं जें पाहिलें, ऐकलें व अनुभवलें त्याविषयीं माझ्या मनांत ज्या प्रतिक्रिया निर्माण झाल्या त्या या छोट्याशा प्रवासवर्णनांत मीं व्यक्त केल्या आहेत. अर्थात् पश्चिमेचें मला जें दर्शन घडलें जें अगदीं क्षणिक. पण त्या क्षणदर्शनानें सुद्धां माझ्या मनावर जे संस्कार घडविले त्यांचें वर्णन करण्याचा मोह मला अनावर वाटला. माझ्या दृष्टीनें पश्चिमेचें वैशिष्ट्य असेल तर हेंच होय.

ही लेखमाला मी प्रथम 'केसरी'साठीं लिहिली. ती आतां 'बहुरुपी प्रकाशन'नें पुस्तकरूपानें प्रकाशित करावयाचें ठरविलें आहे.

पश्चिमेला या क्षणदर्शनानें माझ्या मनावर एक विलक्षण ठसा उमटविला यांत संशय नाहीं. वस्तुतः मला तेथील देश नवीन वाटले नाहींत आणि अपरिचित तर मुळींच वाटले नाहींत. पण कथा, कादंबऱ्या, चित्रपट व इतिहासांतून तेथील लोकांच्या जीवनाचें व वागणुकीचें जें चित्र रेखाटण्यांत आलेलें आहे त्यापेक्षांहि मला तें जीवन अधिक हृदयंगम वाटलें. मला असें कां वाटलें तेंच या छोट्याशा पुस्तकांत आपल्याला पहावयाला सांपडेल.

नवी दिल्ली
२१ सप्टेंबर १९५९

द्वा. भ. कर्णिक

मराठी ग्रंथ संग्रहालय
क्र. १०७८६

म्हटलें तर हें प्रवासवर्णन आहे. म्हटलें तर प्रवासांत जें पाहिलें, ऐकलें आणि अनुभवलें त्याचा हा वृत्तांत आहे. ज्या देशांत मीं प्रवास केला ते देश ही माझ्या दृष्टीनें एक स्वप्नसृष्टि होती. ती स्वप्नसृष्टि प्रत्यक्षपणें अवतरलेली आपल्याला दिसेल असें मला कधींच वाटलें नव्हतें. युरोपचा प्रवास ही कॉलेजांतील दिवसांतील प्रत्येकाचीच महत्त्वाकांक्षा! ती ज्यांना साध्य होई त्यांना आम्ही भाग्यवंत मानीत असूं. आम्हीही योजना करीत असूं. कल्पना सुंदर आणि धाडसी. म्हणजे अनेक लोकांकडून लहानमोठ्या रकमा जमवीत प्रवास करण्याच्या किंवा रानोमाळ तुडवीत पायीं जाण्याच्या, दोन्हीहि

## ऐकलें, पाहिलें, अनुभवलें त्याचा वृत्तांत–

योजना स्वप्नरंजनासारख्याच ठरत. पण त्या योजनांमुळें युरोपची भूमि अगदीं निकट असल्यासारखी—मनोमनीं साठवून ठेवावी तशी—भासत असे.

म्हणून युरोपला जाण्याची संधि आली तरी माझा स्वतःचा त्यावर विश्वाससुद्धां बसेना. क्षणोक्षणीं मनांत विचार येई, "खरोखरच का हें भाग्य आपल्या वांट्याला येणार आहे?" हा संदेह प्रत्यक्ष विमानांत बसेपर्यंत टिकला, एवढेंच नव्हे तर "कमरपट्टा कसून बांधा" आणि "धूम्रपान करूं नका" या पाट्या लाल प्रकाशांत चमकूं लागून विमान आकाशांत घिरट्या घालूं लागल्यानंतरहि माझें मन प्रश्न करीत राहिलें, "खरेंच का आपण युरोप पाहणार?"

युरोपची ही ओढ अवर्णनीय खरी. खुद्द युरोपमधील लोकांनाहि त्याचें आश्चर्य वाटतें. सर्वसाधारणपणें हिंदुस्थानांतील सुशिक्षित वर्गाला युरोपचें जें ज्ञान असतें त्याचेंहि त्यांना आश्चर्य वाटतें. त्यांना काय सांगणार? हिंदुस्थान आज स्वतंत्र आहे. त्या स्वतंत्र देशाचे नागरिक म्हणूनच युरोपमधील

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत
अनुक्रम ............ वि: ................
क्रमांक ........................ नों: दि: ................

लोक आपलें स्वागत करतात. पण फक्त दहाच वर्षांपूर्वी हिंदुस्थान हा परतंत्र होता, ब्रिटिश साम्राज्याचा एक भाग होता ही जाणीव त्यांना करून देण्यांत काय अर्थ ? त्यांना आश्चर्य वाटतें तें युरोपबद्दलच्या आपल्या ज्ञानाचें. युरोपबद्दल आपल्याला वाटणाऱ्या कुतूहलाचें. तें आश्चर्य तसेंच राहूं द्या कीं. हिंदुस्थानचा राष्ट्रीय दर्जा त्यामुळें जर वाढत असेल तर आपल्या परतंत्र जीवनाची कहाणी जाणूनबुजून कां सांगा ?

मात्र आपल्या मनाशीं आपण खूणगांठ बांधून ठेवली पाहिजे कीं जगाशीं आपला जो संबंध राहिला आहे तो इंग्रजी भाषेमुळें. ब्रिटिश राजवटीनें आपल्याला पारतंत्र्यांत ठेवलें खरें. पण या संबंधामुळें युरोपीय संस्कृतीचें आपल्याला ज्ञान झालें, युरोपच्या इतिहासाचेंच नव्हे तर त्यांतील निरनिराळ्या भाषांचें आलोडन करण्याची आपल्याला संधि मिळाली आणि विशेषतः औद्योगिक जीवन व संस्कृति यांतून येणारा एक नवीन दृष्टिकोन आपल्याला प्राप्त झाला.

युरोपच्या निरनिराळ्या भागांतील लोक मला नेहमीं प्रश्न करीत, "तुम्ही इतकें चांगलें इंग्रजी कसें बोलूं शकतां ?"

माझ्या तोंडावर उत्तर येई, "दीडशें वर्षांच्या ब्रिटिश राजवटीमुळें."

पण मी उलट कौतुकानें म्हणें,

"आमच्याकडे लहान मुलेंसुद्धां इंग्रजी भाषा बोलूं शकतात."

इंग्रजी भाषेचा वारसा आपल्या देशाला किती उपकारक होणार आहे त्याची कल्पना परदेशांत गेल्यानंतरच मला अधिक आली. वस्तुतः इंग्रजीखेरीज आणखी एका युरोपीय भाषेचेंहि ज्ञान आपल्याला व्हावयास पाहिजे. त्या दृष्टीनें लहानपणापासूनच मुलांच्या मनावर ही गोष्ट बिंबवली गेली पाहिजे. कारण, त्याशिवाय सुसंस्कृत जगाशीं आपलें योग्य तें दळणवळण राहणार नाहीं. इंग्रजी भाषा आत्मसात् केल्यानंतर दुसरी युरोपीय भाषा शिकणें तितकें जडहि जाणार नाहीं.

युरोपमध्यें अनेक लोक निरनिराळ्या युरोपीय भाषा अस्खलितपणें बोलत असल्याचें मला आढळून आलें. उदाहरणार्थ, झुरिकच्या विमानतळावर मी उतरलों आणि तेथील उपाहारगृहाच्या आवारांत नुसती एक फेरी मारल्या-बरोबर मला कळून आलें कीं येथें फ्रेंच आणि इटालियन आणि स्पॅनिश या तिन्ही भाषा सारख्याच सहजतेनें कित्येक माणसें बोलूं शकतात. स्वित्झर्लंड हा लहानसाच देश. फार तर पन्नास लाख लोकांचा; पण त्यांतील एक भाग पूर्णपणें फ्रेंच बोलणारा, दुसरा भाग पूर्णपणें इटालियन बोलणारा व तिसऱ्या भागांत स्पॅनिश भाषा रूढ आहे. ही विभिन्नता इतकी हाडींमाशीं खिळलेली कीं, स्वित्झर्लंडमध्यें कांहीं वर्तमानपत्रें फ्रेंच भाषेंत निघतात तर कांहीं इटालियन भाषेंत निघतात. पण सुशिक्षित वर्ग दोन्हीहि प्रकारचीं वर्तमानपत्रें वाचूं शकतो.

झुरिकची आठवण झाली कीं विमानांतून त्या भू-प्रदेशाचें प्रथम जें दर्शन झालें त्या वेळच्या भावनांचें मला स्मरण होतें. एअर इंडिया इंटरनॅशनलच्या वैभवशाली—आणि काय म्हणूं ?—राजबिंड्या—विमानांत मी बसलों त्या वेळीं मला माहीत होतें कीं युरोप आणि आपण यांत फक्त एकच टप्पा आहे. तो म्हणजे कायरोचा. एकच टप्पा; पण थोडाथोडका नाहीं—जवळजवळ तीन साडेतीन हजार मैलांचा. पण आधुनिक जगांत अंतर तोडावयाला किती थोडा वेळ लागतो, नाहीं ? मुंबईच्या विमानतळावरून निघतांना विमानांतील परिचारिकेनें (ती परिचारिकाहि असते, यजमानीण असते आणि सोबतीणहि होते) आपल्या संथ पण मंजुळ आवाजांत जाहीर केलें कीं, "आतां आपला पहिला मुक्काम तीन हजार आणि कांहींशें मैलांवर कायरो येथें होणार आहे." तीन हजार?—आणि कालावधि किती, तर फक्त नऊ तास. नऊ तास कोठें आणि कसे जातात हेंहि कळत नाहीं. लेमनची एखादी दुसरी गोळी चघळीत असतांनाच विमान उंच उंच ढगांवर आरूढ झालेलेंहि आढळून येतें आणि मग पुढेंहि फक्त संथ लयदार आवाज, पंख्यांच्या घरघरीचा; आणि

विमानांतील इंजिनच्या बाजूच्या खिडक्यांतून खालीं पाहावें, तर अथांग सागर पसरलेला; पण खोलवर दिसणाऱ्या त्या पाण्यांत लाटा जणूं नाहींतच. एखाद्या तळ्यांत टपटप पावसाचे थेंब पडत असले म्हणजे जी पाण्याची खळबळ उडावी तसेंच सागराचें रूप दिसतें. कधीं कधीं ढगांनीं खूपच दाटी केली तर सागराचें दर्शनहि होत नाहीं. मग सारें आकाश म्हणजे नुसता पिंजलेला कापूस. आकाश म्हणजे केवढी आणि कशी पोकळी आहे याचा प्रत्यय याच वेळीं येतो आणि दिङ्मूढ होऊन त्या पोकळीकडे पाहत असतांना आपल्या नजरेला पडतो तो विमानाचा एक पंख आणि त्या पंखावर लुकलुक-णारा एकच दिवा.

तुम्ही म्हणाल, झुरिकपर्यंत आम्ही गेलों आणि झुरिकचें प्रथमदर्शन कसें भासलें त्याचें वर्णन आतां आम्हांला ऐकावयास मिळावयास हवें. खरें आहे तें. पण असे अधीर होऊं नका! हजारों मैलांचा हा प्रवास. त्या प्रवासांत विमान जसें सुसूत्रपणें, नाकासमोर जातें तसेंच मनहि थोडेंच जाणार आहे? तें उसळी मारून, मागेंपुढें हजारों मैलांचें अंतर एका क्षणांतच काटतें. त्या मनावर हा पामर जीव कसा ताबा ठेवूं शकेल? म्हणून एकसूत्रीपणाचा त्याला बांध घालूं नका. मन मानेल तशा त्याला चकरा घालूं द्या.

तर काय सांगत होतों? आतां आपण कायरोच्या वाटेवर आहों. फक्त नऊ तासांचा प्रवास आणि आपण पिरॅमिड्सच्या-नासर यांच्या देशांत पोचूं. ती भावना सुद्धां मला त्या वेळीं किती सुखद वाटली. होय—एक महत्त्वाची गोष्ट सांगावयाची विसरलोंच. त्या दिवशीं आमच्याच विमानानें श्री. कृष्ण मेनन हे लंडनचा प्रवास करीत होते. म्हणजे भारताचें परराष्ट्रीय राजकारणच जणुं आमच्या बरोबर धावत होतें. त्यामुळेंच कायरो आणि पिरॅमिड्स् यांच्या जोडीलाच प्रेसिडेंट नासर यांच्या आठवणींनींहि माझ्या मनांत गर्दी केली. त्या विचारांत गर्क असतांनाच मला केव्हां डुलकी लागली कोण जाणे! पण मी माझ्या साखरझोपेंतून जागा झालों तो परिचारिकेच्या मंजुळ घोषणेनें.

ती म्हणत होती, 'आपण आतां कायरोच्या विमानतळापाशीं आलों आहों. कांहीं मिनिटांच्या आंत विमान तेथें उतरेल.'

मीं खिडकींतून बाहेर पाहिलें. कायरो शहरांतील असंख्य दिवे लखलखत होते. रात्रीच्या अंधारांत एखाद्या यक्षनगरीप्रमाणें तें शहर भासत होतें. क्षणाक्षणानें विमान खालीं जात होतें आणि सभोंवार घरें आणि निर्मनुष्य रस्तेसुद्धां आतां दिसूं लागले होते. रात्रीच्या वेळीं विमानांतून शहराची जी शोभा दिसते ती अपूर्व होय. एकतर सारें शहर दिव्यांनीं उजळलेलें दिसतें. आणि उंच आकाशांतून घरें कशीं टुमदार आणि रस्ते कसे रेखीव दिसतात. मधूनच त्या रस्त्यावरून एखादी मोटार डौलदारपणें निघून जाते त्याच वेळीं जीवनाचा स्पर्श त्या वातावरणाला होतो. नाहीं तर खेळांत मांडलेल्या चित्रविचित्र वस्तूंसारखेंच निर्जीव पण मनोरम असें तें शहर भासतें.

कायरोच्या विमानतळावर आमचें विमान थांबलें. नेहमींच तेथें अनेक विमानें येत असतील. पण आमच्या विमानांत श्री. कृष्ण मेनन होते. मीं खिडकींतून पाहिलें. अंधुकशा प्रकाशांत प्रे. नासर हे झपाट्यानें आपल्या विमानाकडे येत असलेले मला दिसले. त्यांच्या मागें थोडें अंतर ठेवून त्यांचे कांहीं सहकारी चालले होते. सभोंवार मुसलमानी गोंड्याच्या टोप्या घातलेले लोक हिंडत होते. अंधुक प्रकाशांत त्या उंच धिप्पाड मूर्ति सावल्यांसारख्याच मला भासत होत्या.

कायरोच्या विमानतळावर मला जें दृश्य दिसलें तें हिंदुस्थानपेक्षां निराळें नव्हतें. पण तेथील लोक अधिक काळे आणि अधिक धिप्पाड मात्र वाटले. बाकी स्वच्छतेच्या बाबतींत तेथील व्यवस्था हिंदुस्थानपेक्षां उणीदुणीच वाटली.

पण एक गोष्ट मला भासली—किंवा माझ्या मनांतील भावनांमुळेंहि मला वाटलें असेल—आणि ती म्हणजे तेथील लोकांच्या बोलण्यावागण्यांत दिसून

येणारा आत्मविश्वास. मीं जे लोक तेथें पाहिले त्यांच्या अंगावर वस्त्रें होतीं दीनवाणींच. आशिया खंडाचें मूर्तिमंत दारिद्रय तेथील प्रत्येक व्यक्तींत व वस्तूंत दिसून येत होतें. पण आपण स्वतंत्र आहोंत ही भावना मात्र त्यांच्या हृदयांत प्रस्फुरित झालेली मला तेथील अनेक लोकांशीं बोलत असतांना आढळून आली.

एका अधिकाऱ्याशीं माझें त्या थोडक्या काळांत जें बोलणें झालें तें हीच चुणूक प्रकट करणारें मला वाटलें. मीं त्याला विचारलें, "नासर यांच्या राजवटीचें मोठें कार्य कोणतें असें तुम्हांला वाटतें ?"

त्यानें क्षणभर माझ्याकडे पाहिलें आणि अस्खलित इंग्रजींत म्हटलें,

"ब्रिटिश साम्राज्यशक्तीला सुवेझ कालव्यांत दिलेली जलसमाधि."

"सुवेझचें राष्ट्रीयीकरण करणें हा तुम्ही राष्ट्रीयत्वाचा मानबिंदूच मानतां काय ?" मी पुन्हा प्रश्न केला.

"अर्थात्. इजिप्तच्या संपूर्ण स्वातंत्र्याची ही ग्वाहीच होय. आर्थिक दृष्टीनें त्याचे परिणाम कसेहि होवोत, पण प्रे. नासर यांनीं ब्रिटनला शह देऊन इजिप्तमध्यें जें चैतन्य आणि जो आत्मविश्वास निर्माण केला त्याला राष्ट्रीयत्वाच्या दृष्टीनें मोल नाहीं."

इजिप्तच्या राष्ट्रीय भावनाच या शब्दांत मला प्रकट झालेल्या दिसल्या. किती तीव्र, किती उत्कट आणि बेदरकार. इजिप्तच्या विमानतळावर तास-दीड तासच आम्ही असूं. पण अंधुकशा प्रकाशांत वेगानें जाणारी नासर यांची मूर्ति, त्यांना भेटण्यासाठीं संथपणें काठी टेकीत पायऱ्यांवरून उतरणारे श्री. कृष्ण मेनन, त्या दोघांची झालेली भेट आणि नंतरची बातचीत, विमानतळावर त्या अधिकाऱ्यानें काढलेले अभिमानीपणाचे उद्गार या सर्व गोष्टींचा मी जेव्हां विचारूं लागलों तेव्हां मला वाटलें, हा थोडकासा वेळ पण किती उद्बोधक आणि विचारप्रवर्तक ठरला !

विमानाची वाटचाल सुरू झाली. आतां परिचारिका बदलली होती, पण

तोच चमकदारपणा, तीच आदब, तेंच स्निग्ध, मंजुळ बोलणें. घड्याळाची बदललेली वेळ, आगामी प्रवासाचा कालावधि, कायरो ते झुरिकपर्यंतच्या प्रवासांत विमानाला गांठावी लागणारी उंची हें सर्व वर्णन तिनें किती मोजक्या शब्दांत केलें आणि आम्ही पुन्हा निद्रेच्या आधीन होत असतांना ती सकाळच्या न्याहारीच्या तयारीलाहि लागली.

कायरो ते झुरिक. आशिया खंड मागें टाकीत आम्ही झपाट्यानें युरोपच्या भूमीकडे चाललों होतों. मध्यें विशाल भूमध्य समुद्र जणूं अमर्यादपणाचा आव आणीत पसरला होता. मी डोळे उघडून पाहिलें. म्हटलें भूमध्य समुद्राचें दर्शन घ्यावें. पण आम्ही वीस हजार फूट उंचीवर होतों आणि त्या उंचीवर ढगांचे नुसते थरच्या थर पसरलेले होते. अनेक रंगाचे, असंख्य आकारांचे ढग. मीं खालीं पाहिलें तर काळ्या-पांढऱ्या-धुरकट ढगांनीं अथांग महासागर जणूं झांकूनच टाकला होता. पण वर मात्र बालसूर्याचे किरण चमकूं लागले होते. आकाश निळेंभोर दिसत होतें. आकाश किती अनंत आहे ह्याची साक्ष मला त्या दिवशीं पटली. पृथ्वीतलावरील लोकांना जें आकाश आतां नुसतें मेघमय दिसत असेल त्याच आकाशाच्या वरील पातळीवर किती मनोहर देखावा प्रकट झाला आहे. मेघमंडळानें सूर्याला ग्रासलें आहे. पामर मानवजीव म्हणत असेल : "अरे आज सूर्य उदयाला आला नाहीं;" पण अज्ञानाच्या हृदयांत शिरणाऱ्या त्याच मानवनिर्मित विमानानें बालरश्मीचा शोध घेतला—आणि हे पाहा. त्या रश्मीचे किरण मेघराशीचा भेद करीत सारें आसमंत उजळून काढीत आहेत. थोडयाच वेळांत हा बालसूर्य अधिक दीप्तिमान् होईल आणि आकाशाला झांकून टाकणारे मेघ त्या दीप्तीनें विरघळून जातील.

वीस हजार फूट उंचीवरून सूर्याचें होणारें प्रथमदर्शन अवर्णनीय आहे. भूमींतून फुटणारा कोवळा कोवळा कोंब. त्याचें वर्णन का कोणी करूं शकेल? डोळ्यांत सांठवून ठेवावयाचें तें सौंदर्य—तसाच आकाशांत उगवणारा

बालरवि. माझ्या दृष्टीला दिसत होतें तें निळें आकाश आणि त्यांत उगवतीला प्रकट होणाऱ्या रंगछटा—गुलाबाच्या फुलासारख्या मोहक, सुवर्णासारख्या रसरशीत, कांतिमान् कमल-फुलासारख्या नाजुक. मी पहात राहिलों त्या रंगछटांकडे एकदम दृष्टि लावून आणि कां कोण जाणे, माझ्या मनश्चक्षूंसमोर उभी राहिली ती बुद्धमूर्ति. विनम्र, उदात्त. बालरवीचें तें तेज मला बुद्धमूर्ती-सारखें शालीन पण प्रसन्न वाटलें.

माझी एकाग्रता फार काळ टिकली नाहीं. झुरिकच्या जवळपास आम्ही येत चाललों होतों. आतां हवा वादळी होऊं लागली होती. काळेभोर ढग वेगानें विमानावर आदळत होते. त्यांच्या आघातानें विमान हलूं लागलें, हिंदकळूं लागलें. लाल प्रकाशांत सूचना आली: "कमरपट्टे नीट कसून ठेवा." युरोपच्या हवामानाची ही पूर्वसूचनाच कीं काय? उन्हाळ्याचे हे दिवस आणि तरी वादळी हवा?

आल्प्स पर्वताचें सान्निध्य आतां आम्हांला भासूं लागलें होतें. विमानाची उंची कमी होत चालली होती. पांढऱ्या ढगांतून काळसर ढगांत, काळसर ढगांतून काळ्या ढगांत आम्ही हळूहळू खालीं उतरत होतों. माझी दृष्टि शोध घेत होती—भूमीचा—दुरावल्या भूमीचा. युरोपचें पहिलें दर्शन डोळ्यांत ठेवण्यासाठीं, मनश्चक्षूंवर कोरण्यासाठीं माझी धडपड चालली होती.

—आणि अकस्मात् ढग विरले आणि हिरव्यागार शेतांनीं आणि वन-राजींनीं आच्छादिलेली स्वित्झर्लंडची भूमि मला दिसली. झुरिक जवळ आलें होतें. आल्प्स पर्वतराजी दूरवर पसरलेली दिसत होती. त्या पर्वताच्या पायथ्याला असलेल्या लहानलहान टेकाडांवर हिरवींगार शेतें दिसत होतीं. मधूनच तुरळक तुरळक घरेंहि डोकावूं लागलीं होतीं. चोहोंबाजूंना कोठेंहि पहावें तों नुसतें हिरवेंगार दिसत होतें—पावसाळी दिवसांतील हवेप्रमाणें. जगाचें नंदनवन म्हणतात त्या स्वित्झर्लंडचें हेंच खरें रूप—सदैव प्रसन्न, हंसरें, पहांटेच्या वेळीं वातावरणांत घुमणाऱ्या भूपाळीच्या सुरांप्रमाणें मधुर.

स्वित्झर्लंडच्या निसर्गसुंदर वैभवाचा विचार करूं लागलें म्हणजे वाटतें, निसर्गानें आपली सारी उदारता येथेंच कां उधळून टाकावी? ना येथें उष्णता ना धूळ. हवामान जरा कोठें उष्ण झालें कीं पाऊस ठिबकलाच. मग भूमि सारी धुवून निघावयाची, वृक्षलतांच्या पालवीवर टपोरे थेंब चमकावयाचे आणि हातापायांतील सारा शीण नाहींसा होऊन व्यक्तीच्या अंगीं नवें बळ संचार करूं लागावयाचें. स्वित्झर्लंडच काय, पण युरोप–अमेरिकेच्या सर्वच भागांत निसर्गाच्या कृपेची खैरात झालेली आढळून येते. तेंच त्या देशांच्या समृद्धीचें मूळ आणि त्या देशांत स्फटिकासारखी स्वच्छता दिसून येते त्याचें तरी कारण तेंच होय.

स्वित्झर्लंडची आठवण झाली म्हणजे जिनीव्हाचें विशाल सरोवर नजरे-समोर येतें. जवळजवळ ऐंशीं मैल लांबवर तें पसरलेलें आहे आणि या सरोवराच्या कांठावरच स्वित्झर्लंडमधील कांहीं कांहीं रम्य शहरें वसलेलीं आहेत. तीं शहरें कसलीं? पर्वतराजीमधील हवेचीं ठिकाणेंच म्हणा ना. त्या शहरांतून खालीं पाहिलें कीं सरोवराचें निळें पाणी दिसतें, जरा वर दृष्टि टाकली कीं हिरव्यागार बागांचा विस्तार डोंगरमाथ्यापर्यंत पसरलेला दिसतो. त्यांची कड म्हणजेच हिमाच्छादित आल्प्स पर्वताचीं शिखरें होत. हिरव्यागार बागा अगदीं रेखीव. इतक्या रेखीव कीं द्राक्षांच्या बागेंतील झाडांची उंची-सुद्धां ठराविक. वाऱ्याच्या झोतानें झाडें लवलीं तरी तीं तुटूं नयेत म्हणून पिकांची उंचीसुद्धा तेथें मर्यादित ठेवण्यांत येते, पण मुबलक पाणी, खत आणि मशागत यांची उणीव न पडल्यामुळें तेथील शिवारांत जें धान्य दिसतें तें कसें पिवळेंधमक आणि कसदार.

युरोप-अमेरिकेचें वैशिष्ट्यच हें आहे कीं तेथें उद्योगधंद्यांची वेसुमार वाढ होत आहे. नवीन नवीन यंत्रसामुग्रीच्या साहाय्यानें तेथें मानवी कष्ट कमी करतांना उत्पादनाचें प्रमाण अफाट प्रमाणावर वाढविण्यांत येत आहे. पण त्याच वेळीं शेतीकडे मात्र त्यांच्याकडून दुर्लक्ष होत नाहीं. उलट आपल्या

उपजीविकेचें एक मुख्य साधन म्हणून शेतीच्या व्यवसायाची जास्तींत जास्त भरभराट व्हावी म्हणून त्यांचे प्रयत्न चाललेले दिसत आहेत. युरोपमधील कोणत्याहि देशांत जा, तेथें शहराची हद्द सोडली कीं, दृष्टीला पडतात तीं दृष्टि ठरणार नाहीं अशीं हिरवींगार आणि पिवळींधमक शिवारें. त्यांत धान्य पेरलेलें पहावें तें हारीनें. पिकें तयार झालीं कीं वाऱ्याच्या झोताबरोबर तीं हलतांना पहावीं. डोळे भरून येतात तें दृश्य पाहून. शेतांत कोठेंहि दृष्टि टाकली कीं शेतकरी आपल्या कामांत व्यग्र असलेले दिसतात. कोठें ट्रॅक्टर चाललेला असतो, कोठें यंत्राच्या साहाय्यानें झोडपणी चाललेली असते. गुरें शेतांत चरतांना फक्त दिसावयाचीं आणि तींहि त्यांच्यासाठीं राखून ठेवलेल्या कुरणांत. जनावर कसें आडदांड आणि धष्टपुष्ट. गुरांची तेथें पूजा होत नाहीं; जोपासना होते. ती जोपासना दूधदुभत्यासाठीं जशी होते तशीच मांसाहार भरपूर मिळावा म्हणूनहि.

युरोपमधील कोठल्याहि शेतावर किंवा बागेंत गेलें तर शेतकरी तुम्हांला मोठ्या अगत्यानें तीन गोष्टी दाखवील. एक अर्थातच धान्यानें, भाजीपाल्यानें आणि नानाविध फुलांनीं भरलेलें शिवार. दुसरें, गुरांचा कळप आणि तिसरें त्याचें घर. समृद्ध जीवनाची साक्ष देणाऱ्याच या तिन्ही गोष्टी होत. तेथील शेतकऱ्याला आपल्या उपजीविकेसाठीं तर धान्याची उणीव पडत नाहींच; पण उत्पादन वाढविण्यासाठीं सर्व प्रकारचीं साधनें त्याला उपलब्ध असतात आणि त्या उत्पादनाला योग्य तो भावहि मिळावा म्हणून राज्यसत्तेची सर्व शक्ति त्याच्या पाठीमागें उभी असते. शेतकऱ्यांचें जीवन हें श्रमाचें खरें. पण त्याचा मोबदला त्याला भरपूर मिळत असल्यामुळें आपल्या सभोंवतालचें वातावरण सुखी व सौंदर्यपूर्ण करण्याकडेहि साहजिकच त्याचा कल होतो.

स्वित्झर्लंड किंवा ब्रिटनमध्यें मी शेतकऱ्याचें जीवन अगदीं जवळून पाहिलें. लहानसेंच त्याचें घर असेल. पण त्याचा इतिहास मोठा रोमांचकारी असलेला तुम्हाला आढळून येईल. तो शेतकरी मोठ्या अभिमानानें सांगेल

कीं चारशें वर्षांपूर्वी ही वास्तु अस्तित्वांत आली. त्या जुन्या काळच्या अनेक वस्तूहि तुम्हांला तो दाखवील. त्या वस्तू पूर्वीच्याच अवस्थेंत ठेवण्याकडेच त्याचा कल असतो. एखादें ओक वृक्षापासून बनविलेलें मेज असेल. त्याची दुरुस्तीसुद्धां तो करणार नाहीं. त्याला रंग किंवा पॉलिशहि तो देणार नाहीं. मी कांहीं घरें पाहिलीं. चौदाव्या शतकांतील तीं घरें अद्यापहि जशींच्या तशींच ठेवण्यांत आलेलीं आहेत. कोणी त्याविषयीं सांगे कीं त्या काळांत ख्रिस्ती धर्मगुरूंचा एक मठ या ठिकाणीं होता. ते धर्मगुरु धार्मिक कारणासाठीं जी मदिरा घेत त्याचे प्यालेहि मोठ्या भक्तिभावानें दाखविले जात. आश्चर्य असें कीं, सधन आणि निर्धन दोघेहि आपआपल्या परीनें या पुराणवस्तूंचें जतन करतांना आढळून येतात. इंग्रजी धनिकवर्गाचा वर तो शोकच आहे. लंडनसारख्या शहरांत उद्योगधंद्यांत अगणित पैसा मिळवावा आणि मुद्दाम जुन्यांतील जुना एखादा किल्ला किंवा ऐतिहासिक दृष्ट्या महत्त्वाचें असें घर विकत घ्यावें ही त्यांची महत्त्वाकांक्षाच असते. तेंच त्यांचें 'कंट्री हाऊस.' त्यांत आधुनिक सुखसोयी भरपूर प्रमाणांत मिळतील. पण पुराणकालीन अवशेष मात्र इतक्या कटाक्षानें ते जतन करून ठेवतील कीं त्यावर सफाईचा हातसुद्धां ते फिरूं देणार नाहींत. युरोपीय संस्कृतीचा इतिहास याच अवशेषांतून पाहावयाला मिळतो.

युरोपच्या इतिहासाचा आपल्या मनावर किती गाढा परिणाम झाला आहे याची कल्पना त्या देशांत पाऊल टाकल्यानंतरच येते. त्या इतिहासांतील अनेक घटना आपल्या मनावर कोरल्या गेलेल्या आहेत आणि म्हणून त्या घटना ज्या ठिकाणीं घडल्या त्यांचें प्रत्यक्ष दर्शन आपण घेऊं शकलों नाहीं तरी तीं ठिकाणें मनानें आपल्याला परिचित असतात. इंग्लंड हें तर आपल्याला मुळींच परकें नाहीं. इंग्लंडचा किनारा प्रथम माझ्या दृष्टीस पडला त्या वेळच्या भावना मला अद्यापहि आठवतात. इंग्लिश खाडीवरून आमचें विमान चाललें होतें. पण माझें मन जुन्या इतिहासाचें चिंतन करण्यांत गर्क होतें. याच

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम २६४५१ वि: भू-प्रवास
क्रमांक ... २६५८ नों: दि: ३१।३।६०

खाडींत ब्रिटनच्या दर्यावर्दी दलानें वैभवशाली स्पॅनिश आरमाराचा पराभव केला होता. याच खाडींतून त्यानंतर सहाशें वर्षांनंतर ब्रिटिश आरमारानें आपल्या पराभूत सैन्याला डंकर्क बंदरांतून सुरक्षित परत आणलें होतें. हीच ती खाडी ब्रिटनच्या संरक्षणाची रेषा ठरली आहे. मी त्या खाडीकडे अनिमिष नेत्रांनीं पाहत राहिलों, तें त्या साऱ्या इतिहासाचीं चित्रें माझ्या मनश्चक्षूं-समोरून जात होतीं म्हणून.

इंग्लंडच्या दर्शनानें अशा प्रकारच्या भावना मनांत उचंबळून येणार नाहींत असा सुशिक्षित इसम विरळाच. लंडन शहरांत मी हिंडूं लागलों आणि मला वाटलें कीं, येथील रस्तेच नव्हेत तर इमारतीसुद्धां मला ठाऊक आहेत. पण लंडनची जी मी मनानें कल्पना केली होती त्यांत आणि प्रत्यक्ष मी जें पाहिलें त्यांत मात्र बराच फरक आढळून आला. उदाहरणार्थ, 'फ्लीट स्ट्रीट' हें वृत्तपत्रांचें आगर. येथूनच ब्रिटिश लोकमत तयार होतें. आणि ब्रिटिश राज्यकर्त्यांच्या मनाचा ठावहि तेथून निघणाऱ्या कांहीं वृत्तपत्रांतून मिळूं शकतो. 'लंडन टाइम्स' आणि 'डेली टेलिग्राफ' हीं प्रबळ वृत्तपत्रें

## युरोपीय संस्कृतीचें केंद्र

याच ठिकाणाहून बाहेर पडतात. साहजिकच माझी अशी कल्पना होती कीं, या साऱ्या वृत्तपत्रांच्या कचेऱ्या भव्य, हवेशीर आणि सर्व आधुनिक साधनांनीं सुसज्ज असतील; पण 'फ्लीट स्ट्रीट'मध्यें मी पाऊल टाकलें आणि दोन्ही बाजूंना मला ज्या इमारती दिसल्या त्या भव्य होत्या, पण चकचकीत नव्हत्या. साऱ्या लंडन शहराला धुराचें जें रोगण चढलेलें दिसतें त्याचा हात या रस्त्यावर तर अधिकच दाट रीतीनें फिरलेला मला दिसला. जर्मनांनीं बॉंब-हल्ल्याच्या वेळीं 'फ्लीट स्ट्रीट'चें महत्त्व जाणून कीं काय त्यावर केंद्रित हल्ला केला असावा. म्हणून या रस्त्याच्या टोकाकडील बऱ्याच इमारती उद्‌ध्वस्त झालेल्या आहेत. त्या विध्वंसाच्या खुणाहि तेथें प्रतीत होत असल्यामुळें 'फ्लीट स्ट्रीट'ला अधिकच अवकळा आलेली मला दिसली.

पण त्या वृत्तपत्रांचें अंतरंग मात्र मला मोहित करणारें वाटलें. ब्रिटिश वृत्तपत्रांची परंपरा मोठी. पण ब्रिटिश वृत्तपत्रांचा उल्लेख झाला म्हणजे सुशिक्षित हिंदी व्यक्तीला 'मँचेस्टर गार्डियन' व 'लंडन टाइम्स'चीच

फक्त आठवण होते. आपल्या वृत्तपत्रांपुढील आदर्श तोच आहे, आणि त्यामुळेंच आपलीं वृत्तपत्रें गंभीर आणि बहुशः राजकीय प्रश्नांनाच प्राधान्य देणारीं आढळून येतात. हिंदुस्थानांतील वृत्तपत्रांचा वाचकवर्ग लक्षांत घेतला तर त्यांत आश्चर्य मानण्याचें कारण पडणार नाहीं. लहानसा, राजकीय दृष्टया जागृत आणि राजकीय ध्येयवादांत गुंग असणारा आपला वाचकवर्ग आहे. बहुजनसमाज वृत्तपत्रसृष्टीपासून जवळजवळ अलगच असतो. त्यामुळें बहुसंख्य जनतेच्या आशा, आकांक्षा आणि आवडीनिवडी यांचें प्रतिबिंब त्या वृत्तपत्रांत आढळून येत नाहीं.

ब्रिटिश वृत्तपत्रांची परिस्थिति त्यापेक्षां अगदींच वेगळी आहे. ब्रिटिश वृत्तपत्रांचा वाचकवर्ग बहुजनसमाजांतीलहि असतो, नव्हे बहुजनसमाजाच्या आश्रयावरच ब्रिटिश वृत्तपत्रें बहुशः अवलंबून असतात आणि दुसरी महत्त्वाची गोष्ट ही आहे कीं, ब्रिटनमधील बहुजनसमाजाला आपल्याइतकें राजकारणाचें वेड नाहीं. ब्रिटिश बहुजनसमाज आपल्या स्वतःच्या दैनंदिन प्रश्नांत, आपल्या स्थानिक चळवळींत, अधिक रस घेतो. त्याचे हितसंबंध या प्रश्नांशीं निगडित असतात आणि त्यांच्या आवडीनिवडीहि विविध प्रकारच्या असतात. साहजिकच ब्रिटिश वृत्तपत्रें आपल्यासारखीं गंभीर आणि बरींचशीं अभ्यासजड राहूं शकत नाहींत.

लंडनमध्यें ब्रिटिश वृत्तपत्रें चाळीत असतांना ‘ लंडन टाइम्स ’ व ‘ मँचेस्टर गार्डियन ’ हीं दोनच वर्तमानपत्रें सोडलीं तर बाकीच्या वर्तमानपत्रांत सनसनाटी घडामोडींनाच महत्त्व देण्यांत येत असलेलें मला आढळून आलें. पहिलें पान हेंच त्यांचें महत्त्वाचें पान आणि त्या पानावर आकर्षकच नव्हेत तर भडक मथळे देण्यांत येतात आणि जगांत घडलेली एखादी राजकीय घटना तेथें आढळून येईलच असें नाहीं; पण खळबळ उडवून देणारा एखादा खटला, एखादा रहस्यमय खून किंवा एखाद्या थोर व्यक्तीचा घटस्फोट यांनीं त्या पानाचे स्तंभ भरलेले हमखास सांपडतील. ब्रिटिश वृत्तपत्रांचें हें स्वरूप

मला थोडें चमत्कारिक वाटलें. म्हणून एका संपादकाला मीं त्याबद्दल विचारलें. त्याला त्या प्रश्नाचेंच आश्चर्य वाटलें. तो निःसंकोचपणें मला म्हणाला, "आमचा वाचकवर्ग तुम्ही विचारांत घ्या. त्याच्या आवडी-निवडींना प्राधान्य देणें हें आमचें कर्तव्यच आहे. आणि त्या बाबतींत आमचा दृष्टिकोन स्पष्ट आहे. आम्हांला त्याचा संकोच वाटत नाहीं. जीवनाचे निरनिराळे पैलू असतात. आणि त्या पैलूंचा एकत्रित विचार केल्यानंतरच जीवनाचें संपूर्ण चित्र आपल्याला मिळूं शकतें. हें चित्र प्रकट करण्याचाच आम्ही प्रयत्न करतों."

मी अमेरिकेला पोचलों त्यावेळीं तर मला या परिस्थितीची प्रकर्षानें जाणीव झाली. त्या दिवशीं एका परदेशी वकिलाची अठरा वर्षांची मुलगी एका एकवीस वर्षें वयाच्या साधारण स्थितींतील तरुणाबरोबर पळून गेली होती. दोन दिवसांनंतर ही तरुणी पोलिसांना सांपडली आणि तिला रीतसर आईबापांच्या स्वाधीनहि करण्यांत आलें. पण या दोन दिवसांत या प्रेमी युगुलानें ज्या ज्या ठिकाणीं संचार केला होता त्याचे बोलके फोटो कांहीं धाडसी छायाचित्रकारांनीं काढले होते आणि ती तरुणी ज्या दिवशीं घरीं परत आली त्या दिवशीं 'वॉशिंग्टन पोस्ट' यासारख्या भारदस्त वर्तमान-पत्रांत ते फोटो छापलेले मीं पाहिले. मला त्याचें आश्चर्य वाटलें. पण वॉशिंग्टनमधील लोकांना ती गोष्ट त्या दृष्टीनें चिकित्सा करण्याइतकीहि महत्त्वाची वाटली नाहीं.

त्यावरूनच नव्हे तर इतरहि अनेक गोष्टींवरून माझें मात्र ठाम मत झालें आहे कीं, परदेशांतील आचार-विचारांकडे आपल्या स्वतःच्या दृष्टिकोनांतून पाहण्यांत अर्थ नाहीं. त्या त्या देशांतील रीतिरिवाज, समाजपद्धति यांचेंच प्रतिबिंब त्या आचारविचारांत प्रकट होतें. मग आपल्यापेक्षां ते निराळे आहेत म्हणून त्यांची निंदा करण्यांत अर्थ काय ?

लंडनमधील समाजजीवनाचे जे पैलू माझ्या दृष्टीस पडले ते आपल्यापेक्षां

खासच निराळे आहेत. सुरुवातीला तरी साधारणपणें ब्रिटिश लोक वागण्यांत तुटक असेच वाटतात. पण म्हणून ते बेपर्वा, किंवा उद्धट आहेत असें नव्हे. उलट बसकंडक्टरपासून तों बोलर हॅट घातलेल्या लब्धप्रतिष्ठितापर्यंत प्रत्येकजण, विचारलें कीं तत्परतेनें उत्तर द्यावयाला कधीं चुकत नाहीं. पण तो त्याच्या अंगीं मुरलेला शिष्टाचार. बाकी उगाच अघळपघळ बोलणें, चौकसपणा दाखविणें, विचारल्यावांचून मदतीसाठीं हात पुढें करणें वगैरे गोष्टी त्यांच्या स्वभावांतच नाहींत. मग त्या आचारांत कशा प्रकट होणार ?

लंडनमधील लोकांची माझ्या मनावर जी छाप पडली ती पुसून न जाण्या-इतकी दाट होती. लोकशाहीचें हें माहेरघर आणि युरोपीय संस्कृतीचेंहि तें केंद्र आहे. साहजिकच निरनिराळ्या सामाजिक थरांतील असूनहि मला ते लोक विचारी तसेच सुसंस्कृत आढळून आले. खरें म्हटलें तर त्यांनीं माझ्याशीं बोलावें असा माझा अधिकार नव्हता. पण पार्लमेंटचे कांहीं सभासद, मजूरपक्षाच्या वृत्तपत्रांतील कांहीं संपादक आणि 'लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स' या जगप्रसिद्ध शैक्षणिक संस्थेंतील कांहीं प्राध्यापक मला भेटले तेव्हां जणूं जुन्या ओळखीची एखादी व्यक्ति भेटत आहे, अशा आपुलकीनें ते माझ्याशीं वागले. पं. नेहरूंच्या हिंदुस्थानचा एक नागरिक म्हणूनहि त्यांच्यापैकीं कांहींनीं मला सन्मानानें वागविलें व स्वातंत्र्योत्तर काळांत हिंदुस्थाननें विकास केल्याची त्यांना माहिती होती, त्याबद्दल त्यांनीं आस्थे-वाईकपणें चौकशी केली.

लंडनमधील साधारणपणें डाव्या गटांतील वा प्रागतिक विचारसरणीचे जे लोक आहेत त्यांना हिंदुस्थानबद्दल विशेष कुतूहल आहे. आणि पंडितजींच्या परराष्ट्रीय धोरणाबद्दल अधिक संदेह त्यांच्या मनांतच दिसून येतो. हा संदेह विरोधाच्या भावनेनें निर्माण झालेला नाहीं, किंवा त्यांत आकसाची भावनाहि नाहीं. उलट साम्राज्यविरोधी शक्तीचे एक माननीय प्रतिनिधि व समाजवादी विचारसरणीचे एक भक्त असलेले पंडित नेहरू सोव्हिएट

साम्राज्यवादाबद्दल हिरीरीनें उसळून बोलत नाहींत याबद्दलचा खेदच त्यांच्या मनांत घर करून राहिलेला दिसून येतो. हे गट अर्थातच सुएझ कालव्याच्या बाबतींतील ब्रिटिशांच्या धोरणाचे कट्टे विरोधक आहेत. पण तेवढाच विरोध हंगेरीकडील सोव्हिएट आक्रमणाबद्दलहि ते व्यक्त करतात. 'सोशालिस्ट कॉमेंटरी' या मासिकाच्या संपादिका श्रीमती रिटा हिंडेन यांनीं या दोन्ही प्रश्नांबद्दल जळजळीत मत व्यक्त करतांना मला म्हटलें, "तुम्ही एक गोष्ट लक्षांत ठेवा. सुएझच्या ब्रिटिश धोरणामागें ब्रिटिश जनता नव्हती. हुजूर पक्षांतील अनेक लोकहि त्या धोरणाविरुद्ध खवळून उठले. ब्रिटिश वृत्तपत्रांनीं जें मत व्यक्त केलें तें नव्वद टक्के सरकारच्या विरुद्ध होतें. ब्रिटिश लोकशाहीचा आवाज त्या वृत्तपत्रांतून प्रकट झाला. पण आमची सदसद्विवेकबुद्धि त्या वेळीं जशी खवळून उठली तशीच हंगेरीच्या वेळींहि खवळून उठली. आम्हांला आश्चर्य वाटतें तें हें कीं, नेहरू त्या वेळीं मात्र इतके मूग गिळल्यासारखे स्वस्थ कसे बसले ?"

लंडन ही एके काळीं साम्राज्यवादी ब्रिटनची राजधानी होती. ऐषआराम, लब्धप्रतिष्ठितपणा, अहंकार हा एके काळीं ब्रिटिश लोकांच्या रोमरोमीं खेळत असे. निदान आमची कल्पना तरी तशी असे. पण या वेळीं लंडनमध्यें हिंडतांना मला आश्चर्य वाटलें तें तेथील लोकांच्या साधेपणाचें होय. लंडनमध्यें डामडौल असेल, पण तो अगदीं मोजक्या ठिकाणीं मर्यादित राहिलेला आहे. बाकी सारा जनसमूह मला साधासुधा, पोषाखाच्या बाबतींत अनौपचारिक आणि वागण्याच्या बाबतींत भाबडा, संकोची पण खुल्या अंतःकरणाचा वाटला. त्यांच्या वस्तीचीं ठिकाणें टुमदार, सुबक असतील, पण त्यांत डामडौल व भपका नाहीं. ब्रिटन हें एक समाजकल्याणकारी राज्य झालेलें आहे. त्याच्या खुणा कामगारांच्या सुबक वसतीगृहांत, शहरांतील निरनिराळ्या भागांत फुलविल्या गेलेल्या बागबगीचांत आणि सर्वसाधारण लोकांना उपलब्ध करून देण्यांत आलेल्या अनेकविध सुखसोयींत मला

आढळून आल्या. ब्रिटिश कामगार हा वर्ग जागृत खरा, पण त्याचें वर्गहित एकंदर समाजहिताला विरोधी होत असतांना दिसत नाहीं त्याचें कारण हेंच होय.

कामगाराच्या समृद्ध जीवनामुळेंच त्यांच्यामध्यें जबाबदारीची जाणीवहि निर्माण झालेली आहे. समाजवादी विचारसरणीच्या कांहीं लोकांशीं बोलतांना मला आढळून आलें कीं, ब्रिटनमध्यें उद्योगधंदे राष्ट्रीय मालकीचे करण्याबद्दल आता पूर्वीइतकी आस्था राहिलेली नाहीं. खाजगी भांडवलदारांच्या नफ्यावर नियंत्रण आणि कामगारांच्या कल्याणाची शाश्वति या दोन्ही गोष्टी सरकारनें साध्य केल्यानंतर केवळ घोषणेवरील प्रेमाखातर उद्योगधंदे राष्ट्रीय मालकीचे करण्याचा आग्रह कामगारांनीं कां धरावा ? ब्रिटनमधील कामगाराला आपल्या हक्कांची जाणीव झालेली आहे. पण आपल्यावरील जबाबदारीचीहि त्याला जाणीव असते. म्हणून आपल्या कामांत तो कुचराई करीत नाहीं, समाजा-बद्दलचें आपलें कर्तव्य पार पाडण्यालाहि तो तत्पर असतो आणि म्हणूनच आपण प्राप्त करून घेतलेले हक्क कोणी हिरावून घेऊं नये, आपल्या व आपल्या कुटुंबाच्या जीवनमानाला धक्का पोचूं नये, एवढ्यासाठीं मात्र तो जागरूकतेनें खटपट करीत असतो.

ब्रिटनमध्यें कम्युनिझम रुजूं शकत नाहीं तो त्याचमुळें होय. ब्रिटिश कामगाराला कम्युनिस्ट तत्त्वज्ञानाची भीति वाटत नाहीं, पण त्याबद्दल—विशेषतः त्यांतून निर्माण होणाऱ्या हुकूमशाहीबद्दल—त्याला तिटकारा वाटतो, नव्हे—उबग वाटते. ब्रिटनमधील कामगार, मजूरपक्षाचे लोक, प्रागतिक विचारसरणीचे लोक पंडितजींच्या परराष्ट्रीय धोरणाबद्दल साशंक झाले आहेत, त्याचें कारण एवढेंच कीं, कम्युनिस्ट राजवटींच्या बाबतींत तटस्थतेचें धोरण ठेवणें हें त्यांना धोक्याचें वाटतें. पण वर म्हटल्याप्रमाणें, पंडितजींच्या बाबतींत त्यांच्या मनांत विकल्प नाहीं; खेद मात्र आहे. त्यांना अजूनहि मनांतून खात्री वाटते की, पंडितजींच्या सारखें सुसंस्कृत मन कम्युनिस्ट

राजवटींबद्दल घृणा येऊन आज ना उद्यां खवळून उठेल. ती आशा मात्र त्यांच्या अंतःकरणांत खोलवर रुजलेली आहे.

त्याचा प्रत्यय मला एके दिवशीं अनपेक्षित अशा एका ठिकाणीं आला आणि म्हणूनच मला तो हृदयस्पर्शी वाटला. त्या दिवशीं एक वस्तुसंग्रहालय पाहावयाला मी गेलों होतों. लहानसेंच वस्तुसंग्रहालय होतें; पण किती उद्बोधक वाटलें मला तें. तेथें देखरेख ठेवण्यासाठीं लष्करांतून निवृत्त झालेला एक इंग्रज होता. मला पाहतांच तो आतुरतेनें माझ्याजवळ आला आणि मला त्यानें हिंदुस्थानबद्दल अनेक प्रश्न केले. सैन्यांत असतांना बरींच वर्षे त्यानें हिंदुस्थानांत काढलेलीं होतीं. त्यामुळें हिंदुस्थानांतील अनेक शहरांची त्यानें अशा तऱ्हेनें चौकशी केली कीं जणूं कांहीं तीं त्याला आपल्या घरांसारखींच वाटत होतीं. आपल्या घरचा एक नातलग आकस्मिकपणें भेटावा तसा त्याला माझ्या भेटीमुळें आनंदहि झालेला दिसला. सरतेशेवटीं निरोप घ्यावयाची वेळ आली तेव्हां त्यानें मला अगदीं अगत्यानें पण हलक्या आवाजांत विचारलें, "तुम्हांला काय वाटतें, नेहरू हे पाश्चिमात्य गटाच्या बाजूला झुकतील कीं सोव्हिएट गटाकडे?"

त्याच्या मुद्रेवर उत्सुकता होती, आवाजांत भावना होती. मी हसत हसत त्यालाच प्रश्न केला, "पण तुम्हांला काय वाटतें तें तर कळूं द्या."

त्यानें अगदीं आत्मविश्वासानें म्हटलें, "नेहरू हे लोकशाहीवादी आहेत. ते कम्युनिस्टांकडे झुकणें शक्यच नाहीं."

"होय ना? त्यांतच तुमच्या प्रश्नाचें उत्तर आलें." मी त्याच्याशीं हस्तांदोलन करीत म्हणालों.

त्यानें माझा हात विलक्षण प्रेमानें दाबला. त्याच्या मुद्रेवर जें समाधान मला दिसलें तें सर्वसाधारण ब्रिटिश श्रमजीवी जनतेच्या भावनेचेंच मला प्रतीक वाटलें.

ब्रिटिश पार्लमेंटची आपल्या मनावर केवढी मोहिनी आहे हें पार्लमेंट सभागृह दृष्टीस पडल्याबरोबर मला कळून आलें. टेम्स नदीच्या प्रवाहा-प्रमाणेंच या सभागृहाचें जीवन अखंडपणें वाहत आहे. कित्येक देशांत क्रांत्या झाल्या आणि तेथील समाजरचना बदलली. त्याबरोबरच कायदेमंडळाचे अधिकारच नष्ट झाले नाहींत तर त्या बैठकी जेथें भरत त्या वास्तूदेखील नामशेष झाल्या. उलट ब्रिटनमध्यें अंतर्गत क्रांति झाली, राजपुरुषांचीं शिरें उडालीं, कित्येक देशभक्त देशोधडीलाहि लागले; पण जनतेच्या प्रत्येक उठावाबरोबर कॉमन्स सभेचें म्हणजेच पार्लमेंटचें वैभव आणि सामर्थ्य मात्र

# लोकशाहीचें माहेरघर

वाढलें आणि अखेरीस जनतेच्या सार्वभौम शक्तीचें प्रतीक म्हणून ब्रिटिश पार्लमेंट साऱ्या जगाला आदर्शभूत व मार्गदर्शक झालें.

त्या पार्लमेंटांत आज मी पाऊल टाकीत होतों. तें भव्य सभागृह—ज्याचें प्रतिबिंब टेम्स नदीच्या प्रवाहांत आणि लोकसत्तेबद्दल आस्था वाटणाऱ्या प्रत्येक व्यक्तीच्या मनःपटलावर उमटलेलें दिसून येतें—पाहतांच माझ्या डोळ्यांसमोर ब्रिटनचा सारा इतिहास क्षणार्धांत उभा राहिला आणि आश्चर्य असें कीं त्या इतिहासाची साक्ष देणारीच या सभागृहाची वास्तु राहिलेली आहे; नव्हे—ब्रिटिश परंपरेप्रमाणें ती मुद्दामच तशी पुराणी ठेवण्यांत आलेली आहे. आधींच चिरेबंदी इमारत. तिचा विस्तार जसा मोठा तशीच तिची उंचीहि मन चकित करणारी. एखाद्या खिस्ती धर्ममंदिरांत पाऊल टाकतांना मनाची जी भावना होते तीच भावना या सभागृहांतल्या पायऱ्या चढतांना आपल्या मनांत उद्भूत होते. त्या इमारतीचें सारें रूप आणि आकर्षणहि तसेंच आणि सारा रुबाबहि त्याच प्रकारचा. गंभीर आणि

विनम्र होण्यासारखेंच तेथील वातावरण आहे.

माझ्या मनानें साहजिकच हिंदुस्थानच्या पार्लमेंटगृहाशीं त्या सभागृहाची तुलना केली. आपलें सभागृह जसें नवें, कोरें करकरीत तसेंच तजेलदार आहे. मनाला आल्हाद देणारी ती इमारत आहे. ब्रिटिश पार्लमेंटांत गेलें कीं मन थोडेंसें भयचकित होतें. मनावर संस्कारांचा दाब पडल्यासारखा वाटतो. इतिहासाचें सारें ओझें शिरावर पडल्यासारखें वाटतें. मग मनापुढें चित्र उभें राहतें तें शिरच्छेद झालेल्या पहिल्या चार्ल्स् राजाचें. त्याच अनुषंगानें क्रॉम्वेलची उग्र मूर्ति डोळ्यासमोर तरळूं लागते. पिट आणि हॅम्डन, बर्क जणूं गर्जना करीत आहेत असा भास होतो. त्या जुन्या इतिहासाचीं स्मृतिचित्रें मनापुढून सरकत असतांनाच आपण पायऱ्या चढत असतों आणि ज्या वेळीं प्रेक्षकांच्या गॅलरींत आपण जाऊन पोहोंचतों तेव्हां अनिर्वचनीय आनंदानें मन भरून येतें.

याच आनंदाच्या भरांत मी आतुरतेनें खालीं दृष्टि टाकली. भव्य दिवाणखाना, त्यांतील बाकें जुनींच आणि सभासद दाटीवाटीनें बसलेले. सरकारचे मंत्री आणि विरोधी पक्षाचे नेते समोरासमोर बसलेले होते. पण त्यांच्याहि समोर कागदपत्र ठेवण्यासाठीं कांहीं सोय नव्हती. समोर पेट्या मात्र होत्या. तितक्याच जुनाट. त्यांवरच कागदपत्र ठेवण्यांत आले होते. त्या मानानें आपल्या पार्लमेंटांतील व्यवस्था अगदीं राजेशाही आहे. सभासदांसाठीं ज्या सुखसोयी येथें आहेत त्या ब्रिटिश पंतप्रधानालाहि मिळत नाहींत आणि मागील बांकांवरील सभासद तर बिचारा उच्चासनावर उभा राहतो आणि हातांतील टिपणें फडफडवीत आपले मुद्दे मांडतो. ब्रिटिश पार्लमेंटइतकें गैरसोयीचें सभागृह क्वचितच कोठें आढळून येत असेल. त्याचा विस्तारसुद्धां मुद्दाम वाढविण्यांत येत नाहीं. कारण तो वाढविला तर सभागृहांतील गर्दी नाहींशी होईल. पार्लमेंटच्या साऱ्या सभासदांना एकाच वेळीं बसण्याइतकी सभागृहांत जागा नाहीं. तशी वेळ आली तर

ग्रंथालय पुणे १०६८६

अनेक सभासदांना उभे राहणेंच भाग पडेल.

ब्रिटिश पार्लमेंटांत गोंगाटहि फार चाललेला असतो आणि शिस्तीचा तर तेथें अभावच आहे. त्या मानानें आपल्या पार्लमेंटचा रुबाबहि जास्त आणि येथील वागणूकहि अधिक शिस्तबद्ध, इतकेंच नव्हे तर अधिक विनयशील आहे. सभागृहाची इज्जत आपल्याकडे जितकी सांभाळली जाते तितकी ब्रिटिश पार्लमेंटांत पाळली जात नाहीं. मीं पाहिलें, अनेक सभासद खुशाल उभे राहून एकमेकांशीं बोलत होते. कोणी पाय ताणून झोपले होते. सभागृहांतून ये-जा तर इतकी होत होती की बैठक तहकूब तर झाली नाहीं ना असाहि संशय मधून मधून मला येत होता. सभागृहांतील कामकाजाकडे लक्षहि फारच थोड्या सभासदांचें होतें. आपल्याकडे सभागृह रिकामें राहतें पण सभागृहांत जे सभासद असतात ते वरकरणीं तरी कामकाजाकडे लक्ष देत असलेले दिसतात. ब्रिटिश पार्लमेंटचे सभासद त्या मानानें पुष्कळ खुलेपणानें वागतात आणि आपल्याकडे जेवढें गांभीर्य सभागृहांत दिसून येतें तेवढें तेथें दिसत नाहीं. आपल्याकडे सभापतींची देखरेखहि नियंत्रणासारखीच होते. कधींकधीं तर शाळामास्तरानें नियंत्रण करावें तशा थाटांत सभापतींचें "ऑर्डर, ऑर्डर" चालू असतें.

पण हा झाला वरचा देखावा. ब्रिटिश पार्लमेंटचें कामकाज पाहिल्यानंतर मात्र तेथील सभासद आणि आपले सभासद यांच्यामधील अंतर जाणवतें. एक तर ब्रिटिश सभासद अधिक जागरूक व जबाबदार असतो. आपल्या मतदारसंघाशीं त्याचा दैनंदिन संबंध असतो. अर्थात ब्रिटनचा व हिंदुस्थानचा विस्तार यांतील तफावत लक्षांत घेणें मात्र आवश्यक आहे. तथापि, ती तफावत ध्यानीं धरली तरी सर्वसाधारणपणें आपले सभासद कार्यक्षम तर नव्हेच पण जागरूकहि म्हणतां येणार नाहींत. ब्रिटिश सभासद विशेषतः आपल्या मतदारसंघाबद्दलच अधिक विचार करतो. साऱ्या देशाच्या प्रश्नाचा ऊहापोह करण्यांत तो आपला वेळ घालवीत नाहीं. साहाजिकच स्थानिक

अडचणी आणि त्यांचें निवारण आणि आपले जिव्हाळ्याचे कांहीं विषय यांचा परामर्श घेणें हेंच त्या सभासदांचें मुख्य कार्यक्षेत्र असतें.

श्री. हाउटन यांच्याबरोबर मीं जेव्हां जेवण केलें तेव्हा याच दृष्टीनें मीं बरीच विचारणा केली. कॉमन्स सभेंत सभासदांना आपल्या पाहुण्याच्या भेटीगाठी घेतां याव्या म्हणून हरएक प्रकारची व्यवस्था करण्यांत आलेली आहे. सभागृहांत ‘ बार ’ सुद्धां आहे. त्यामुळें सभागृहांतील चर्चेचा कंटाळा आला कीं सभासद एखादा चषक घेऊन तजेला आणायला मागेंपुढें पाहत नाहींत. तेथेंच चर्चाहि चालू राहते आणि काव्यशास्त्रविनोदहि होतो. कोणी महत्त्वाचे पाहुणे आले तर भोजनगृहांचे दरवाजे खुले असतात.

हाउटन यांना मीं विचारलें, “ नवख्या सभासदांना पुढें यावयाला अडचण पडत नाहीं का ? ”

ते लगेच म्हणाले, “ कां बरें ? ”

मीं म्हटलें, “ पक्षाचे नेते साऱ्या महत्त्वाच्या प्रश्नांवर बोलणार. मग नवख्या सभासदांना पुढें यावयाची संधि तरी कशी मिळावी ? आमच्याकडे कॉंग्रेस पक्षांतील सभासदांची हीच तक्रार असते.”

त्यांनीं शांतपणें उत्तर दिलें, “ पार्लमेंटच्या कामकाजाची माहिती करून घेतली तर कोणाहि सभासदाला असें निराश होण्याचें प्रयोजन पडणार नाहीं. कॉमन्स सभेंत प्रश्नोत्तरें असतात. तातडीनें एखाद्या प्रश्नाचा विचार करण्यासाठीं कोणालाहि ‘ मोशन ’ आणतां येते. तहकुबीच्या सूचना असतात, खाजगी ठराव असतात, निरनिराळीं विधेयकें असतात. त्याचें, पहिलें, दुसरें, तिसरें वाचन असतें. स्वतःहि एखादें विधेयक मांडतां येतें. मग इतक्या सर्व गोष्टींत कोठेंच कां कोणाला वाव मिळूं नये ? पण सभासदानें आपले विषय ठरवून ठेवले पाहिजेत आणि निवडक प्रश्नांचा समग्रपणें अभ्यास केला पाहिजे. मग कॉमन्स सभेच्या कामकाजाची रीत लक्षांत ठेवून सभासदाला सहजपणें चंचुप्रवेश करतां येईल.”

ब्रिटिश पार्लमेंटचे बहुसंख्य सभासद या दृष्टीनें जागरूक राहातात. आंतरराष्ट्रीय प्रश्नावरील चर्चा, अंदाजपत्रकावरील सर्वसाधारण चर्चा आणि महत्त्वाच्या विधेयकांचें पहिलें वाचन हेंच आपल्या सभासदांचें लक्ष्य असतें आणि त्यांतील चर्चेंत भाग घेण्यासाठींच सर्वांची धडपड चाललेली असते. म्हणून बहुतेक सभासदांच्या पदरीं निराशा येते. ब्रिटिश पार्लमेंटचा सभासद हे प्रश्न निःशंकपणें आपल्या नेत्यांकडे सोपवितो. पण जेथें ही स्पर्धा फारशी नसते अशा विधेयकांकडे मात्र तो कटाक्षानें लक्ष पुरवितो आणि आपला व्यासंग व जनतासंपर्क यामुळें प्राप्त झालेला अनुभव हा सारा त्या विधेयकांची चिकित्सा करतांना तो कामीं लावतो आणि आपल्या अस्तित्वाची तो सभागृहाला चुणूक दाखवितो.

ब्रिटिश पार्लमेंटच्या सभासदांचें दैनंदिन कामकाज मीं पाहिलें तेव्हां तर मी चकित झालों. आपल्याकडे पार्लमेंटचा सभासद हा एक हुद्देदारच मानला जातो, त्यांपैकीं कित्येक आपला तनखा व भत्ता ही पूर्वींच्या देशसेवेची बिदागी होय असेंच समजतात. कित्येकांचें तर हें पेन्शनच मानावयला हरकत नाहीं. ते आपल्या अस्तित्वाची जाणीव मतदारांना करून देतात ती वृत्तपत्रांतील प्रसिद्धीच्या रूपानें. साहाजिकच सभापतीच्या डोळ्यांपेक्षां त्यांचें लक्ष पत्रकारांच्या गॅलरीकडेच अधिक लागलेलें असतें. त्या गॅलरींतील पत्रकारांच्या डोळ्यांना डोळा भिडला कीं ते स्वतःला कृतकृत्य मानतात. त्यानंतर आपलें कांहीं कर्तव्य शिल्लक राहिलें आहे असें ते मानीत नाहींत. ब्रिटिश सभासद असा आत्मसंतुष्टहि नाहीं आणि असा अल्पसंतुष्टहि नाहीं. त्याला सभासदत्वाबद्दल तनखा मिळतो आणि इतरहि सवलती मिळतात. त्याच्या कामाचा व्याप इतका असतो आणि त्यासाठीं त्याला इतके श्रम आणि पैसा खर्च करावा लागतो कीं पार्लमेंटचें सभासदत्वहि त्याला एक जिकिरीची जबाबदारी वाटते. ब्रिटिश पार्लमेंटचें सभासदत्व ही मानाची जागा खरी, पण त्याहिपेक्षां तें एक खरेंखुरें अवजड कर्तव्यक्षेत्र होय.

म्हणूनच, पार्लमेंटच्या सभासदाचा दिवस बांधलेला असतो. दैनंदिन पत्रव्यवहार, भेटीगाठी, वाचन, लेखन आणि व्याख्यान या विविध प्रकारच्या जबाबदाऱ्या तो स्वतः आपल्या चिटणीसाच्या साहाय्यानें पार पाडीत असतो. त्या पार पाडतांना त्याला वेळापत्रक सांभाळावें लागतें, आणि हें वेळापत्रक नोकरी करणाऱ्या कोणत्याहि व्यक्तीसारखेंच किंबहुना त्याहिपेक्षां अधिक काटेकोर असतें. ब्रिटिश पार्लमेंटच्या कांहीं सभासदांना मी मुद्दाम भेटलों. ही भेट सहजगत्या मिळाली नाहीं. त्यासाठीं त्यांच्या कचेरींत वा कॉमन्स सभेंत मला वारंवार फोन करावे लागले. पण एकदां मुलाखतीची वेळ व समय ठरला म्हणजे मात्र निवांतपणें त्या सभासदाशीं बोलतां येतें, संभाषणानें त्याच्याशीं चर्चा करतां येते व वादहि घालतां येतो.

कॉमन्स सभेचा मला साहजिकच दरारा वाटत होता. नामवंत सभासदांचें तर दर्शनहि दुर्मिळ होईल असें मला वाटत होतें. ब्रिटिश पार्लमेंट ही जशी साऱ्या पार्लमेंटांची जननी त्याचप्रमाणें ब्रिटिश लोकसत्ता ही सुद्धां साऱ्या लोकसत्तावादी राजवटींना आदर्शभूत झालेली आहे. त्या लोकसत्तेचे वारसदार मला साधे, प्रेमळ आणि निरहंकारी दिसले. साध्या पोशाखांत आणि साध्या रीतीनें श्री. मॅकमिलन माझ्यापुढून निघून गेले. त्यांच्या पोशाखांत भपका नव्हता. त्यांच्या मागेंपुढें भपकेदार पट्टेवाले नव्हते. सर्वसाधारण नागरिकाप्रमाणें सभासदांच्या गर्दींतून वाट काढीत ते बाहेर पडले. त्यांच्या मुद्रेवर शालीनता होती आणि मुखावर स्मित विसलत होतें. मला आश्चर्य वाटलें तें त्यांच्याच नव्हे तर इतरहि ब्रिटिश नेत्यांच्या वागणुकींतील साधेपणाचें. ह्यू गेटस्केल आणि बेव्हन हेहि ब्रिटनचे भाग्यविधाते. पण त्यांच्यामध्यें दिमाख नाहीं; इतरांपासून अलग दिसणारें वैभवहि त्यांच्या अवतीभोंवतीं दिसत नाहीं. कॉमन्स सभेंत ते हिरीरीनें वाद घालतात. वेळीं प्रतिपक्षावर तीक्ष्ण हल्ला करतात. पण ते बाहेर पडले कीं त्यांचें आचरण कसें शांत आणि निगर्वी. मग खेळीमेळीनें ते एकमेकांना

एकेरी नांवानें हाक मारतील आणि लोकांशींहि खुल्या दिलानें समरस होतील.

ब्रिटिश नेत्यांचें हें क्षणदर्शनसुद्धां मला उद्बोधक वाटलें. आमच्याकडे मंत्र्यांच्या आणि नेत्यांच्या जीवनांत अवडंबर फार. आजकाल तर साध्या-सुध्या मंत्र्यांचा दिमाखसुद्धां पूर्वीच्या संस्थानिकाला लाजविणारा असतो. पट्टेवाले आणि पोलीस यांच्या पहाऱ्यांतच जणुं ते वावरत असतात आणि मंत्र्यांचें निवासस्थान पाहिलें तर तेथें बंदोबस्त जसा जय्यत तसाच देखावा आणि डामडौल फार. ब्रिटनमध्यें हा देखावा आणि डामडौल खुद्द प्रधान-मंत्र्यांच्या घरासमोरहि नाहीं. १० डाउनिंग स्ट्रीट हें त्यांचें निवासस्थान. एका अरुंद बोळांतच हें घर आहे. चौफेर उंच उंच घरें उभीं आहेत. त्यामुळें प्रकाशहि त्या भागांत कमीच. घरासमोरील रस्ताहि अरुंद आहे. त्यामुळें बड्या बड्या पाहुण्यांना घेऊन मोटार आली तरी ती नीट फिरवितांहि यावयाची नाहीं. घरावर इतर घरांप्रमाणेंच एक क्रमांक लावलेला आहे. तेथील तो दहाचा आकडा पाहिला कीं आपल्याला एकदम जाणीव होते, 'हा १० डाउनिंग स्ट्रीट'! पण ती जाणीव किती रोमांचकारी असते. क्षणभर मन स्तिमित होऊन जातें. वाटतें, याच लहानशा घरांतून का ब्रिटनच्या राज्यकारभाराचीं सूत्रें हलविलीं जातात? येथूनच का युद्धाचा आणि शांततेचा निर्णय केला गेला आहे? याच घरांतून का चेंबर्लेन आणि चर्चिल, लॉइड जॉर्ज आणि ॲटली यांच्या यशापयशाचे पडसाद उठले? '१० डाउनिंग स्ट्रीट'च्या या ऐतिहासिक महत्त्वाचा विचार आला कीं मन भरून येतें आणि त्या लहानशा वास्तूवर आपले डोळे खिळून राहतात. त्या घरानें जो इतिहास घडविला आणि पाहिला त्यानें साऱ्या जगाला नकाशा बदलून टाकला. पण हें घर आपल्या पूर्वीच्याच अवस्थेंत, जुनें, पुराणें आणि कसें विनम्र राहिलें आहे.

लंडनमध्यें भव्यपणा, ऐश्वर्य आणि विलास कोठें दिसत असेल तर तो राजघराण्याशीं संबंधित असलेल्या ठिकाणींच. मग तो बकिंगहॅम राजवाडा असो कीं टॉवर ऑफ लंडन असो. या राजवाड्याच्या आसमंतांत पहारा करणारे जे सैनिक आहेत त्यांचे पोषाख चित्रविचित्र, रंगीबेरंगी आणि आल्हाददायक असतात. त्यांचें दर्शन ही सुद्धां लोकांच्या दृष्टीनें एक करमणूकच असते. हे संरक्षक ठराविक वेळीं बदलत असतात आणि सारा उपचार, इतकेंच नव्हे तर शतकानुशतकें चालत आलेल्या रूढींचा आचारहि त्यांच्या प्रत्येक हालचालींत व्यक्त होत असतो. राजघराण्याबद्दल ब्रिटिश जनतेला जें अपार

# प्रगतिपथावर पण भूतकालाचेंहि बंधन

प्रेम वाटतें त्या प्रेमाची साक्ष या संरक्षकांबद्दल वाटणाऱ्या कुतूहलांतून सुद्धां मिळूं शकते. बकिंगहॅम राजवाड्यावरून ज्या ज्या वेळीं मी गेलों तेव्हां लोकांचे थवे तेथें उभे असलेले मला दिसले. आणि संरक्षक बदलत असतांना जो सोहाळा तेथें दर दिवशीं घडून येतो तो पाहणें हा तर कित्येक लोकांचा दिनक्रम झाला आहे.

ब्रिटनमध्यें परंपरेबद्दलचें प्रेम विलक्षण. त्या प्रेमामुळेंच राजघराण्याचें अस्तित्व या लोकसत्तेनें नाकारलें नाहीं. आणि राजघराणें ठेवावयाचें तर त्याचें ऐश्वर्य व रुबाबहि ठेवला पाहिजे, ही सर्वसाधारण जनतेचीसुद्धां श्रद्धा आहे. म्हणूनच जुने पोषाख, जुन्या चालीरिती, जुन्या रूढि यांच्याबरोबरच राजघराण्याच्या रीतिरिवाजांचीहि प्रथाहि ब्रिटननें चालू ठेवली आहे. ब्रिटनच्या सामाजिक जीवनाचें वैशिष्ट्यच हें आहे कीं तेथें लोकसत्ता रूढ झाली, समाजकल्याणकारी राजवटीमुळें तेथील समाजजीवनांत आर्थिक व सामाजिक समताहि उदय पावली, पण तरीहि राजमुकुटाचें तेज मात्र तेथें

मंदावलें नाहीं. पूर्वीच्याच दीप्तीनें तो राजमुकुट आजहि चमकत आहे आणि तशाच प्रकारचें तेजोवलय आजहि ब्रिटिश राणीच्या भोंवतीं विलसत आहे. या तेजोलयाची शांत दीप्ति साऱ्या ब्रिटिश प्रजाजनांचें मन कसें उजळून काढीत आहे हें लंडनला गेल्यानंतरच कळून येतें.

लंडन ही एके काळीं साम्राज्याची राजधानी. आतां, ज्यांनीं हें साम्राज्य वाढविलें त्यांच्या आठवणी तेवढ्या कायम राहिल्या आहेत. एके दिवशीं अशाच एका साम्राज्यसेवकाच्या निवासस्थानीं जाण्याचा मला योग आला. बर्कले स्क्वेअर या उमरावांच्या विभागांतच हें निवासस्थान आहे. त्या निवासस्थानावर एक कोरलेली पाटी मला दिसली. त्यावर लिहिलें आहे, "Lord Clive, Soldier and Administrator lived here." लॉर्ड क्लाइव्ह —हिंदुस्थानांतील ब्रिटिश साम्राज्याचा संस्थापक. माझ्या डोळ्यासमोर प्लासीची लढाई उभी राहिली आणि क्लाइव्हनें आपल्या राज्यकारभाराच्या काळांत हिंदुस्थानांतून जी लूट नेली तिचेंहि चित्र उभें राहिलें. त्या लुटींतूनच या भव्य प्रासादाची उभारणी झाली असेल. त्या प्रासादाचें वैभव आजहि तसेंच कायम आहे. भव्य दरवाजा, तुळतुळीत तक्तपोशी, चकचकणारें फर्निचर, तैलचित्रांनीं भरलेला सुसज्ज दिवाणखाना. सारेंच कांहीं डोळे दिपविणारें. क्लाइव्हनें भोगलें तें राजवैभव. त्या प्रासादांत अनेक दिवाणखाने आहेत. नृत्यगृह आहे आणि जमिनीखालीं वसविलेल्या तळघरांत ऐसपैस पसरलेलें एक स्वयंपाकगृह आणि मदिरापानगृहसुद्धां आहे. एके काळीं या तळघरांत तऱ्हेतऱ्हेच्या उंची मद्यांचा सांठा ठेवण्यांत येत असे आणि साऱ्या साम्राज्यसेवकांच्या बैठकी व मसलती तेथेंच होत असत. क्लाइव्हच्या वेळीं अर्थातच आजच्यासारखीं यांत्रिक उपकरणें नव्हतीं. पण शिकार करून आणलेल्या श्वापदांचें मांस शिजविण्यासाठीं त्याहि वेळीं योग्य तीं घरगुती साधनें तयार केलीं जात असत. तीं साधनें आजहि त्या स्वयंपाकगृहांत जशींच्या तशीं ठेवण्यांत आलीं आहेत. क्लाइव्हच्या जीवनाशीं संबंधित असलेल्या सर्व गोष्टी जशाच्या

तशा कायम ठेवण्याच्या अटीवरच या प्रासादाची विक्री करण्यांत आली. आजहि तो प्रासाद अनेक लोकांचें आकर्षण झाला आहे. त्या प्रासादाची व्यवस्था पाहणारे लोक रसभरितपणें क्लाइव्हच्या जीवनाचें वर्णनहि करतात आणि त्या राजविलासी जीवनाचा साक्षात्कार या वर्णनांतून नव्हे तर प्रत्यक्षपणें समोर दिसणाऱ्या अनेकविध वस्तूंतूनहि मिळूं शकतो.

लंडनमध्यें अशीं अनेक इतिहासप्रसिद्ध ठिकाणें आहेत कीं, जीं पाहिल्या-नंतर ब्रिटिश समाजजीवनाच्या, आपण पुस्तकांतून वाचलेल्या वर्णनाची साक्ष पटते आणि मन क्षणभर भावुक वातावरणांत तरंगूं लागतें. तसें वातावरण चार्ल्स् डिकन्सच्या कादंबरीनें अमर केलेल्या 'ओल्ड क्युरिऑसिटी शॉप'मध्यें आहे. लंडनच्या एका गल्लींत हें दुकान जसें चारशें वर्षांपूर्वी होतें तसें आज टिकून राहिलें आहे. बाकी त्याच्या आजूबाजूला मोठमोठ्या इमारती उठल्या. समोरून लंडनच्या बसेस मिनिटामिनिटांनीं भरधाव निघून जातात. आधुनिक जगानें निर्माण केलेल्या चमत्कृतिपूर्ण रचनेची सारी मोहकता त्याच्या आसपास पसरलेली आहे, पण हें दुकान मात्र जुन्या जगाची आठवण ताजी ठेवीत जसेंच्या तसें उभें आहे. वेलबुट्टीदार रोमन अक्षरांतील त्या दुकानाची पाटी, आजसुद्धां बदलण्यांत आलेली नाहीं, पण तेंच तर त्या वास्तूचें वैशिष्ट्य आहे. old curiosity shop हीं अक्षरें मीं पाहिलीं आणि त्या दुकानाकडे मी ओढला गेलों. मीच काय, इंग्रजी वाङ्मयाबद्दल प्रेम असणारा कोणताहि माणूस त्या दुकानांत पाऊल टाकल्याशिवाय पुढें जाणेंच शक्य नाहीं.

शेजारच्या लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्सच्या विद्यार्थ्यांना तर या दुकाना-बद्दल विलक्षण कुतूहल आहे. एक विद्यार्थी मला म्हणाला, "एकदां तरी या दुकानाकडे डोळे भरून पाहिल्याशिवाय मला करमतच नाहीं. वाटतें, चार्ल्स डिकन्सनें या दुकानांत आपली पायधूळ झाडली. त्यानें पावन झालें आहे हें स्थळ. आम्ही कित्येक वेळां समोरच्या 'पब'मध्यें बसतों आणि या

दुकानाकडे पाहतां पाहतां पूर्वीच्या रोमांचकारी जीवनाचा सारा चलच्चित्रपटच आमच्या डोळ्यासमोरून सरकतो. त्या वेळीं मदिरेची माधुरी अधिक कीं इतिहासकालीन जीवनाची गोडी अधिक हेंच आम्हांला कळेनासें होतें.''

लंडनच्या समाजजीवनाचें वैशिष्ट्य काय असें मला कोणीं विचारलें तर मी म्हणेन कीं, हा समाज प्रगतीच्या मार्गावर पुढें पाऊल टाकीत आहे; पण आपल्या भूतकाळाचे बंध तोडावयाला मात्र तो तयार नाहीं. हें वैशिष्ट्य साऱ्या ब्रिटिश समाजाचेंहि आहे असें म्हणतां येईल. माझ्या या धावत्या भेटींत मी सारा वेळ लंडन शहरांत आणि त्याच्या अगदीं आसपासच्या भागांतच तेवढा घालविला. तेव्हां साऱ्या ब्रिटनमधील समाजव्यवस्थेबद्दल बोलण्याचा मला अधिकार काय? लंडन शहरांत मात्र मी अनिर्बंधपणें हिंडलों आणि बहुधा पायीं हिंडलों. त्या वेळीं लंडनच्या हमरस्त्यांवर मला जीं दृश्यें दिसलीं आणि लंडनच्या अपरिचित अशा विभागांत जें पाहिलें व ऐकलें त्याचे माझ्या मनावर कांहीं संस्कार घडले आहेत. ते संस्कारच फक्त मी प्रकट करीत आहें.

उदाहरणार्थ, लंडनमधील 'पब' ही एक अपूर्व अशी गोष्ट मला वाटली. 'पब' म्हणजे मदिरागृहच म्हणाना. पण मदिरादेवीची आराधना करणें आपल्याकडे जसें खर्चाचें व मानहानिकारक वाटतें तसें तेथें नाहीं. उलट हें मदिरागृह अखंड खुलें असतें आणि गरीब व श्रीमंत असा तेथें भेदभावहि नसतो. लंडनच्या समाजजीवनाबद्दलच्या आपल्या ज्या कल्पना असतात त्यांना या 'पब'मध्यें गेल्यानंतर थोडासा धक्काच बसतो. तेथें लब्धप्रतिष्ठितपणाला वावच नाहीं. कामगार आणि बुद्धिजीवी वर्ग खुल्या दिलानें तेथें एकमेकांशीं समरस होतात. साधारणपणें 'बिअर'चाच येथें अधिक खप होतो आणि ती पाणी प्यावें त्याप्रमाणेंच घेतली जाते. एका कामकरी पुढाऱ्यानें माझ्याशीं बोलतां बोलतां 'इंटक'च्या एका पुढाऱ्याची याच बाबतींतली गोष्ट सांगितली.

या पुढाऱ्याला लंडनमधील कामकरी पुढाऱ्यांनीं एक मेजवानी दिली. साहजिकच त्या वेळीं अनेक प्रकारचीं मद्यें टेबलावर ठेवण्यांत आलीं होतीं. पण हा 'इंटक'चा नेता अगदींच सोवळा. त्यानें साध्या पाण्याची मागणी केली. वेटरनें क्षणभर चकित होऊन पाहिलें आणि तो आपल्या सहकाऱ्याला हळूच म्हणाला, "जॉर्ज, समोरच्या तळ्यांतलें एक पेलाभर पाणी घेऊन येतोस का? पण त्यांतलें शेवाळ मात्र काढून टाक!"

'पब' हें मात्र नुसतेंच मदिरापान करण्याचें स्थळ नव्हे. बिअरच्या टाकींतून नळानें काढण्यांत आलेल्या मद्याचा आस्वाद घेतां घेतां अनेक तात्त्विक वा राजकीय विषयांवर येथें विचारविनिमयहि केला जातो. पूर्वीं लंडनमध्यें 'कॉफी हाउसेस्' होतीं व मोठमोठे लेखक व राजकारणी पुरुष त्या उपाहारगृहांत आपले अड्डेहि जमवीत असत. अशाच प्रकारचे अड्डे या पब्समधूनहि बसतात आणि त्यांत विशेषतः जहालमतवादी समाजवाद्यांचा वा विचारवंत लेखकांचाच अधिक भरणा असतो. रीजंट स्ट्रीटवरील एका पबमध्यें एके दिवशीं जॉं पाल सार्त्र या फ्रेंच लेखकाच्या वाङ्मयावर चर्चा झालेली मीं ऐकली. त्या चर्चेंत प्राध्यापक, कामगार पुढारी आणि प्रत्यक्ष कामगार भाग घेत होते. डाव्या हातानें बिअरचा घुटका घेत आणि उजव्या हातांतील ब्रेडचा चावा घेत एका कामगारानें सार्त्रच्या वाङ्मयाची जी चिकित्सा केली ती ऐकून मी चकित झालों. त्या कामगारांची भाषा सफाईदार नव्हती. मधूनच गावठी बोलभाषाहि (Slang) तो वापरीत असे. पण "जॉं ईज वंडरफुल" असें म्हणतांना त्यानें जो युक्तिवाद केला तो मला अद्यापहि आठवतो.

ब्रिटिश कामगाराची पातळी किती वर जात चालली आहे त्याचें प्रत्यंतर मला त्या दिवशीं मिळालें. ब्रिटन प्रगतीच्या मार्गावर पाऊल टाकीत आहे असें जें मी म्हणतों तें त्याच आधारानें. ब्रिटिश कामगारानें आपलें जीवन-मान सुधारावें म्हणून लढे केले; पण त्याच वेळीं आपली सांस्कृतिक पातळी वाढावी म्हणूनहि त्यानें परिश्रम केले. त्याचें फळ त्याला समाजकल्याणकारी

राज्यांत मिळत आहे. तरी त्याची तृप्ति मात्र झालेली नाहीं; तो अधिकाधिक हक्कांची मागणी करतो. त्याच वेळीं आपली बौद्धिक भूकहि तो वाढवीत असतो. ब्रिटनच्या सामाजिक जीवनांतील प्रगति ही फक्त मूठभर उमरावांची प्रगति नव्हे. सारें समाजजीवन त्या प्रगतीनें व्यापलें जात आहे. त्याचें श्रेय जितकें विचारवंतांना द्यावें लागेल तितकेंच श्रमजीवी कामगारांना व शेतकऱ्यांनाहि द्यावें लागेल.

ब्रिटनमधील सर्वसाधारण माणसाचें जीवन मीं पाहिलें. पहाट झाली कीं तो कामाला लागतो. आपल्या गृहिणीला तो घरकामांत मदत करतो आणि कारखान्याचा भोंगा झाला कीं तो न चुकतां कामावर हजर राहतो. आपलें काम चोख बजावणें हें त्याला व्यक्तिगत नव्हे तर सामाजिक कर्तव्य वाटतें. त्यांतूनच समायिक संपत्ति निर्माण होते आणि व्यक्तिगत कल्याणहि होतें ही त्याची श्रद्धा आहे. त्याला अर्थातच आपल्या युनियनचा अभिमान आहे. पण देश आणि त्याचा इतिहास यांबद्दलहि त्याला तितकाच अभिमान आहे. नेल्सनच्या स्मारकापाशीं उभ्या असलेल्या एका कामगाराला मीं त्याच्या भावना विचारल्या. साऱ्या चौकांत उठून दिसणाऱ्या भव्य पुतळ्याकडे तो कौतुकाच्या भावनेनें पाहत होता. तो मला म्हणाला, "नेल्सन हा आमचा वीरपुरुष आहे. पण आमच्या देशाचेंहि तो प्रतीक आहे. आम्ही आजवर अनेक वेळां आक्रमणाला तोंड दिलें. आमच्या स्वातंत्र्यवृत्तीचें प्रतीक म्हणून आम्ही नेल्सनकडे अभिमानानें पाहतों. गेल्या महायुद्धांतसुद्धां हिटलरच्या पाशवी शक्तीशीं आम्ही जो सामना दिला त्यावेळीं या पुतळ्यानेंच आम्हांला कार्यप्रवण केलें. त्या पुतळ्यानेंच आम्हांला स्फूर्ति दिली. पण त्याचा अर्थ मात्र असा नव्हे कीं आम्ही आमच्या इतिहासांतच गुरफटून रहात आहों. तसें मुळींच नाहीं. इतिहासाचा एकेक टप्पा असतो. त्या इतिहासापासून धडे घेऊन इतिहास घडविण्यासाठीं कार्यप्रवृत्त होणें हा आमचा आदर्श आहे."

ब्रिटनच्या समाज-जीवनाचें एक नवीन पान सध्यां उघडलें जात आहे.

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम
पश्चिमेचं क्षणदर्शन
क्रमांक २५७०. वि: ३३-५:८१
नों: दि: ..............

मदाम तसॉच्या प्रदर्शनाला मी जेव्हां गेलों, तेव्हां त्याची मला प्रकर्षानें जाणीव झाली. त्या प्रदर्शनांतील मेणाच्या प्रतिकृति इतक्या हुबेहूब वठल्या आहेत कीं, क्षणभर या प्रतिकृति आपल्याशीं बोलत तर नाहींत ना असा मनाला भास होतो. प्रदर्शनांतील पहिल्या दिवाणखान्यांत पाऊल टाकतांना तर एका रखवालदारानें मला हात दाखवला; इंग्लंडमधील सवयीप्रमाणें मीं त्याला 'थँक यू' म्हटलें. पण नंतर मीं जरा निरखून पाहिलें तेव्हां मला कळलें हा रखवालदार नाहीं; त्याची प्रतिकृति आहे ही. त्याच कौतुकाच्या भावनेनें मी दिवाणखान्यांत पाऊल टाकलें. तेथें अनेक थोर पुरुषांच्या प्रतिकृति होत्या. त्यांत ब्रिटिश मंत्रिमंडळेंहि होतीं. पहिल्या युद्धांतील ब्रिटनचें मंत्रिमंडळ, त्या युद्धाच्या अखेरीचें मंत्रिमंडळ, चर्चिलचें युद्धकाळांतील मंत्रिमंडळ, आणि ॲटलीचें त्यानंतरचें मंत्रिमंडळ. या मंत्रि-मंडळांत एखादी व्यक्ति चमकून जात असेल. पण माझ्या मनावर परिणाम झाला तो ब्रिटनच्या सामुदायिक नेतृत्वाचा. हें नेतृत्व व्यक्तित्वावर आधारलेलें नाहीं आणि त्या व्यक्तित्वाच्या बंधनांनीं तें जखडलेलेंहि नाहीं. लहान, अज्ञात व्यक्तींचा त्यांत समावेश होतो आणि त्या व्यक्ति जी कार्यक्षमता दाखवितात ती लोकोत्तर नेत्यालाहि साजेशी असते. म्हणूनच ब्रिटनमध्यें वीरपूजन असलें तरी तेथील वीराला देवपण प्राप्त होत नाहीं. तो वीर माणूसच राहतो आणि व्यक्तीच्या गुणावगुणानुसार आणि त्याच्या तात्त्विक भूमिकेवर वा व्यावहारिक धोरणाच्या अनुषंगानें त्याची जी पारख होते तीच या वीरपुरुषाची केली जाते.

मदाम तसॉच्या प्रदर्शनांत ब्रिटनच्या इतिहासाचें मला साकल्यानें दर्शन झालें. त्या इतिहासाच्या निरनिराळ्या कालखंडांत ब्रिटनमध्यें आणि जगाच्या इतर भागांत ज्या क्रान्त्या व घडामोडी झाल्या त्यांचेंहि विहंगमावलोकन खरोखरच अत्यंत उद्बोधक होतें. कारण त्यांतूनच सामाजिक स्थित्यंतराचें एक व्यापक चित्र आपल्या डोळ्यांसमोर उभें राहतें आणि मानवानें

वा त्याच्या नेत्यांनीं आपल्या अहंकारांत ज्या चुका केल्या, काळाचीं पावलें न ओळखल्यामुळें त्यांनीं स्वतःला वा आपल्या राष्ट्राला ज्या संकटांत टाकलें त्यांची यथार्थ कल्पना होऊन भावी काळाकडे पाहण्याचा एक नवा दृष्टिकोण आपल्याला प्राप्त होतो. त्या इतिहासाच्या पार्श्वभूमीवरच मी ब्रिटनच्या सामाजिक प्रगतीकडे दृष्टिक्षेप केला आणि त्या वेळीं मला जें ब्रिटिश जीवन दिसलें तें आपल्यापेक्षां नव्हे तर कितीतरी राष्ट्रांपेक्षां वेगळें—सौम्य, पण सखोल, निश्चयी पण संवादी आणि समृद्ध व सुसंस्कृत असें वाटलें.

मला वाटलें आपण नीति आणि चारित्र्याचा डंकाच जास्त पिटतों. आपल्या आध्यात्मिक संस्कृतीचे देव्हारेच आपण जास्त माजवितों. आपल्यामधील सहृदयतेच्या आणि सहिष्णुतेच्या वल्गनाच जास्त करतों. लंडनमधला सर्व-साधारण माणूस अशा तऱ्हेच्या आत्मप्रौढीपासून दूर रहातो. पण नागरि-कत्वाच्या कसोट्या आणि मानवतेचीं कर्तव्यें मात्र तो आपल्यापेक्षां अधिक कसोशीनें पार पाडतो. लंडनमध्यें मला कधींहि चुकल्यासारखें वाटलें नाहीं. कारण कोणत्याहि रस्त्यावरील पोलिसाला मार्ग विचारला कीं तो आपल्या खिशांतील मार्गदर्शनानिमित्त छापण्यांत आलेलें पुस्तक काढून सविस्तरपणें आपल्याला मार्ग दाखवितो. त्याची त्याबद्दलची बिदागी काय? तर आपल्या तोंडचे 'थँक यू' हे उद्गार! त्यानेंच तो प्रसन्न होतो आणि खुलेपणानें हंसत तो आपला आदबीनें निरोप घेतो.

लंडनमध्यें मला बसच्या प्रवासाचीहि कधी भीति वाटली नाहीं. आप-ल्याला अपरिचित वाटणारीं नाणीं हातांत ठेवून बसकंडक्टरला आपलें मुक्कामाचें ठिकाण सांगावें. तो बिनचूक आवश्यक तेवढेच पैसे काढून घेतो आणि मुक्कामाचें ठिकाण येण्यापूर्वींच आपल्याला सर्व मार्गदर्शन करून तो आपली सारी चिंता दूर करतो. तुम्ही न विसरतां 'थँक यू' मात्र म्हणा. तो आपल्या कामांत गर्क असतांनाहि 'थँक यू बॉस' म्हणून आपल्या शिष्टाचाराची सव्याज परतफेड करतो. लंडनमध्यें सहज फेरफटका

करीत असतांना असे अनेक अनुभव आपल्याला येतात. तेथें निरुद्योगीपणा नाहीं. पण कितीहि कामांत असली तरी शिष्टाचाराला मात्र सहसा कोणतीहि व्यक्ति पारखी होणार नाहीं.

लोकांची तेथील घाईगर्दी मात्र विलक्षण. सारेच जण वेगानें चालतात. इतकेंच नव्हे तर धावतच असतात. प्रथम प्रथम मला कळेना, सडसडीत बांध्याच्या आणि चुटचुटीत ओठ रंगविलेल्या तरुणीसुद्धां सकाळच्या कचेरीच्या वेळीं धावतात कशा? आपल्या स्त्रीत्वाचा आदर्श म्हणजे, "पथिं चालतां पडती तुझीं किति संथ कोमल पाउलें" या प्रकाराचा! ब्रिटनच्या श्रमजीवी तरुणींचा हा आदर्श नव्हे; निदान कामाच्या वेळांत तर खासच नव्हे; तो असलाच तर 'वीकएन्ड'ला, किंवा संध्याकाळीं सात वाजतां 'सपर' घेऊन त्या फिरावयाला बाहेर पडल्या तरच. बाकी कामाच्या दिवसांत हातांतील लहानशी पर्स कशीबशी सावरीत त्या धावतच कचेरींत जातात. मग दुपारच्या सुट्टींत दोन सॅन्डविचेस् घशाखालीं उतरवून एखादें पेय त्या घाईनें घेतील आणि चॉकोलेट्स चघळीत असतांनाच त्या पुन्हा कामाला लागतील. संध्याकाळीं बाहेर पडतांना त्या नीटनेटकेपणें केस सावरतील आणि आपल्या ओठांची लाली सुधारल्यानंतर त्या पुन्हा धावतच बस पकडतील किंवा धावत्या जिन्याच्या पायऱ्या सरकत असतांनासुद्धां अधीर होऊन दोनदोन पायऱ्या ओलांडीत त्या 'सबवे'च्या अंधकाराचें आच्छादन दूर करणाऱ्या विजेच्या रोषणाईनें उजळलेल्या गाड्यांतून आपल्या घरीं जातील. त्यानंतर मात्र रात्र कोवळी असेपर्यंत कोणाची 'डेट' असेल. मग आपला सहकारी, मित्र वा प्रियकराबरोबर त्या एखादा चित्रपट पाहतील किंवा एखाद्या क्लबांत किंवा घराजवळच्या एखाद्या 'पब'मध्यें त्या दोन घटका मनोरंजन करतील. तोच त्यांच्या जीवनाचा आनंद. पण दिवसभराच्या अविश्रांत श्रमानंतरच तो आनंद त्यांना प्राप्त होऊं शकतो.

या आनंदाची लयलूट मात्र शनिवारीं दुपारीं एक वाजल्यानंतरच त्यांना

चाखावयाला मिळते. त्या क्षणापासून लंडन ओकें व रिकामें राहतें. मग सारे रस्ते शहराच्या बाहेर वळतात. प्रत्येक वाहन त्याच रोखानें खेडेगांवाकडे वा समुद्रकिनाऱ्याकडे धावूं लागतें. ब्रिटनचा हा 'वीकएन्ड'. कामाचा आठवडा संपला. आतां शनिवारची रात्र आणि रविवारची दिवसरात्र हीं मानवाधीन आणि माणूस दैवाधीन. ब्रिटनमध्यें जे अपघात होतात त्यांची सरासरी काढली तर त्या दोन दिवसांतच बहुसंख्य अपघात घडून आलेले आढळून येतात. आठवड्याच्या दगदगींतून आणि शहराच्या कोलाहलांतून मुक्त झालेले जीव अशा वेळीं बेफिकीर व बेदरकार झाले झाले तर त्यांत काय नवल? मग त्यावेळीं—

"हैं कहां प्याला कि जो दे
चिरतृषा चिर तृप्ति में भी"

असें म्हणत कोणी ताशीं ऐशीं मैल वेगानें मोटार सोडली आणि कोणी—

"रॉक रॉक रॉक
रोल रोल रोल"

या तालावर बेधुंदपणें आपला जीव अंतराळांत सोडून दिला तर त्याच्या जीविताची जबाबदारी कोण आणि कसा घेऊं शकेल? पण लंडनमधील हौशी जीवांना परिणामांची क्षिति राहात नाहीं. त्यांचा जीव आसुसलेला असतो तो अपरिमित आनंदाचा आस्वाद घेण्यासाठीं. त्या आनंदांतच त्यांना आपल्या परिश्रमी जीवनाची विश्रांति मिळते आणि त्या विश्रांतींतूनच त्यांना नव्या सोमवारपासून अधिकाधिक परिश्रम करण्याला स्फूर्ति मिळते.

लंडनमधील लोकांच्या परिपूर्ण जीवनक्रमाचें थोडक्या काळांत कां होईना, पण मी परिपूर्ण दर्शन घेतलें. मुत्सद्दी आणि राजकारणी पुरुषांचा व्याप मीं पाहिला; स्वतःला ग्रंथालयांत कोंडून घेऊन अहोरात्र व्यासंग चालू ठेवणाऱ्या प्राध्यापकांची तपश्चर्या मी पाहिली; प्रत्यक्ष कामगार निढळाचा घाम पुशीत असलेलेहि मला दिसले आणि विटेवर वीट ठेवून घराची उभारणी करावी

त्याप्रमाणें आपल्या युनियनचें सामर्थ्य वाढविणारे कामगार–पुढारीहि माझ्या नजरेखालून गेले. ब्रिटनच्या यशाचे आणि वैभवाचे तेच खरे शिल्पकार होत. त्या सर्वांच्या एकत्रित तपश्चर्येतूनच ब्रिटनचें समाजजीवन घडविलें जात आहे. ती घडण मला आकर्षक वाटली; पण त्याहिपेक्षां तिचा पाया घालणारे, तिला आकार देणारे लोक मला अधिक चित्ताकर्षक वाटले.

हेच लोक आपलें सारें काम बाजूला ठेवून आणि साऱ्या जबाबदाऱ्या विसरून अनिर्बंधपणें आनंद उपभोगीत असलेलेहि मीं पाहिले. त्यांच्या चर्येवर आतां ताण नव्हता. त्यांच्या डोळ्यांत फक्त खेळकरपणाची चमक होती. त्यांना या दुसऱ्या अवस्थेंत पाहून मला वाटलें, जे लोक कांहीं काळ कां होईना, स्वतःला विसरूं शकतात, कधीं वाटलें तर आत्मचिंतनांत गर्क होतात किंवा कधीं सामुदायिक क्रीडेंत रममाण होऊं शकतात, त्यांना पराभूत कोण करूं शकेल ! वॉटर्लूची लढाई इंग्लंडनें क्रीडांगणावरील आपल्या प्रभुत्वानें जिंकली असें म्हणतात. खिलाडू ब्रिटनचें जीवन प्रत्यक्षपणें पाहिल्यानंतर मला या उद्गारांची यथार्थता पटली.

त्याबद्दलच्या कौतुकानें माझें मन भारून गेलें. त्या भारलेल्या अवस्थेंत मी थोड्याशा कष्टानेंच लंडनचा निरोप घेतला. माझ्या दुःखांत सुख मात्र एवढेंच होतें कीं लंडनचा निरोप घेऊन मी पॅरिसकडे चाललों होतों.

पॅरिस : क्रान्तीचें माहेरघर आणि युरोपीय संस्कृतीचें केंद्र. दोन्ही दृष्टींनीं मनाचा ठाव घेणारें हें शहर. पॅरिसच्या विमानतळावर मी उतरलों आणि मला कळून आलें, आपण एका नव्या जगांत पाऊल टाकीत आहों. आजू-बाजूला जें बोलणें माझ्या कानीं पडत होतें तेंच किती स्निग्ध, मंजुळ. पहिल्या प्रीतीचे बोल कांहींसे गमतीचे, कांहींसे भीतीचे असतात तशीच ही ओठांतून बाहेर पडणारी कुजबूज मला वाटली. पॅरिसचा सारा नूरहि फ्रेंच भाषेसारखा प्रसन्न. तेथील पुरुष जरा ठेंगणे; आणि लंडनला टाय न घालणें हें जसें चमत्कारिक वाटतें तसें पॅरिसमध्यें नसल्यामुळें अंगांत कोट

# विलासी तितकीच गंभीर मायानगरी

घालून त्यावर आपल्या शर्टची कॉलर पसरून हिंडणारे येथील लोक जरा निराळेच वाटतात. स्त्रिया मात्र दिसावयाला सुंदर तशाच चमकदार. पॅरिसचें वैशिष्ट्य व्यक्त करतांना एका फ्रेंच इसमानें मला म्हटलें, "पॅरिसमध्यें मनाला वेड लावण्यासारख्या दोन गोष्टी आहेत. एक स्त्रीसौंदर्य आणि दुसरी शांपेन." त्यांतूनच विलासी जीवनाचा जो आविष्कार होतो तेंच पॅरिसचें 'कल्चर' होय.

हें जीवन विलासी खरें; पण त्या विलासांतूनच पॅरिसच्या सुसंस्कृत, रसिक, कलात्मक जीवनाची उभारणी झाली आहे. पॅरिसचें पहिलें दर्शन मला घडलें तें रात्रींच्या वेळीं. 'शो द एलीझे' या राजमार्गावर मीं पाऊल टाकलें आणि माझ्या डोळ्यांना काय दिसलें ? सारा रस्ता प्रकाशानें उजळून निघाला होता. रस्त्याच्या दुतर्फा भव्य दुकानें होती आणि त्यांत डोळे दिपणाऱ्या वस्तूंचें जणूं प्रदर्शनच भरविण्यांत आलें होतें. रंगीबेरंगी प्रकाश-झोत सोडल्यामुळें तलम वा भडक वस्त्रप्रावरणांनीं सजविलेल्या सुंदर बाहुल्या

तर वेहेस्तांतील पऱ्यांसारख्या भासत होत्या. पण दुकानांच्या त्या आजू-बाजूला आणि फुटपाथवर जीं कॅफे ऐसपैस पसरलेलीं मला दिसलीं त्यांतील एकंदर दृश्य तर मला विलक्षण मनोहारी वाटलें.

येथें जीवनाचा सारा आनंद दरवळत होता. तरुण आणि वृद्ध, स्त्री आणि पुरुष सारेच जण कॅफेंतील पेयांचा आस्वाद घेत होते. प्रत्येकाच्या टेबलावर लहान, सुबक काचेचे प्याले होते, त्यांत लाल आणि गुलाबी आणि जांभळ्या रंगाचें मद्य काठोकाठ भरलेलें होतें. त्या मद्याचा रंगच उन्मादक. मग संथपणें एकेक घोट घेत, मनींचें हृद्गतच जणूं एकमेकांना कथन करीत असलेल्या तरुण युग्मांच्या मुद्रेवर जर त्या उन्मादाची लाली पसरली असली तर त्यांत काय नवल? मला आश्चर्य वाटलें तें फ्रेंच जीवनाच्या निःसंकोचपणाचें. जीवनाचा त्यांचा दृष्टिकोनच मुळीं उमदा. जीवन हें जगण्यासाठीं आहे, आणि म्हणूनच आनंदाबद्दलची आसक्ति ठेवूनच माणसानें जगलें पाहिजे ही त्यांची श्रद्धा आहे. त्या आनंदाचें निधान प्रीतीशिवाय दुसरें कोणतें असूं शकेल?

सीन नदीच्या काठानें फिरत असतांनाहि मला या निःसंकोच खुल्या प्रीतीचें दर्शन झालें. एखादा कालवा खोदून काढावा तशी सीन नदी संथपणानें वाहत आहे. पॅरिसचें सारें वैभव त्या नदीच्या काठावर वसलेलें आहे. लुईचा राजवाडा, जगप्रसिद्ध लूव्हर, नोत्रदामचें चर्च आणि अनेक इतिहास-प्रसिद्ध स्थानें त्या वाहत्या नदीच्या दोन्ही तीरांवरील आसमंतांत पसरलीं आहेत. सीन नदीच्या त्या प्रवाहाकडे पाहतां पाहतां माझ्या मनांत विचार आला कीं खरोखरच ही सचेतन सरिता अकस्मात् बोलकीहि झाली तर काय बरें ती सांगूं शकेल? ती सांगेल फ्रेंच क्रांतीच्या रक्तरंजित इतिहासाची कहाणी. होय, फ्रान्सचें सारें समाजजीवन या क्रांतीनें व्यापून टाकलेलें आहे. पण त्यानें शतकानुशतकें तरुणतरुणींची जी सलज्ज कुजबूज ऐकली असेल तिचें वर्णन ती करूं लागली तर? तर व्हिक्टर ह्यूगो आणि ड्यूमा, एमिल

झोला आणि आनातोल फ्रान्स यांच्या कादंबऱ्यांतील अनेक उत्कट वर्णनेंसुद्धां फिकीं पडणार नाहींत का ?

सीनचें भाग्य थोर. ती स्वतः इतिहासकालीन; पण तिला सहवास लाभतो तो तरुण जीवनाचा. कारण या नदीच्या काठावरून हातांत हात घालून जोडपीं फिरूं लागलीं कीं, त्यांना काळाचा जणूं विसरच पडतो—आणि भोंवतालच्या जगाचाहि. पॅरिसच्या सांमुदायिक जीवनांतहि असाच विसर पडलेले बेधुंद लोक रात्रीच्या वेळीं इतस्ततः हिंडत असलेले दिसून येतात. पॅरिसचा 'मो मार्त' हा विभाग म्हणजे कलाविलासाचें आगरच म्हणतां येईल. हा कला-विलास लब्धप्रतिष्ठितांचा नव्हे. हा गरीब मध्यमवर्गाचा कला-विलास. या भागांत जातांना जुन्या पॅरिसच्या अनेक वस्त्या मला पाहावयास मिळाल्या. अरुंद बोळ, उंचसखल रस्ते, दाटीवाटीनें बांधलेलीं घरें; हेंच या वस्त्यांचें रूप. 'ल मिझसराब्ल' मधील जॉं व्हाल्जॉं, पोलिसांचा ससेमिरा चुकविण्यासाटीं ज्या गल्लीबोळांतून लपतछपत गेला असेल तेच गल्लीबोळ आजहि त्याच स्थितींत पॅरिसमध्यें अस्तित्वांत आहेत. क्षणोक्षणीं माझ्या मनांत विचार येई, जिला मायानगरी म्हणतात तेंच कां हें पॅरिस ?

पण त्याच वेळीं दुरून कोठून तरी तालबद्ध गाण्याचे सूर कानीं येत. आणि त्याबरोबर अनेक कंठांतून बाहेर पडणारा आनंदध्वनि ऐकूं येई. मग मात्र मला कळून येई कीं पॅरिसचें रूप जुनेंपुराणें असेल पण पॅरिसचें मन मात्र चैतन्यमय, आनंदानें फुललेलें आहे. 'मो मार्त' या विभागांतील रस्ते तर रात्रीच्या वेळीं गजबजलेले असतात. यात्रेच्या वेळीं आपल्या खेडेगांवांत जो देखावा दिसतो तो येथें दररोज असतो. जिकडे-तिकडे निशाणें आणि पताका फडकत असतात, सारीं दुकानें सजविलेलीं असतात. गाण्याबजावण्याचे फड पडलेले असतात, लोकनृत्याचा एकच गोंधळ उडालेला असतो. मधूनच पावलें थकलीं कीं तरुण आणि तरुणी

शेजारच्या कॅफेमध्यें जाऊन बसतात आणि मग मद्याचा एक प्याला घेतल्या-नंतर नव्या उत्साहानें आणि वाढत्या उन्मादानें ते पुनः नृत्याच्या रिंगणांत उतरतात.

नृत्य आणि संगीत हा पॅरिसच्या जीवनाचा जणूं गाभाच आहे. वरकरणीं त्यांत कोणाला थिल्लरपणा दिसून येईल. पण रस्तोरस्तीं मीं जीं नाचरीं पावलें पाहिलीं त्यांचा डौल जसा मोहक तशीच त्या पदन्यासांतील चंचलता कशी कलापूर्ण ! पॅरिसमध्यें क्रांति झाली, अनेक वेळां पॅरिसवर परकीयांच्या स्वाऱ्या झाल्या. अनंत हालअपेष्टाहि पॅरिसमधील लोकांना सहन कराव्या लागल्या. पण तरी तेथील लोकांची कलासक्ति कधीं नाहींशी झाली नाहीं. विलासी जीवनाबद्दल वाटणारा मोह कधीं त्यांच्या डोळ्यांवरून उडाला नाहीं. पॅरिसचें भव्य 'ऑपेरा हाऊस' मीं पाहिलें तेव्हां त्यांच्या कलासक्तीचें खरें आणि यथार्थ दर्शन मला झालें. तोंवर शहराच्या अनेक भागांतून दिसणारा आयफेल टॉवरच मला अविस्मरणीय वाटत असे. मला कौतुक वाटे त्याच्या उंचीचें. जणुं साऱ्या पॅरीसवर जागता पहारा ठेवण्यासाठींच त्याची उभारणी करण्यांत आलेली आहे असेंहि मला वाटावयाचें. खरोखर तो टॉवर म्हणजे इंजिनियरिंगच्या कौशल्याचें एक प्रतीकच म्हणतां येईल. त्याची उंची जशी अफाट तसाच त्याचा परिघहि विशाल; आणि घसरगुंडीप्रमाणें रचना करण्यांत आलेलें लिफ्ट झपाट्यानें वर जाऊं लागलें कीं मानवी हिकमती-बद्दलच्या कौतुकानें अगदीं मन भरून येतें. त्यानंतर एक, दोन, तीन मजल्यांवरून जें दृश्य दिसतें तें पाहून डोळेहि दिपून जातात.

पण असेंहि असून माझें मन खरेंखुरें उचंबळून आलें तें पॅरिसमधील 'ऑपेरा हाऊस' पाहून, कारण तेथें स्थापत्यकलेचें सारें वैभव मला दिसून आलें आणि कलात्मकतेचा तर परमोच्च बिंदु त्या वास्तूनें गाठलेला मला आढळून आला. तेथें काय नाहीं ? तेथील भव्यता तर मन चकित करणारी आहे. आंत पाऊल टाकायचा अवकाश कीं मऊ मऊ मखमली

गालिच्यांत पाय नुसते बुडून जातात आणि समोर पहावें तों तसलेच रंगी-बेरंगी मखमली पडदे प्रकाशाच्या झोतांत नुसते चमचम करीत असलेले दिसून येतात. नुसते टांगलेले ते पडदे. पण प्रकाश-किरणें रंगीबेरंगी होऊं लागलीं आणि तंतुवाद्यांचे मंजुळ सूर हृदयाला भिडूं लागले कीं हेच पडदे जणुं चैतन्यपूर्ण झाल्यासारखे भासूं लागतात. मग देहभान विसरलें जातें. मन स्वप्नसृष्टींत तरंगूं लागतें आणि जेव्हां एक स्वरसुंदरी तुमच्यासमोर येऊन गाऊं लागते आणि तिच्या तरल आवाजाच्या स्वरलहरींनीं सारें 'ऑपेरा हाऊस' भारून, भरून जातें तेव्हां क्षणभर मनाला धीर द्यावयाची वेळ येते कीं ही यक्षभूमि नव्हे, हें मानवसृष्टींतील पॅरिस आहे.

तेंच पॅरिस मला निरनिराळ्या रूपांत दिसलें. जितकें विलासी तितकेंच गंभीर. नोत्रदामच्या चर्चपाशीं मी उभा राहिलों. पॅरिस शहराचा मध्यबिंदु त्या चर्चच्या समोरच आहे. रात्रींच्या वेळीं चर्चवरहि प्रकाश-झोत सोडले होते पण त्या प्रकाशांत तर तें चर्च अधिकच करुणगंभीर दिसत होतें. तसाच तेथें प्रार्थनेसाठीं आलेला समुदाय. त्यांच्या चर्येवर खिन्नता होती. 'कॉयर'च्या मुखांतून जें संगीत बाहेर पडत होतें त्याचे सूरहि तितकेच हृदयस्पर्शी होते. कदाचित् मला ते तसे भासले असतील; कारण नोत्रदामच्या चर्चचें दर्शन झाल्यापासून माझ्या डोळ्यांसमोर 'हंचबॅक ऑफ नोत्रदाम' या कादंबरींतील कुबडाच तरळत होता. नोत्रदामच्या चर्चला जगप्रसिद्ध केलें असेल तर त्या करुण कहाणीनें. त्या कहाणीमुळेंच मीहि त्या चर्चकडे अधिक जिव्हाळ्यानें व भक्तिभावानें पाहिलें. पण तेथें, त्याचप्रमाणें 'चर्च ऑफ रिपेन्टन्स' येथें मला पॅरिसच्या समाजजीवनाचा एक निराळाच पैलू दिसला. या चर्चमध्यें आपल्या पापाची कबुली देण्यासाठीं लोक जमा होतात. या चर्चचें पूर्वापार हेंच महत्त्व आहे. पॅरिस विलासी असलें, कलासक्त असलें तरी तें तितकेंच धार्मिक आहे याचा पडताळा मला या दोन्ही धर्ममंदिरांतील भक्तगणांच्या मेळाव्यानें आणून दिला. भक्तिभाव कोठेंहि असला तरी तो

सारखाच. ज्यांना आपण जडवादी म्हणून म्हणतों, त्यांच्यांतहि परमेश्वरी भक्तीची प्रेरणा आपल्या इतकीच आहे. कदाचित् सारें जीवन हें मायाजाल आहे असें ते मानीत नसतील एवढेंच. पण त्याव्यतिरिक्त धार्मिक श्रद्धेची उणीव मला कोठेंच आढळून आली नाहीं.

उलट 'लूव्हर' या नांवानें ओळखलें जाणारें चित्रकलाप्रदर्शन (आर्ट गॅलरी) मी पाहावयाला गेलों तेव्हां युरोपांतील सर्व नामांकित चित्रकारांचीं तैलचित्रें बहुशः खिस्ताच्या जीवनाशीं संबंधित असलेलींच मला दिसून आलीं. हें चित्रप्रदर्शन म्हणजे पॅरिसचें एक भूषण आहे. अर्थात्, त्यांत इतक्या प्राति-निधिक कलाकृतींचा समावेश करण्यांत आला आहे कीं एकेक चित्रकाराच्या विभागाचा परामर्श घेण्यासाठीं सुद्धां दिवसच नव्हे तर आठवडेहि पुरणार नाहींत. 'लूव्हर' हा पूर्वीचा राजवाडा. म्हणूनच त्यांत फार मोठमोठे दिवाण-खाने आहेत. हे सारे दिवाणखाने चित्रांनीं भरगच्च भरलेले आहेत. खालच्या दिवाणखान्यांत अनेक शिल्पकृतीहि ठेवण्यांत आलेल्या आहेत. त्यांतील महत्त्वाचा विभाग 'व्हीनस द मिलो' या ग्रीक देवतेच्या असंख्य पुतळ्यांनीं भरलेला आहे. व्हीनस ही सौंदर्यदेवता. तिच्या सौंदर्याची कल्पनाकृति म्हणजे हे पुतळे होत. त्या कल्पनाकृतींतून सौंदर्याचें दर्शन होतें आणि कलाकाराच्या कल्पनेचा विलासहि त्यांतून मूर्तरूपानें प्रकट होतो. त्या कल्पनाविलासाचें आणि विकसित सौंदर्याचें एक चित्रदर्शन घडल्यानंतर ज्या भावना मनांत उचंबळून येतात त्यांचें वर्णन करणेंहि कठीण आहे. व्हीनसच्या पुतळ्यांकडे पाहतां पाहतां मला एवढेंच वाटलें कीं ज्या मानवी जीवनाची प्रतिकृति या शिल्पकारांनीं निर्माण केली ती पाहून देवांनाहि हेवा वाटला नसेल काय ?

त्या पुतळ्यांच्या विभागांतून माझें पाऊल निघालें तें कष्टानें, पण त्याहि-पेक्षां मला वेड लावलें तें अनेक चित्रकृतींनीं. त्यांत 'मोना लिसा'चें चित्र प्रमुख होतें. पॅरिसच्या 'लूव्हर'मध्यें असलेली ही मूळ चित्रकृति म्हणून तिचें महत्त्व फार मोठें. त्या चित्राकडे मी कितीतरी वेळ पहात बसलों.

मोनालिसाचें स्मित नुसतें तरळून गेलें आहे तें अनंत आकाशांत. काळोख्या रात्रीं विद्युल्लता चमकून जाते त्याप्रमाणें एकच लहानसा हळुवार स्पर्श कलाकाराच्या कुंचलीनें केला पण त्यांतून जें स्मित निर्माण झालें त्याचें गूढ उकलण्यासाठीं टीकाकारांचे ग्रंथ खर्चीं पडले आहेत. उफाड बांध्याच्या त्या त्या मुग्ध बालेकडे मी पहात राहिलों. मला त्या स्मिताचें गूढ उकललें नाहीं. पण त्याचें मला वैषम्यहि वाटलें नाहीं. एका श्रेष्ठ कलाकाराच्या अमरकृतीचें प्रत्यक्ष दर्शन घडलें या भावनेनेंच मला कृतार्थ झाल्यासारखें वाटत होतें.

पॅरिसमध्यें अशा अनेक कलाकृति आहेत आणि भावनेला हेलकावे देणाऱ्या इतिहासाच्या खुणाहि येथें जागजागीं आढळून येतात. कोठें त्या इतिहासाचीं भव्य स्मारकें उभीं आहेत. कोठें फक्त अवशेष व्यथित मनाला दिलासा देत असलेले आढळून येत आहेत. त्या स्मारकांच्या वास्तु जेवढ्या रोमांचकारी तेवढेच हे अवशेष हृदयस्पर्शी. त्या वास्तूंत नेपोलियन-समाधी ही विशेष डोळ्यांत भरणारी आहे. नेपोलियन हा फ्रेंच राष्ट्राचा वीरपुरुष. त्याची समाधि राष्ट्रानें बांधली ती नुसतीच वीरपुरुषाला साजेशी नव्हे तर त्या वीरपुरुषाला देवपण बहाल करणारी. समाधीच्या प्रांगणांत ज्या शिल्पकृति कोरण्यांत आल्या आहेत त्यांत नेपोलियन हा प्रत्यक्ष परमेश्वराचा अवतार म्हणूनच चित्रित करण्यांत आला आहे. त्याची राज्य-व्यवस्था, त्यानें केलेल्या सुधारणा, आखून दिलेले आचार, प्रजाजनांकडे पाहण्याची त्याची दृष्टि, त्याची तात्त्विक भूमिका या सर्व गोष्टी या शिल्प-कृतींत अशा रीतीनें कोरण्यांत आलेल्या आहेत कीं जणू कांहीं हा परमेश्वरी अवतार जगाच्या कल्याणासाठींच अवतरला आणि त्यानें समाजरचनेचा एक आदर्श जगापुढें उभा केला. नेपोलियनच्या कामगिरीचें हें स्वरूप वादविषय ठरलें तर त्यांत नवल नाहीं. पण राष्ट्राचा भक्तिभाव त्यांत प्रतिबिंबित होत आहे हेंच त्या समाधीचें वैशिष्ट्य. त्याच वेळीं हेंहि लक्षांत ठेवण्यासारखें आहे कीं, नेपोलियनचा सन्मान हा फ्रेन्च राष्ट्रानें आपला मानबिंदुहि केला

आहे. म्हणूनच नेपोलियनच्या शत्रूनांहि या समाधीचें दर्शन घेतांना आपलें शिर वाकविल्याशिवाय आंत प्रवेश करतां येत नाहीं.

हाच उत्कट भक्तिभाव, फ्रेंच राष्ट्रीय जीवनांत ज्यांनीं महनीय कामगिरी केली त्यांच्या समाधि मानसन्मानानें जेथें एकत्रित करण्यांत आल्या आहेत त्या दिवाणखान्यांत पाऊल टाकतांनाहि आपल्या मनांत उचंबळून येतो. वेस्ट मिन्स्टर ॲबेमध्यें ज्याप्रमाणें ब्रिटनच्या श्रेष्ठ पुरुषांना पुरण्यांत येतें, त्याप्रमाणें या दिवाणखान्यांत फ्रान्समधील श्रेष्ठ मुत्सद्यांना, कलावंतांना आणि शास्त्रज्ञांना पुरण्यांत येतें. या दिवाणखान्याच्या खालीं एक तळघर आहे आणि त्यांत व्हिक्टर ह्यूगो आणि एमिल झोला, रूसो आणि मारी क्यूरी यांचे नश्वर देह पुरण्यांत आले आहेत. पॅरिसमध्यें जीं कांहीं रोमांचकारी आणि तितकींच भव्योदात्त अशीं स्थळें आहेत, त्यांपैकीं हें एक प्रमुख स्थळ होय. त्या ठिकाणीं गेल्यानंतर ज्याचें मन उदात्त भावनेनें भरून येणार नाहीं असा इसम विरळाच. फ्रान्सच्या उज्ज्वल इतिहासाच्या स्मृति जागृत होतात त्या येथें. फ्रेंच वाङ्मयाला अमरत्व देणाऱ्या वाङ्मय-कृतींचे पडसाद अंतःकरणांत उठतात ते येथें. शूर सैनिक, चाणाक्ष मुत्सद्दी, व्यासंगी साहित्यिक, थोर तत्त्वज्ञ, विद्वान् प्राध्यापक, चिकित्सक शास्त्रज्ञ आणि ज्यांनीं ज्यांनीं फ्रान्सच्या इतिहासाला, समाजजीवनाला, कलेला उजाळा दिला ते फ्रान्सचे सुपुत्र याच पवित्र ठिकाणीं मातींत मिसळून गेले आहेत.

Dust Though Art
To Dust Returnest

हें त्यांच्याहि बाबतींत सत्य होय. पण सर्वत्र दरवळणारी त्यांची स्मृति त्यांच्या समाधीचें दर्शन घेतल्यानंतर अधिक भावनोत्कटपणें उत्स्फूर्त होते. म्हणूनच, या जागेला असाधारण महत्त्व. त्या स्मृतीमुळेंच येथील मातीलाहि पवित्रता प्राप्त झाली आहे.

या राष्ट्रपुरुषांचें भाग्य एवढेंच कीं त्यांच्या नश्वर देहावर समाधीचें

आच्छादन उभारलें गेलें. म्हणून, त्यांच्याबद्दल भक्तिभाव वाटणाऱ्या लोकांना तेथें फुलें तरी वाहतां येतात; पण फ्रान्सच्याच नव्हे तर जगाच्या इतिहासाला कलाटणी देणाऱ्या कित्येक महाभागांनीं भूमीचा कोठें आश्रय घेतला असेल हेंहि जगाला विदित नाहीं. इतिहासांतील कांहीं घटनांप्रमाणें त्याहि गोष्टी विस्मृतीच्या उदरांत गडप झाल्या आहेत. पण कित्येक वर्षांनंतर त्या स्मृति जागृत करण्याचे प्रयत्न होतात आणि एखाद्या पुतळ्याच्या रूपानें त्या महाभागांच्या स्मृतीचा गौरव केला जातो. व्यथित मनाला दिलासा देणारे अवशेष हेच होत. त्या अवशेषांची जाणीव मला फ्रेंच राज्यक्रांतीचे दैदीप्यमान नेते—डान्टन आणि रॉब्सपायरे यांच्या साध्यासुध्या आणि विनयशील पुतळ्यांकडे पाहतांना झाली. त्या क्षणीं मला वाटलें हे पुतळे भव्य नाहींत. त्यांच्या कर्तृत्वाला साजेसें स्मारकहि त्यांच्यासाठीं बांधण्यांत आलेलें नाहीं. पण या दगडी पुतळ्यांची आणि स्मारकांची या नेत्यांना आवश्यकता तरी कोणती? "समता, स्वातंत्र्य आणि बंधुत्व" या घोषणांचा वारसा या नेत्यांनीं साऱ्या जगाला दिला. तो वारसा साऱ्या जगांतील दलित जनतेनें आजवर जतन केला. तेंच त्यांचें खरें स्मारक नव्हे काय?

होय. पॅरिसचेंहि तेंच स्मारक आणि तेंच भूषण आहे. चिरकाल टिकणारें. 'आर्च ऑफ ट्रायम्फ' मध्यें पेटलेल्या अमरज्योतीप्रमाणें उज्ज्वल.

बर्लिनच्या विमानतळावर उतरतांक्षणीं तीव्र आणि किंचित् कर्णकठोर असा आवाज माझ्या कानीं आला. मला कळेना, हेच शब्द आपण पूर्वी केव्हां आणि कोठें ऐकले होते. ते दोन शब्द मला अतिपरिचयाचे वाटले खरे. बाहेर पडतां पडतां अनेक वेळां ते माझ्या कानीं पडले. तेव्हां मी बरोबरच्या एका मित्राला विचारलें. तो लगेच मला म्हणाला, "उतारूंना सारख्या ज्या सूचना देण्यांत येतात त्या देण्यापूर्वी लोकांचें लक्ष वेधण्यासाठीं हा निवेदक म्हणत असतोः अटेन्शन, अटेन्शन"

त्याच क्षणीं माझ्या मनांत प्रकाश पडला. होय, अठरा वर्षांपूर्वी नभो-

# बंदिवान झालेला जर्मन गरुड

वाणीवरून असाच आवाज येत असे.

"आखटुंग, आखटुंग—"

आणि मग प्रचंड जयघोष, कोलाहल, तुतारीचे निनाद यांच्या पाठोपाठ कोणी तरी न कळणाऱ्या भाषेंत कांहीं तरी घोषणा करीत असे. त्यांतून अर्थबोध जरी कांहीं झाला नाहीं तरी एवढें कळत असे कीं जर्मन फ्यूरर, हेर हिटलर याचें भाषण आतां लवकरच सुरू होईल.

त्या भाषणासाठीं असंख्य लोक ताटकळत बसलेले असत. भाषणासाठीं कसले ? तो आवाज ऐकण्यासाठीं.

मग तास-दीड तास कानावर नुसता प्रहार व्हावयाचा. तीव्र-कठोर शब्दांची जर्मन आधींच भाषा प्रासादिक नव्हे. प्रभावी मात्र खरी. त्यांतच तारस्वरानें जणु प्रत्येक शब्दागणिक साऱ्या जगाला आव्हान देत हिटलर बोलत असे. त्याच्या भाषणाचा अर्थहि कोणाला कळत नसे पण "जर्मन राइश", "वेल्तेनशॉंग" वगैरे कांहीं परिचित शब्द तेवढे वारंवार कानीं

पडावयाचे आणि त्यांवरून मनाशीं कयास बांधतां यावयाचा कीं जर्मन राष्ट्राला सूर्यप्रकाशांतील आणखी कांहीं भूमि हवी आहे; आणि ती प्राप्त करून घेण्यासाठीं नात्सी जर्मनी एकामागून एक देश पादाक्रान्त करीत आहे.

विजेत्या हिटलरची ती मदोन्मत्त वाणी त्या वेळीं साऱ्या जगाला हादरून टाकीत असे आणि असंख्य लोकांना रोमांचितहि करीत असे. म्हणूनच "आखटुंग, आखटुंग" असे कर्णकठोर शब्द कानीं पडले कीं लोक जणुं कानांत प्राण आणूनजर्मन नभोवाणीच्या घोषणा ऐकावयाला तत्पर रहात असत.

आज तेच शब्द माझ्या कानीं पडत होते आणि खुद्द बर्लिनच्या विमान-तळावर.

पण बर्लिन आता पूर्वीचें कोठें राहिलें आहे ? जर्मन राष्ट्राची राजधानीसुद्धां तेथें राहिलेली नाहीं.

बर्लिन ? पराक्रमी, वैभवशाली, उन्मत्त...पराभूत, खंडित, उध्वस्त झालें आहे तें. क्षणभर डोळ्यांवर विश्वास बसत नाहीं. वाटतें, येथें भूकंप तर झाला नाहीं ना ? भूकंप ? निसर्गाचा कोपहि एवढा आसुरी, एवढा विध्वंसक नसेल! आज एक तपाहून अधिक काळ उलटला आहे. पण हिटलरनें जें 'ब्लिट्झ्क्रीग' सुरू केलें तें त्याच्याच बर्लिनवर इतक्या वेगानें आणि इतक्या अमानुषपणें उलटलें कीं, आजसुद्धां बर्लिनचा बराचसा भाग नुसता बेचिराख होऊन पडला आहे.

युद्ध म्हणजे किती भयानक गोष्ट असूं शकेल याची खरी साक्ष मला बर्लिनला आल्यानंतरच पटली. लंडन आणि पॅरिसमध्यें मी जो विध्वंस पाहिला तो बर्लिनमधील विध्वंसाशीं तुलना करतां मला व्रणासारखा वाटला. जखमेची आठवण करून देणारा तो व्रण खरा. पण बर्लिनच्या जखमा अद्याप बुजल्या नाहींत. त्या जखमांतून अद्याप भळभळ रक्त वाहात आहे. भयानक भूकंप आणि प्रलयंकारी आग याचा संयोग झाल्यानंतर मानवनिर्मित

सृष्टि जशी पत्त्याच्या बंगल्याप्रमाणें कोसळून पडेल तसें बर्लिन जमीनदोस्त झालें आहे. उरला आहे तो मातीचा ढिगारा. त्या ढिगाऱ्यांतच कोठें कोठें दैवानें वांचविलेला एखादा इमारतीचा भाग पायापासून टोकापर्यंत अखंड उभा राहिलेला दिसतो. बर्लिनच्या गतवैभवाची तीच एक साक्ष. पण त्या ढिगाऱ्यापेक्षांहि ती अधिक हृदयभेदक वाटते.

निदान मला वाटली; पण जर्मन मनाला? एका जर्मन इसमानें त्या साऱ्या विध्वंसाकडे निर्विकार दृष्टीनें पहात मला म्हटलें, "विध्वंसाचें आम्हांला एवढें दुःख होत नाहीं. आम्हाला त्याची भीतीहि वाटत नाहीं. रोज रात्रीं, सारखे तीनशेंपासष्ट दिवस दोस्त राष्ट्रांच्या वैमानिक दलानें आमच्यावर आग पाखडली. मी ती आग या डोळ्यांनीं प्रत्यक्ष पाहिली आहे. मृत्यूचें आणि विध्वंसाचें तांडव मी पाहिलें आहे. पण माझें मन अभंग राहिलें आहे. मला सहन मात्र होत नाहीं तें आमचें पारतंत्र्य. त्या पाहा त्याच्या खुणा..."

तो बोट दाखवीत होता समोरच्या कांटेरी तारांकडे. त्या कांटेरी तारांच्या पलीकडे सोव्हिएटअंकित बर्लिनचा भाग होता. बर्लिनची जखम जी भळभळत आहे, अहंकारी जर्मन अंतःकरणाला ज्या तीव्र वेदना होत आहेत त्या या पारतंत्र्याच्या जाणिवेनें, जर्मन राष्ट्रावर जबरदस्तीनें लादण्यांत आलेल्या फाळणीबद्दलच्या तिरस्कारामुळें.

योगायोग असा कीं, बर्लिनमधील जो इतिहासप्रसिद्ध विभाग आहे तो बहुशः सोव्हिएटच्या ताब्यांत आहे. हिटलरची चान्सलरी, राइशस्टॅग म्हणजे जर्मन पार्लमेंटची इमारत, त्याच्यासमोरचा उंटर डेन लिंडेन म्हणून प्रसिद्ध असलेला राजमार्ग हा तारांच्या कुंपणानें वेष्टित असा आहे. राइशस्टॅगच्या इमारतीकडे मीं पाहिलें आणि पंचवीस वर्षांपूर्वीचा इतिहास माझ्या डोळ्यासमोर उभा राहिला. जर्मन लोकसत्तेचें हें प्रतीक होतें. हिटलरनें लोकसत्तेला नख लावण्याच्या हेतूनें या प्रतीकाला चूड लावली. त्यांत लोकसत्ता जळून खाक झाली. पण इतिहासानें सूड घेतला आणि अखेरीस राइशस्टॅगच्या

आसमंतांतच हिटलरला आपल्या प्रेयसीसह स्वतःला जाळून घ्यावें लागलें.

बर्लिनच्या त्या उद्ध्वस्त भागांत हिंडतां हिंडतां माझ्या मनांत विचार येत होता, हिटलर आणि नात्सी पक्षाच्या अपराध्यांचें प्रायश्चित्त साऱ्या जर्मन राष्ट्राला कां भोगावें लागावें? आणि कसलें हें प्रायश्चित्त! पूर्व आणि पश्चिम जर्मनीची ताटातूट ही जगाच्या इतिहासांतील एक अत्यंत हृदयविदारक घटना मानावी लागेल. कांटेरी तारांचें तें कुंपण, संगिनी घेतलेले रशियन सैनिक; जर्मनीच्या दास्याची घोषणा करणारा तो सोव्हिएट सैनिकाचा भव्य पुतळा, या तर पारतंत्र्याच्या मूर्त खुणा; पण त्याहिपेक्षां भेदक नि अमूर्त अशी खूणगांठ चार जर्मन लोकांशीं घटकाभर बोलल्यानंतर आपल्या मनाला बांधतां येते. ती खूणगांठ म्हणजे भावाभावांचीं दुरावलीं जाणारीं मनें. हीं मनें परिस्थितीमुळें दुरावत आहेत. कदाचित्, तसा आभाससुद्धां जाणून बुजून निर्माण केला जात असेल. आजच्या या निष्ठुर जगांत आपलें अंतरंग कोण प्रकट करूं शकेल? आणि पूर्व जर्मनींतील लोकांना रशियन कॉन्सेंट्रेशन कँपची दहशत जोंवर भेडसावीत राहील तोंवर आपल्या मनांतील आकांक्षा त्यांच्यापैकीं कोण उघडपणानें व्यक्त करील? त्यांच्यापुढें प्रश्न उभा आहे तो जीवनमरणाचा. पूर्व जर्मनींतील सोव्हिएटच्या पंखाखालीं उभ्या राहिलेल्या जीवनाची झळ सहन करण्याचा किंवा त्यांच्या-विरुद्ध बंड पुकारून मरणाचा मार्ग स्वीकारण्याचा. या जीवनमरणांत एक आशातंतु आहे. तो पलायनाचा. त्या दृष्टीनें पश्चिम बर्लिनचें अस्तित्व हा एक सुटकेचा निश्चित मार्ग राहिला आहे. पूर्व जर्मनींतील कामगार आणि शेतकरी कामानिमित्त वा धंद्याच्या आमिषानें बर्लिनच्या पश्चिम विभागांत येऊं शकतात. एकदा या विभागांत पाऊल टाकलें कीं पूर्व जर्मनींतील सारे पाश तोडून त्या लोकांना पश्चिम जर्मनीचा कायमचा आश्रय घेतां येतो. ही सवलत सर्वांनाच मिळते असें नव्हे. ज्यांना ती मिळत नाहीं ते त्याहिपेक्षां धाडसाचा मार्ग स्वीकारतात आणि महत्प्रयासानें व सर्व प्रकारच्या

संकटांना तोंड देऊन ते रात्रींच्या अंधारांत पूर्व जर्मनीची सरहद्द ओलांडून पश्चिम जर्मनींत पाऊल टाकतात. पूर्व जर्मनींतील हजारों लोकांनीं अशा रीतीनें स्वातंत्र्याची निवड केली आहे. आजसुद्धां जवळजवळ चार हजार निर्वासित दर महिन्याला पूर्व विभागांतून पश्चिमेकडे येतात.

या निर्वासितांसाठीं पश्चिम जर्मन सरकारनें बर्लिनमध्यें छावण्या उघडल्या आहेत. त्यांपैकीं एका छावणीला मीं भेट दिली. ही छावणी कसली? आपल्याकडे विद्यार्थ्यांचें वसतिगृहसुद्धां इतकें सुबक व सुखसोयींनीं समृद्ध नसेल. मला आश्चर्य वाटलें तें असें कीं, निर्वासितांच्या आगमनाचें सरकारला संकट वाटत नाहीं. उलट पूर्व जर्मनींतील कामगार व हरहुन्नरी लोक जेवढे इकडे येतील, तेवढे त्यांना हवेच आहेत. त्याचें कारण असें कीं, जर्मनीमध्यें आज तरुण पुरुषांची वाण आहे. पश्चिम जर्मनीचा औद्योगिक विकासहि इतक्या झपाट्यानें होत आहे कीं, जर्मन सरकारला या निर्वासितांना कामधंदा देणेंहि मुळींच कठीण वाटत नाहीं. या छावणींतील प्रमुखानें तर मला म्हटलें की, "आम्ही या सर्व निर्वासितांना एक महिनाभर येथें शिक्षण देतों. अर्थातच त्यांच्या राजकीय जीवनाबद्दल मात्र आम्हांला कसोशीनें चौकशी करावी लागते. कारण कम्युनिस्टांनीं आमच्यामध्यें हेरगिरी करूं नये एवढी आम्हांला खबरदारी घ्यावी लागते. तेवढें समाधान करून घेतलें कीं आम्ही लगेच या निर्वासितांना त्यांच्या आवडीप्रमाणें कामधंदा देतों. निर्वासित जेवढे येतील तेवढें आम्हांला फायदेशीरच आहे. इटलींतील कामगारांनासुद्धां आम्ही कामानिमित्त इकडे आणतों."

पश्चिम जर्मनीच्या औद्योगिक प्रगतीची कल्पना या उद्गारांवरून सहज होऊं शकेल. बर्लिनमध्यें आणि जर्मनीच्या न्हूर परगण्यांत हिंडत असतांना जर्मनीच्या पुनरुज्जीवनाची मला पुरेपूर कल्पना आली. एसेन या पोलाद व कोळशाच्या खाणींच्या विभागांत इतका बॉंबवर्षाव करण्यांत आला होता कीं तेथें सात वर्षांपूर्वीं एकहि घर उभें असलेलें दिसलें नसतें; पण आज

दा. क्र. १०७८६

एसेनमधील प्रत्येक कारखाना व कोळशाची खाण रात्रंदिवस चालू आहे. ड्यूसेलडॉर्फपासून बॉनपर्यंत सुमारें दोनशें मैलांचा प्रवास मीं केला. 'ऑटोबान' म्हणून प्रसिद्ध असलेल्या राजरस्त्यानें आमची मोटार जात होती. रस्ता सीमेंट-कॉंक्रीटचा. दृष्टि ठरणार नाहीं इतक्या दूरवर सरळ रेषाच जणूं मारलेली आहे असें रस्त्याचें स्वरूप. रस्त्यांत मध्यें अडथळा नाहीं. एखाद्या गांवाची सीमारेषा आली की एक गल्ली राजरस्त्याला मिळते—नदीच्या ओघांत हळूच प्रवेश करणाऱ्या ओढ्याओहळाप्रमाणें. ताशीं ऐंशी मैल वेगानें सहज रीतीनें प्रवास करीत असतांना तिच्याकडे पाहावें न पाहावें तोंच ती राजरस्त्यांत समरसहि होऊन जाते. तुफान वेगानें धावणाऱ्या आगगाडीनें स्टेशनच्या आवारांत खडखडाट करीत रूळ बदलावे तसें या राजरस्त्यानें उजवीडावीकडे व्हावें लागतें एवढेंच. आगगाडीचा खडखडाट तरी होतो, ऑटोबानवरील मोटारीला नुसता धक्कासुद्धां बसत नाहीं. 'मर्सीडिस बेन्झ' या दणकट पण तितक्याच सोयीस्कर गाडींत खुशाल मागें रेलून बसावें आणि आसमंतांतील हिरव्यागार वनश्रीकडे पाहतां पाहतां मधून्नच मीटरकडे लक्ष द्यावें, म्हणजे या राजरस्त्याचें वैभव कळून येईल. किती शेंकडों किलोमीटर्स हें या राजरस्त्यावरील प्रवासाचें खरें प्रमाण आहे, आणि किती किमान वेळांत हा रस्ता काटला जातो हें या मोटारींचें वैशिष्ट्य आहे. बेसुमार अंतर आणि बेफाम वेग यांची जोड जमल्यानंतरहि प्रवाश्याच्या शरीरावर आणि मनावर परिणाम काय ? तर कांहीं नाहीं ? कपडे स्वच्छ, मन आनंदी आणि शरीर तजेलदार.

बाकी जें दृश्य आपल्या दृष्टीस पडतें त्यानें मन नुसतें आनंदीच नव्हे तर मोहित होऊन जातें. जर्मनीच्या जीवनांत मेळच मोठा अपूर्व. बर्लिन हें शहर तर अगदीं औद्योगिक केंद्र. नाना प्रकारच्या कारखान्यांनीं हें शहर आतां सुद्धां भरगच्च भरलेलें आहे. पश्चिम जर्मनीच्या ताब्यांत जो बर्लिनचा भाग आलेला आहे त्यांत आतां विध्वंसाच्या खुणाहि राहिलेल्या नाहींत.

सारीं नवीं घरें, सारे नवे चकचकीत रस्ते आणि घरें तरी कशीं! आधुनिक पद्धतीनें बांधलेलीं, हवेशीर, नव्या घडणीचीं, साऱ्या सुखसोयींनीं सज्ज. या घरांच्या समोर लहान लहान सज्जे आणि गॅलऱ्या. त्यांत कुंड्या हारीनें मांडलेल्या आणि त्यांत गोंडस, रंगीबेरंगीं फुलें फुललेलीं. एखाद्या रस्त्यावरील घरें पाहावीं. फुलांची अशी विविधता डोळ्यांना दिसते की जणूं कांहीं रांगोळीच काढलेली आहे! बर्लिनच्या या रसिकतेचें मला विलक्षण कौतुक वाटलें. लहानसें घर असो, त्याच्यासमोर छोटासा बगीचा फुललेला. मोठी दहापंधरा मजली इमारत असो, प्रत्येक घरांत विविध फुलांचा जणुं मोहरच बहरलेला दिसून येतो.

हेंच दृश्य पण फार मोठ्या प्रमाणावर शहराबाहेरच्या जगांत दिसून येतें. कोळशाच्या खाणी ऱ्हूरला सभोवार पसरलेल्या आहेत. पण त्या भूगर्भात. त्याच्यावर हिरवीगार वनश्री. कारखान्याच्या बाजूलाच कामगारांचीं टुमदार घरें. त्यांत बिजली असावयाचीच आणि रेडियोहि. खाणींतील कामगार बाहेर पडेल तोहि स्वच्छ आंघोळ केलेला, सफेद कपडे घातलेला. कामावर जातांना त्याच्या हातांत एक दिवा असतो, तोहि कसा स्वच्छ व चकचकीत. कामावरून घरीं परत आले कीं त्याच्यासाटीं करमणुकीचीं साधनें तयार असावयाचीं. मग कधीं आपल्या बागेंत तो रेडियो ऐकत बसेल तर कधीं खाणकामगारांच्या क्लबांत जाऊन तो काळी बव्हेरीन बीअर प्राशन करील. काळसर रंगाची पण कडवटपणा अणुमात्रहि नसलेली बीअर ही जर्मन कामगारांची एक अत्यंत अवडती गोष्ट होय. उन्हाळ्याच्या दिवसांत ही बीअर आणि थंडीच्या दिवसांत उष्णता निर्माण करणारी रम हीं दोन पेयें जर्मन कामगारांना अगदीं अपरिहार्य अशीं वाटतात.

पण जर्मनीच्या विलासाची साक्ष यांत मिळावयाची नाहीं. त्यासाटीं 'ऱ्हाइन वाइन'चाच आस्वाद घेतला पाहिजे. ऱ्हाइन नदी ही जर्मन लोकांना गंगेइतकीच पवित्र नसली तरी प्रिय वाटते. बर्लिनजवळून ती वाहत अस-

तांना मीं पाहिली. तिच्या सान्निध्यामुळें बर्लिनला शोभा आली आहे आणि समृद्धताहि प्राप्त झाली आहे. जर्मनीच्या कोनाकोपऱ्यांतून जें धनधान्य, खनिज संपत्ति, यंत्रसामग्री निर्माण होते ती बर्लिनपर्यंत वाहून आणण्याचें कार्य ऱ्हाईन नदीच करते. याच नदीच्या पाण्यानें जर्मनींतील धान्यांचे आणि द्राक्षांचे मळे फुलतात. त्याच द्राक्षांचा मधुर रस म्हणजे 'ऱ्हाइन मद्य'. या मद्याचें वैशिष्ट्य असें की जितका पुराणा त्याचा साठा तितकी त्याची माधुरी अधिक. स्फटिकासारखें पांढरें शुभ्र हें मद्य. अति लहान, सुबक प्याल्यांतून तें घ्यावयाचें. ओठावर त्याचा एक थेंब पडला तरी कांहींतरी मधुर पण विलक्षण उत्तेजक असें पेय घेतल्याची भावना निर्माण होते आणि सर्वांगाला कशा गोड झिणझिण्या येतात. ऱ्हाइनच्या सान्निध्याइतकाच उन्मादक तो अनुभव. त्याची गोडी जितकी अवीट तितकीच त्याची आठवण मनोमनीं तरंगत राहणारी.

बर्लिनची आठवण झाली कीं याच काय, अशा अनंत आठवणी मनांत गोळा होतात. त्या दुःखाच्या तशाच सुखाच्या. दुःख जर्मनीच्या पारतंत्र्या-बद्दलचें, सुख जर्मन राष्ट्राच्या पुनरुज्जीवनाबद्दलचें. सात वर्षांचा लहानसा काळ. पण जर्मनीनें आपल्या विध्वंसाचा गदारोळ दूर केला आहे आणि आणि नव्या उमेदीनें आणि विलक्षण आत्मविश्वासानें आपल्या जीवनाची नवी घडण उभी केली आहे. ती घडण मुख्यतः औद्योगिक आहे. पूर्व आणि पश्चिम जर्मनींतील फरक असेल तर तो हाच कीं पूर्व जर्मनींतील जीवन मुख्यतः शेतकीप्रधान, तर पश्चिम जर्मनींतील औद्योगिक; म्हणूनच पश्चिम जर्मनींतील लोकांचें जीवनमान झपाट्यानें सुधारत चाललें आहे. सोव्हिएटव्याप्त जर्मनीच्या दृष्टीनें तेंच खरें संकट होय. त्या संकटाची चाहूल पूर्व जर्मनीला लागली आहे. पण कष्टमय जीवनांतून सुटका करून घेण्यासाठीं पश्चिम जर्मनीकडे वाहणारा निर्वासितांचा लोंढा सोव्हिएटव्याप्त जर्मन सरकार कसें थोपवून धरूं शकेल? त्यांत या सरकारला अपयश आलें आहे आणि

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम २६४५१ वि: भू-प्रवास...
पश्चिमेचें क्षणदर्शन
क्रमांक ...२६५८ नों: दि: ..२४/३/६०

पूर्व बर्लिनमध्यें दोन वर्षांपूर्वीं कामगारांनीं जो बंडाचा झेंडा उभारला त्यामुळें तर काळाची पाऊलवाटहि या सरकारला कळून चुकली आहे. ती पाऊलवाट पुसून टाकण्यासाठीं रशियानें आपले रणगाडे जर्मन कामगारांवर चालविले. त्यामुळें बंड चिरडलें गेलें; पण जर्मन कामगारांच्या मनांतील असंतोषाचा वडवानल मात्र शमला नाहीं. त्याची आग प्रकट होत नाहीं, पण ती धुमसत आहे.

पश्चिम जर्मनींतील नेत्यांना आणि लोकांना या धुमसणाऱ्या आगीची कल्पना आहे. त्यांच्यांपैकीं एक समाजवादी नेता मला म्हणाला, "जर्मन राष्ट्र पराभूत झालें आहे, खंडित झालें आहे; पण तें फार काळ पराभूत आणि खंडित राहणार नाहीं. युद्धानंतर विजेत्या राष्ट्रांपैकीं कांहीं राष्ट्रांनीं आमची यंत्रसामग्री उचलून नेली, तें ठीकच झालें; कारण जुन्या यंत्रसामग्रीनें आमचे पाय बांधले गेले असते तें टळलें. आम्ही नवी यंत्रसामग्री इतक्या पद्धतशीरपणें तयार केली कीं आज आमचें उत्पादन निर्यात व्यापारासाठीं तयार झालें आहे. दुसऱ्या कांहीं विजेत्या राष्ट्रांनीं आमचे शास्त्रज्ञ उचलून नेले. त्यांनीं हैड्रोजन बॉंब तयार केला. त्याचें फळ रशियाला मिळालें खरें; पण रशियन प्रगतीमागें जर्मन शास्त्रज्ञांचीच कल्पकता दडलेली आहे याची जाणीव साऱ्या जगाला झालेली आहे. जें राष्ट्र पराभूत अवस्थेंतहि इतका औद्योगिक पाया घालूं शकतें आणि आपल्या संशोधनानें साऱ्या जगाचे डोळे दिपवून टाकूं शकतें, तें राष्ट्र किती काळ पराभूत व खंडित राहूं शकेल? आज ना उद्यां आम्ही एक होऊं आणि त्याच दिवशीं युरोपांतील सोव्हिएट नेपोलियनवादाला कायमचा पायबंद बसेल."

ऱ्हाइनच्या तीरावरील एका विश्रांतिगृहांत आम्ही बसलों होतों. तो समाजवादी बोलत होता अतीव उत्साहानें, आत्मविश्वासानें. तो म्हणाला, "फिनिक्स पक्षाची कहाणी तुम्हांला माहीत आहे?"

"होय." मीं म्हटलें, "राखेंतूनच हा पक्षी पुनरुज्जीवित होतो."

"रक्षेंतूनच जर्मन राष्ट्र पुन्हा उदयाला येईल" त्यानें ठासून म्हटलें. "पण या वेळीं आक्रमक राष्ट्रीयवादाचें निशाण घेऊन तें उदयाला येणार नाहीं. राइशस्टॅगला हिटलरनें आग लावली. वायमर रिपब्लिकनें ज्या प्रगतिपर लोकसत्तावादी राज्यघटनेची मुहूर्तमेढ रोवली होती तिचें प्रतीक हिटलरला नष्ट करावयाचें होतें म्हणून त्यानें ती आग लावली. पण त्या आगींत तो व त्याचें तत्त्वज्ञान भस्मीभूत झालें. आज दुसऱ्या एका हुकूमशाहीवादी शक्तीनें राइशस्टॅगचा ताबा घेतला आहे. म्हणूनच लोकसत्तेचें हें प्रतीक उद्ध्वस्त अवस्थेंत ठेवण्याचाच त्या सत्तेनें पण केला आहे. बर्लिनचा तो उद्ध्वस्त भाग तुम्हीं पाहिलात ना?"

"होय." मीं खेदानें म्हटलें.

माझ्या उद्गारांतील खिन्नपणा त्याला जाणवला. तो लगेच हंसून म्हणाला, "पण बॉनमध्यें बुन्डेस्टागची नवी कोरी, भव्य इमारत तुम्ही पाहिलीत ना? तें आमचें पार्लमेंट, तें आमच्या लोकसत्तेचें प्रतीक. लवकरच वेळ अशी येईल कीं, बॉनमध्यें अडकून पडलेलें आमचें सरकार एकच झेप घेईल आणि ती झेप नव्हे ती गरुडभरारी ठरेल."

आर्नो शोल्झ त्या सभासदाचें नांव. त्यानें गरुडभरारीचा जो उल्लेख केला तो जर्मन पुनरुज्जीवनाची किती विलक्षण पण यथार्थ कल्पना देणारा मला वाटला.

संध्याकाळच्या त्या शांत वेळीं ऱ्हाइन नदीच्या प्रवाहाकडे पाहतां पाहतां मला अचानक यशवंतांच्या 'बंदिवान गरुडा'ची आठवण झाली. त्या कवितेंतील प्रत्येक ओळ मला जर्मन राष्ट्राच्या आजच्या अस्तित्वाचीच द्योतक वाटली.

शोल्झ निघून गेल्यानंतरहि त्या प्रवाहाकडे खिन्नपणें पाहत मी गुणगुणत होतों :

" झुंजझुंजुनी देवांनाहि
तुवांच केलें त्राही त्राही
निनादती या दिशांत दाही
अजुनी कीर्तितुतारी
गरुडा घेशिल केविं भरारी ?

त्याच वेळीं माझ्या डोळ्यासमोर बर्लिनचा विध्वंस आणि कांटेरी तारांचें कुंपण उभें राहिलें. माझ्या मनांत विचार आला,

स्मरुनी घडिघडि गत विभवाला
देखुनि आल्या आपत्काला
जिणें मरणसें होइल तुजला
तव कोण विमोचनकारी ?
गरुडा, घेशिल केविं भरारी ?

या हृदयस्पर्शी काव्यपंक्ति यशवंतांनीं कोणाला उद्देशून बरें लिहिल्या असतील ?

अर्थात् जर्मन गरुडाला उद्देशून खास नव्हे. कारण या बंदिवान गरुडाचा विमोचक बाहेरून येणार नाहीं.

जर्मन राष्ट्र स्वतःच स्वतःची मुक्तता करील, आणि त्या वेळीं बर्लिन ही पुन्हां एकदा जर्मनीची राजधानी होईल.

अटलांटिक महासागराच्या पलीकडे. हिंदुस्थानचा शोध घेण्यासाठीं निघालेला कोलंबस या जगांत येऊन पोहोंचला. त्याला हें नवें जग हिंदुस्थानच वाटलें. म्हणून लालसर रंगाच्या तेथील रहिवाशांना त्यानें रेड इंडियन हें नांव दिलें. फक्त पांचशें वर्षांपूर्वींची ही गोष्ट. त्यानंतर दोनशें वर्षांनीं 'मेफ्लॉवर' या गलबतांतून पहिले 'पिलग्रिम फादर्स' या जगांत येऊन उतरले.

पण तीनशें वर्षांच्या या काळांत या नव्या जगानें जी प्रगति केली आहे तिला मानवी इतिहासांत तोड नसेल. फक्त तीनशें वर्षें. राष्ट्राच्या इतिहासांत या कालखंडाला कितीसें महत्त्व असणार? पण या लहानशा कालखंडांत

# वेगवान् यंत्रयुगाचे श्रीमंत वारस

कोलंबसानें शोधलेली आणि ख्रिस्ती मिशनऱ्यांच्या लहानशा टोळीनें वसाहत केलेली अमेरिका समृद्धतेचा, वैभवाचा, आणि मानवी कर्तृत्वाचा आदर्श बनली आहे.

तुम्ही म्हणाल, आणि नाक मुरडून म्हणाल, "हें तर आम्ही नेहमींच ऐकत आलों आहों; अमेरिकेंतून परतणारी प्रत्येक व्यक्ति अमेरिकेच्या वैभवाची आणि अमर्याद प्रगतीची तोंड फाटेपर्यंत स्तुति करते; हा तर आमचा नेहमींचाच अनुभव. मग तुम्ही नवें तें काय सांगणार आहां?"

तुमचा संशय खरा असेल. पण असे अधीर होऊं नका. मी कांहीं तुम्हांला 'एम्पायर स्टेट बिल्डिंग' च्या १०२ व्या मजल्यावर नेणार नाहीं. त्यांत नावीन्य असें काय राहिलें आहे? 'ॲन अफेअर टु रिमेंबर' म्हणूनच तुम्ही दैनंदिन चित्रपटांत दृश्यमान होणाऱ्या या इमारतीचा विचार करूं लागलां असाल. आकाशाला भिडूं पाहणाऱ्या इमारती हें अमेरिकेचें वैशिष्ट्य थोडेंच राहिलें आहे?

पण एवढें मात्र लक्षांत असूं द्या की अमेरिकन जीवनाचा चित्रपट पाहणें आणि त्या जीवनाचें प्रत्यक्ष दर्शन घेणें यांत मायाजाल व वास्तवसृष्टि यांच्या-इतकेंच अंतर आहे. अमेरिकन जीवनाचें जें विहंगम दृश्य मीं पाहिलें आणि त्या जीवनाचा जो कांहीं थोडाफार प्रत्यक्ष अनुभव मीं घेतला त्यावरून मी एकच लहानसा पण निश्चित आडाखा बांधला कीं अमेरिका म्हणजे हॉलिवुड नव्हे; आणि हॉलिवुड म्हणजे अमेरिका नव्हे ! !

वाटेल तर 'संपूर्णपणें' हा एकच शब्द या दोन्ही वाक्यांत घाला. म्हणजे तर अतिशयोक्तीचाहि तुम्हांला या विधानांत भास होणार नाहीं.

माझें म्हणणें काय आहे तें तुमच्या लक्षांत आलें का ? अमेरिकेबद्दल आपल्याकडे सर्वसाधारणपणें जें मत, जो समज, ज्या कल्पना रूढ आहेत त्या बऱ्याचशा अतिरंजित, पुष्कळशा अवास्तव आहेत असें मला मुद्दाम सांगावयाचें आहे.

होय. अमेरिका श्रीमंत आहे. खरोखर सोन्याचा धूर जगांतील कोणत्या एका देशांत निघत असेल तर तो अमेरिकेंत. मीं अमेरिकेचें औद्योगिक जीवन पाहिलें. फक्त ५५ सेकंदांत एक सबंध मोटारगाडी एकत्रित झालेली मीं प्रत्यक्ष या डोळ्यांनीं पाहिली. अशा लक्षावधि गाड्या दरवर्षी त्या देशांत देशांत तयार होतात. डेट्रॉइट हें मोटार–कारखान्यांचें मुख्य केंद्र. तेथें पादचाऱ्यांपेक्षां मोटारीच मला अधिक दिसल्या.

तेथेंच युनायटेड ऑटोमोबाइल वर्कर्स युनियन (U. A. W.) ही वॉल्टर रूथर यांच्या नेतृत्वाखालील कामकरी संघटना आहे. ही कामगारांची संघटना, पण वॉल्टर रूथर यांना भेटण्यासाठीं मी त्या संघटनेच्या कचेरींत गेलों तेव्हां येथील रुबाब पाहून माझे डोळे दिपून गेले. प्रचंड दहा मजली इमारत. सारी एअरकन्डिशन्ड. खालच्या मजल्यावर एका कामगाराचा भव्य पुतळा आहे. म्हणूनच कामकरी संघटनेच्या व्यक्तित्वाची जाणीव होते. नाहींतर एखाद्या 'टाटा हाऊस'लाहि त्या इमारतीनें मागें टाकलें असतें.

अमेरिकेच्या श्रीमंतीची यावरून सुद्धां कल्पना करतां येण्यासारखी आहे. पण त्यांतूनच अमेरिकेच्या सामाजिक जीवनाचें वैशिष्ट्य प्रकट होत नाहीं का? हें वैशिष्ट्य असें कीं, अमेरिकेची श्रीमंती फक्त मूटभर धनिकांपुरतीच मर्यादित राहिलेली नाहीं. ती समाजांतील खालच्या थरापर्यंत या ना त्या प्रमाणांत पोचलेली आहे. म्हणजे अमेरिकेंत विषमता उरलेली नाहीं असें नव्हे. पण मागासलेल्या देशांत ती विषमता ज्या तीव्रतेनें दिसून येते किंवा इतर पुढारलेल्या देशांतहि तिचें स्वरूप ज्या प्रमाणांत व्यक्त होतें तितकें अमेरिकेंत दिसून येत नाहीं.

म्हणून अमेरिकेच्या श्रीमंतीचा हेवा करण्याचें कारण नाहीं. उलट क्रांतिकारक उठावांशिवाय खासगी भांडवलदारांना वठणीवर आणून अमेरिकन कामगारांनीं जे हक्क आणि त्याबरोबरचें उच्च प्रकारचें जीवनमान पैदा केलें त्याबद्दल अभिमान बाळगणेंच अधिक इष्ट आहे. अमेरिकन कामगारांना अर्थातच त्यासाठीं अटीतटीचा लढा द्यावा लागला. पण तो लढा देतांना कामगारांनीं दोन गोष्टी केल्या. एक आपलें रोजंदारीचें काम जबाबदारीनें पार पाडलें आणि आपल्या श्रमांच्या साहाय्यानें देशाचें उत्पादन वाढविलें आणि भांडवलदारांनाहि बरकत आणली. दुसरें, त्यांनीं आपल्या युनियन्सची संघटना इतकी बळकट केली कीं युनियनच्या संमतीशिवाय कोणाला कामावरून दूर करणें तर नव्हेच, पण कामावर ठेवणेंहि भांडवलदारांना जड जाऊं लागलें. आज अमेरिकेंतील कामकरी संघटनेच्या गाठीं इतकीं पुण्याई आहे की युनियनचें कार्ड असलें की नोकरीची शाश्वती, कामाच्या वेळेबद्दलची निश्चितता आणि पगारवाढ व इतर हक्कांबद्दलची ग्वाही अशा सर्व सवलती बिनदिक्कतपणें कामगाराला प्राप्त होतात.

अमेरिकन कामगाराला म्हणूनच युनियन हेंच खरें आपलें आश्रयस्थान वाटतें. त्याला नोकरी मिळवून देणें, त्याच्या हक्कांबद्दल जागरूक असणें, मालकांशीं वाटाघाटी करून त्याच्यावर होत असलेलें अन्याय दूर करणें,

कौटुंबिक जीवनांत त्याला सुख प्राप्त व्हावें म्हणून हरएक प्रकारची मदत करणें, त्याच्या व त्याच्या कुटुंबांतील लोकांच्या करमणुकीची व्यवस्था करणें, वगैरे अनेक प्रकारचें साहाय्य अमेरिकन कामगाराला युनियन करीत असतें. विद्युत्कारखान्यांत काम करणाऱ्या कामगाराच्या न्यूयॉर्कमधील एका युनियनमध्यें मी गेलों तेव्हां तेथें कामगारांना इन्शुअरन्सचा जो हप्ता दर महिन्याला मिळत असतो, त्याचे चेक युनियन देत असलेली मला आढळून आली. लक्षावधि डॉलर्सचा असा व्यवहार दर महिन्याला युनियन करीत असते. मीं त्यांपैकीं कांहीं चेक पाहिले. साधारणपणें कमींत कमी चेक १८ ते २० डॉलर्सचा होता. ही कामगाराची एका व्यवहारांतील बचत. मी युनियनच्या पुढाऱ्यांना म्हटलें, "आमच्या देशांतील सर्वसाधारण कामगाराला महिन्याला इतका पगार मिळाला म्हणजे पुरे."

त्यांना माझ्या या उद्‌गारांचें आश्चर्य वाटलें. अमेरिकन कामगार आठवड्यांतून फक्त पांच दिवस काम करतो. शनिवार आणि रविवार हे दोन्हीहि त्याचे सुटीचे दिवस. पण वॉल्टर रूथर यांची मागणी आहे ती तीस तासांच्या आठवड्याची, आणि त्यांना खात्री आहे कीं, कांहीं वर्षांच्या आंतच ती मागणी पुरी केली जाईल. अमेरिकन कामगाराच्या जीवनाला जी स्वस्थता मिळत आहे त्याची यावरून कल्पना करतां येईल. त्याशिवाय अनेक सुखसोयीच्या व चैनीच्या वस्तु त्यांना लहान हप्त्यांनीं मिळत असल्यामुळें अमेरिकन कामगारांच्या जीवनांत समृद्धताहि आलेली आहे. कामगारांच्या वस्तींत कोठेंहि हिंडावें, आपल्याला तेथें घरासमोर एक तरी मोटारगाडी आढळून येईल. घरांत रेडिओ आणि रेफ्रिजरेटर, इतकेंच नव्हे तर टेलिव्हिजनचा सेटहि नसला तरच आश्चर्य. कामगारांसाठीं खास वस्त्या असल्या तर बंगल्यांची रचना कशी टुमदार असते. मग समोर लहानसा बाग, मोटारीसाठीं गॅरेज, लहान मुलांसाठीं नमुनेदार खेळणीं अस्ताव्यस्त पडलेलीं असा थाट दृष्टीस पडावयाचा. कामगारसुद्धां असे हौशी कीं शहरांतील फ्लॅटमध्यें रहावें

लागलें तर गांवाबाहेर बगीच्याचा एक प्लॉट ते भाड्यानें घेतील आणि सुट्टीचे दोन दिवस त्या बगीच्यामध्येंच ते काढतील. न्यूयॉर्क आणि वॉशिंग्टनच्या आसपास कित्येक एकर जमीन अशी बगीच्यांच्या प्लॉट्स्साठीं राखून ठेवण्यांत आलेली असते. त्यांत लहानसें झोपडें असतें आणि फुलझाडें आणि भाजीपाले व फळफळावळ यांची मशागत मोठ्या अगत्यानें तेथें केली जाते.

अशा तऱ्हेचें समृद्ध जीवन हा अमेरिकेंत नियम आहे; आपल्याप्रमाणें तो अपवाद नव्हे. कनिष्ठ प्रकारचें काम करणाऱ्या लोकांनाहि आपल्या येथें लब्धप्रतिष्ठितांना मिळणार नाहीं असें जीवन मिळतें. तेथें घरकाम करणारे नोकर ठेवणें कोणालाच परवडत नाहीं. सारें काम जो तो हातानेंच करतो. कधीं आठवड्यांतून साफसफाईसाठीं किंवा एखादी पार्टी असली तर मदतीसाठीं कोणा नोकराला वा मोलकरणीला बोलाविलें तर तासाला डॉलर दीड-डॉलर देण्याची तयारी ठेवावी लागते. एके दिवशीं एका घरीं मी जेवायला गेलों होतों. तेव्हां तेथें मदतीसाठीं एक निग्रो स्त्री आली होती, पुढें दोन दिवसांनीं तीच स्त्री मला 'हॉटेल कमोडोर' मध्यें भेटली. भपकेबाज पोशाख घालून ती आपल्या पतीबरोबर 'डान्स' साठीं आलेली होती.

'हॉटेल कमोडोर' हें न्यूयॉर्कमधील एक नमुनेदार हॉटेल आहे. तिथें बोलतां बोलतां हेड वेटरनें मला एक गमतीदार हकीकत सांगितली. तो म्हणाला, "या हॉटेलमधील नोकर दर दोन वर्षांनीं युरोपच्या प्रवासाला जातात आणि येतांना तेथून लहान मोटारगाड्या घेऊन येतात."

या लहान मोटारगाड्यांचें अमेरिकेंत फार कौतुक आहे. मला तर अमेरिकेंत साध्या मोटारगाड्या, लांबरुंद, चकचकीत आणि ऐटबाज अशा आढळल्या. चार दोन वर्षें या गाड्या वापराव्या, साऱ्या कुटुंबासहित त्यांतून अमेरिकेच्या अवाढव्य पसरलेल्या प्रदेशांत प्रवास करावा आणि खुशाल त्या कचऱ्यांत टाकून द्याव्या, असा मोटारीबद्दलचा अमेरिकेंतील दृष्टिकोन आहे. मोटारगाड्या बरींच वर्षें टिकाव्या या दृष्टीनें त्यांची बांधणी केलीच जात

नाहीं. तत्कालिक उपयुक्तता हाच त्या भागांतील दृष्टिकोन. न्यूयॉर्कच्या गोदी विभागांत हिंडतांना अशा मोटारींचे ढिगारे साठवून ठेवलेले मला आढळले. मला तर त्यांतील कित्येक मोटारी नव्या कोऱ्या करकरीत वाटल्या. कित्येक मोटारींवरील रंगहि उडून गेला नव्हता. पण त्या गंजलेल्या मालाच्या भावानें विकत घेऊन तेथें टाकण्यांत आल्या होत्या. आपल्याकडे ज्या मोटारींचें रूप पाहून डोळे दिपून जातील ती अमेरिकेंत जुनीपुराणी नव्हे तर 'कचरा' म्हणून मानली जात होती.

त्याविषयीं अमेरिकेंतील कोणाला खंतहि वाटत नाहीं. हप्त्यावर त्यांचें जीवन चालत आहे. दहा डॉलर्सचा एक हप्ता टाकला की नवी कोरी गाडी दाराशीं उभी राहत असतांना त्यांना जुन्या गाडीचा मोह कां वाटावा? एकेक नवीन गाडी अधिकाधिक सुरेख आणि सोयीस्कर कशी करावी याचा मात्र मोटारींचे कारखानदार विचार करीत असतात. त्या कारखानदारांची खरी बाजारपेठ आपला देश हीच होय. म्हणून आपल्या ग्राहकांचें समाधान करण्याची त्यांची पराकाष्ठा चाललेली असते. अमेरिकन ग्राहकहि नवीन मॉडेल खरेदी करण्यासाठीं धडपडत असतो. त्यामुळें अमेरिकन मोटारींचाहि सारखा उठाव होत असतो.

अमेरिकन जीवनांत जरी गतिमानता, अधीरता, आवेग दिसून येतो तरी त्याचें मूळ त्यांच्या या लोकविलक्षण दृष्टिकोनांत आढळून येतें. हा दृष्टिकोन यंत्रयुगाचा निदर्शक आहे. अमेरिकेंतील लहान लहान मुलें मीं पाहिलीं. तीं यंत्राशींच बहुशः झटापट करीत असतात. विमानाचे सुटे भाग, आणि मोटारींचीं यंत्रें, हातीं घेऊनच तीं कांहीं तरी कामगिरी करीत असतात. लहान मुलांना जर यंत्रांचें इतकें वेड तर मोठीं माणसें अहोरात्र 'गॅजेट्स्'-चाच विचार करीत असली तर त्यांत काय नवल? मानवी जीवन जास्तींत जास्त सुखकर कसें करावें, थोडक्या श्रमांत यांत्रिक साहाय्यानें कामाचा ढीग कसा उचलावा आणि थोडक्या काळांत जास्तींत जास्त अंतर कसें काटावें

हीच त्यांच्या मनींची आकांक्षा. म्हणून अमेरिकन गृहिणी रेफ्रिजरेटर, कुकर, कपडे धुण्याचें यंत्र, विद्युत्शक्तीवर चालणारें शिलाईचें यंत्र, व्हॅक्युम क्लीनर वगैरे सर्व साधनें आणि उपकरणें गोळा करण्याची धडपड करीत असते. अमेरिकन पुरुषांना हीं सर्व साधनें तर हवीं आहेतच; पण बागेची साफसफाई वा मशागत करण्यासाठीं निरनिराळीं यंत्रें, वेगानें धावणारी मोटारगाडी, करमणुकीसाठीं टेलिव्हिजन वगैरे आधुनिक यंत्रसामग्री पैदा करण्यासाठीं ते प्रयत्न करीत असतात.

मग घरांत कामाचा वेग, बाहेर जातांना वेग, कचेरींत काम उरकण्याचा वेग असें सर्व जीवन अमेरिकेंत वेगानें चालतें. त्या वेगांत त्यांना विचार करावयाला तरी कितीसा वेळ मिळत असेल कोण जाणे. त्या वेगाचा त्यांच्या मनावर साहजिकच ताण पडत आहे. कधींकधीं वेगानें जाणाऱ्या मोटारींत बसल्याबसल्या मी मनाशीं म्हणत असें, "या माझ्या मित्राला एवढी घाई कसली बरें झाली आहे? फक्त पांचच मिनिटें तो उशिरानें पोचला तर काय होईल एवढें?"

तेवढ्यांत समोर एक पूल येई. अरेरे! केवढा हा अडथळा; आतां वेग कमी केला पाहिजे. पन्नास सेंटचा कर द्यावयाचा आहे. माझा मित्र वेग कमी करी पण किती नाईलाजानें! कर भरण्याची जागा आली कीं, हातांत पन्नास सेंटचें नाणें तो धरून ठेवी. गाडी चालतां चालताच तो तें नाणें कर गोळा करणाऱ्या माणसाच्या हातांत ठेवी आणि गाडी गेल्याची सूचना देणारा मशिनचा आवाज 'खण्' असा होतो न होतो तोंच आमच्या मोटारीचा वेग ताशीं पन्नास मैलपर्यंत पोचत असे.

मीं त्याला एकदां म्हटलें, "आमच्याकडेहि अशा जकाती भरण्याची प्रथा आहे. पण आम्ही अशी घाई करीत नाहीं. संथपणानें आम्ही गाडी थांबवितों. मग तो कारकून सावकाश बाहेर येतो. त्यालाहि घाई नसते. कारण जकात भरण्याचा नियम असला तरी घासाघीस करावयाचीच असते."

"मग ?" त्या अमेरिकन मित्रानें अधीरतेनें मला विचारलें.

"हें बघ. नुसती गोष्ट ऐकण्यांतसुद्धां तूं इतका अधीरपणा दाखवितोस," मीं त्याला म्हटलें, "मग जकात भरतांना तूं किती उतावीळ होशील ?"

तो खळखळून हसला आणि म्हणाला, "India must be a fascinating country."

मीं चपापून त्याला विचारलें, "म्हणजे ? आम्ही मंद आहोंत हेंच तुला कल्पनारम्य वाटलें कीं काय ?"

"नाहीं रे." तो अजीजीनें म्हणाला, "पण आमच्या या गतिमान् जीवनाचा कधीं उबग येतो. मग वाटतें हिमालय पर्वतावर तपश्चर्या करणारे तुमचे साधुसंत किती भाग्यवान् आहेत. आम्ही आमच्याबद्दलसुद्धां विचार करूं शकत नाहीं. ते मूलभूत तत्त्वांचा शोध घेत आहेत. जगाच्या तत्त्वज्ञानांत मौलिक भर घालीत आहेत. वेगवान् जीवनांत आमचीं मनें कशीं मारलीं जात आहेत, खुरटत आहेत याची कल्पना येणार नाहीं तुम्हांला."

तो मनापासून बोलत होता. मनांतील वेदनाच जणूं तो व्यक्त करीत होता. त्याचें समाधान करण्यासाठीं मीं त्याला म्हटलें, "आमची विश्रांति आणि तुमचा वेग यांत सुवर्णमध्य निघाला तर जगाचे कित्येक प्रश्न सुटतील नाहीं ?"

"तुम्ही निष्कारण वेळ दवडतां कीं काय हें मला माहीत नाहीं. पण 'टाइम ईज मनी' हें तत्त्व आम्हीं अगदीं पराकोटीला नेलें आहे हें मात्र खरें."

अमेरिकन कामगारांचें जीवन पाहिलें तर या म्हणण्याची सत्यता पटून आल्याशिवाय राहत नाहीं. न्यूयॉर्कच्या एका भरवस्तींत एक प्रचंड दगडी इमारत पाडली जात असतांना मीं पाहिली. आधींच ती जवळ जवळ तीस मजली इमारत. पण आतां ती सत्तर मजली इमारत व्हावयाची आहे. माझ्या मनांत विचार आला. काय हा सोस तरी ! ही दगडी इमारत मुळापर्यंत

उखडून टाकावयाची आणि त्यावर पुन्हां नवी इमारत बांधावयाची ! त्यांत फायदा असेल. पण किती अनाठायीं हे श्रम जात आहेत.

ती इमारत भरवस्तींत पाडणार तरी कशी याचें मला कोडें पडलें होतें, पण काय आश्चर्य ? त्या रस्त्याची रहदारी कधीं बंद झाली नाहीं. एकामागून एक भिंती कोसळत होत्या. पण त्या ढिगाऱ्यांतील एक दगडहि रस्त्यावर पडत नव्हता. खालीं ट्रक्सचा ताफा उभा होता आणि भिंती, दगड, विटा आणि माती अलगद त्या ट्रक्समध्यें पडत होतीं. तीं कोसळतांना त्यांवर पाण्याचा एक फवारा शिंपडला जाई आणि त्यामुळें वर उडणारी धूळ जागच्याजागीं जिरून जाई. त्या दिवशीं एका हॉटेलांतून फक्त जेवण घेऊन मी बाहेर पडलों. पण तेवढ्या तासांत जवळ जवळ एक मजला अदृश्य झाला होता.

यंत्रबळ आणि मानवी कौशल्य यांचा समसमा संयोग झालेला मी पाहिला तो अमेरिकेंत. त्या यंत्रमय जीवनांत माणसाकडून तसूभर जरी कसूर झाली तर ?—ऐन रस्त्यावर दुर्दैवानें पेट्रोल संपल्यामुळें बंद पडणाऱ्या मोटारीमागें मैलभर लांब मोटारीचा तांडा जमलेला दिसून येईल. त्यामुळें अनेक लोकांना त्रास होईल खरा; पण निदान मानवी जीविताची तरी हानि होणार नाहीं; पण साठ मैल वेगानें धावणाऱ्या मोटारींतील एका माणसाचा चाकावरील ताबा गेला तर मात्र दोन्ही मोटारींचा अक्षरशः चक्काचूर होईल. अमेरिकेंतील रस्त्यावर जे अपघात फार मोठ्या प्रमाणावर घडून येतात ते माणसाच्या या नजरचुकीमुळेंच होत. डेट्रॉइटच्या म्युनिसिपल कचेरीसमोर एक भव्य तक्ता लावलेला मला आढळून आला. त्यांत मोटारीच्या अपघातांची दर दिवशीं नोंद करण्यांत येते. त्या तक्त्यावरून अमेरिकेच्या वेगवान् जीवनाची यथार्थ कल्पना करतां येते.

जोंवर दैवाचें पाठबळ आहे तोंवर हा वेग टिकतो आणि यंत्रबद्ध जीवनाची सारी सुसूत्रता आणि त्यांतील सुख यांचा आपल्या मनाला साक्षात्कार होतो. मग माणसांनीं भरलेली बस एका क्षणांत अलगद तराफ्यावर उचलली जाते

आणि तरंगणाऱ्या बसमध्यें बसल्याचा आनंद आपल्याला प्राप्त होतो. त्या आनंदाची गोडी कांहीं न्यारीच. न्यूयॉर्कमधील मॅनहॅटन बेटावर मी गेलों त्या वेळीं या आनंदाचा मीं आस्वाद घेतला. मला आश्चर्य वाटलें तें सहजपणें आमची बस त्या तराफ्यावर चढली त्याचें. आमची एकच बस नव्हे. दोन तीन बसेस, चारसहा मोटारगाड्या आणि असंख्य माणसें. पाहतां पाहतां आम्ही भर समुद्रांत आलों. तेथें लाटांचें तांडव चालू होतें. पण त्या लाटांशीं सामना देत स्वतंत्रतादेवीचा अतिभव्य पुतळा आम्हांला आवाहन करीत होता. स्वतंत्रतादेवी अमेरिकेच्या स्वातंत्र्याची अधिष्ठात्री देवता. सागराच्या उदरांतून जणूं प्रकट झालेली अशी ती देवता मला दिसली—किती रम्य, सुंदर! पण किती भव्य आणि स्फूर्तिजनक!

त्या भव्य देवतेच्या चरणीं माझें मस्तक तत्क्षणीं विनम्र झालें.

न्यूयॉर्कमधील स्वातंत्र्य-देवीचा पुतळा हा अमेरिकन लोकांना आपल्या सामाजिक जीवनाचें प्रतीकच वाटतो. त्या जीवनाचा केंद्रबिंदु म्हणजे स्वातंत्र्य–व्यक्तिस्वातंत्र्य–हें आहे. हें स्वातंत्र्य अनिर्बंध आहे असें नव्हे. सामाजिक हिताच्या मर्यादा त्याला अपरिहार्यपणें पडतात. पण सामाजिक जबाबदारी पार पाडल्यानंतर मात्र व्यक्तीच्या विकासाला येथें जो वाव मिळतो तसा कोणत्याहि दुसऱ्या राष्ट्रांत मिळत नसेल. आजच्या जगाच्या सामाजिक अवस्थेंत एकीकडे क्रांतीच्या मार्गानें समाजवाद प्रस्थापित केला जात आहे तर दुसरीकडे समाजकल्याणकारी राजवटीच्या उद्दिष्टानुसार व्यक्तीच्या लालसेला व महत्त्वाकांक्षेलाहि मुरड पडत आहे. पण अमेरिकेंत मात्र खाजगी भांडवलदारांच्या विकासाच्या मार्गांत कमींत कमी अडथळे आणले जात आहेत. सर्वसाधारण अमेरिकन कामगारांचाहि तत्त्वतः भांडवलशाहीला विरोध नाहीं. उद्योगधंदे राष्ट्रीय मालकीचे करण्यांत यावे अशी मागणीहि ते करीत नाहींत. उलट त्यांचें असें मत आहे कीं, खाजगी भांडवलदार जोंवर आपलें जीवनमान वाढत्या प्रमाणांत सुधारीत आहेत तोंवर त्यांच्या नफेबाजीलाहि आळा

घालण्याचें कारण काय? अमेरिकन कामगारांना समाजवादाबद्दल अणुमात्रहि आकर्षण वाटत नाहीं. उलट समाजवादी समाजव्यवस्थेचा जो आदर्श त्यांच्यासमोर रशियानें उभा केला आहे त्यामुळें तर समाजवादाबद्दल त्यांना उबगच वाटूं लागला आहे.

या समाजपद्धतींत त्यांना आपल्या व्यक्तित्वाचाच लोप होईल असें वाटतें. आणि म्हणून कम्युनिस्ट राजवटीबद्दल नुसता तिरस्कारच नव्हे तर त्यांनीं दहशतहि घेतली आहे.

अमेरिकेंत प्रत्यक्षपणें पाऊल टाकीपर्यंत मला कळत नव्हतें कीं अमेरिकन लोकांनीं कम्युनिझमची इतकी दहशत कां घ्यावी? निदान कामगारांनीं व शेतकऱ्यांनीं तरी कां घ्यावी याचा तर मला मुळींच बोध होत नसे. पण अमेरिकेचें जीवन आणि तेथील बहुजन समाजाचेंहि जीवनमान पाहिल्यानंतर मात्र मला कळून आलें कीं, 'जगांतील कामगारांनो एक व्हा; तुमच्यापाशीं गमावण्यासारखें कांहीं नाहीं—असल्याच तर शृंखला!" हें ब्रीदवाक्य निदान अमेरिकेंत तरी बहुजनसमाजाच्या भावना हेलावूं शकणार नाहीं. त्याचें कारण स्पष्ट आहे आणि तें हें कीं, अमेरिकेंतील बहुजनसमाजाचें जीवनमानच इतकें उच्च आहे कीं रशियन समाजवादाची तेथें स्थापना झाली तर बहुजनसमाजाला कांहींतरी अनमोल असा ठेवा—आधिभौतिक प्रगतीचा आणि भावी मूल्यांचा—गमावावा लागेल!

अमेरिकेंतील सामान्य माणसालाहि भांडवलशाहीच्या चौकटींतच इतकें समृद्ध जीवन आणि इतके मूलभूत हक्क प्राप्त झालेले आहेत कीं, खाजगी हितसंबंधांबद्दल इतर देशांतील लोकांना जी शिसारी वाटते तशी अमेरिकन लोकांना वाटत नाहीं. म्हणजे कारखान्यांचे वा बँकांचे मालक आणि उत्पादनाच्या साधनावर मालकी हक्क गाजविणारे लोक यांच्याबद्दल कामगारांमध्यें अविश्वासाची वा असंतोषाची भावना नाहीं असें नव्हे. पण आपल्या व्यक्तिगत सामर्थ्याबद्दल वा संघटित शक्तीबद्दल अमेरिकन कामगारांना इतका

विश्वास आहे कीं धनिक वर्गाकडून आपण अधिकाधिक हक्क व सवलती मिळवीत राहूं ही त्यांच्या मनाची आलंबाल खात्री झालेली आहे.

हे हक्क वा सवलती त्यांना लढ्याशिवाय मिळालेल्या नाहींत. आजहि संपाचा मार्ग स्वीकारून आणि त्यावेळीं सक्त निरोधन करून, कामगार आपल्या पगारवाढीच्या मागण्या साध्य करून घेतात. पण त्यांचा संप पूर्वतयारीशिवाय मात्र होत नाहीं आणि या पूर्वतयारींत संपाच्या काळांत कामगार व त्यांचीं कुटुंबें यांना जीवननिर्वाहासाठीं आवश्यक तेवढा किमान भत्ता देणें याचासुद्धां समावेश होतो. डेट्रॉइटमधील एका कारखान्यापुढें चाललेलें निरोधन मी पाहिलें. शांतपणें तें दिवसभर चाललें होतें. कामगार आपल्या नेहमींच्या पोशाखांत होते. त्यांच्या हातांत घोषणाफलक होते. कारखान्याच्या सभोवारच्या फुटपाथवरून दोघांदोघांच्या ओळीनें कामगार संथपणें हिंडत होते. निरोधनाचे ठराविक तास संपले कीं युनियनच्या कचेरींत कामगार जात. तेथें दिवसाचा भत्ता खिशांत टाकला कीं त्या दिवसापुरती त्यांची मोकळीक होई. मग आपण दररोजच्या कामावरूनच बाहेर पडलों आहों अशा आविर्भावानें कामगार युनियननें ठरविलेल्या निदर्शनाच्या वा इतर कार्यक्रमांच्या मागें लागत.

अमेरिकेंतील कामकरी चळवळ ही एक फार मोठी प्रबळ शक्ति आहे. तेथील युनियनचे पुढारी हे कोणी उपरे लोक नव्हत. प्रत्यक्ष काम करीत असलेल्या कामगारांचाच त्यांत भरणा असतो. त्यांपैकीं जे लोक सारा वेळ या कार्याला देतात त्यांच्या पालनपोषणाची जबाबदारीहि युनियनलाच शिरा-वर घ्यावी लागते आणि हें पालनपोषण आपल्याप्रमाणें त्यागाच्या कल्पने-नुसार होत नाहीं. आपल्याकडे कामकरी चळवळींतील कार्यकर्त्यांकडे पाहण्याची दृष्टि दोन प्रकारची असते. एक तर तो ध्येयवादाचा आदर्श मानला जातो किंवा आपल्या उपजीविकेसाठीं त्यानें युनियनकडून कांहीं वेतन घेतलें तर त्याचा दर्जा इतर नोकरांपेक्षां वेगळा मानला जात नाहीं. अमेरिकन कामगार

पुढाऱ्यांना हे दोन्हीहि अतिरेकी दृष्टिकोन मान्य नाहींत. ते समाजाचे एक जबाबदार घटक म्हणून कामकरी संघटनेच्या कार्याची जबाबदारी स्वीकारतात आणि त्यांच्या या कामगिरीचें मोल म्हणून त्यांना पुरेसें आर्थिक स्वास्थ्य देणारें जीवनमान दिलें जातें आणि त्यांच्या पदाला शोभेसा सामाजिक दर्जाहि त्यांना प्राप्त होतो.

अमेरिकन कामकरी चळवळीचेंहि वैशिष्ट्य असें आहे कीं, ती फक्त कामगारांच्या दैनंदिन जीवनांत सुधारणा घडवून आणण्यासाठींच तेवढी झटते. आपल्या येथील कामकरी चळवळींप्रमाणें ती राजकारणांत हस्तक्षेप करीत नाहीं. तिनें आपल्या डोळ्यांसमोर समाजक्रांतीचेंहि उद्दिष्ट ठेवलेलें नाहीं. खाजगी हितसंबंधांवर आधारलेली आपल्या येथील समाजरचना लक्षांत येऊन त्या समाजरचनेंत जास्तींत जास्त हक्क मिळविण्यापुरतेंच त्या चळवळीनें आपलें ध्येय मर्यादित केलें आहे. ती समाजरचना बहुजनसमाजाच्याहि इतकी अंगवळणीं पडलेली आहे कीं, तिच्यांत बदल करण्यासाठीं एखादी क्रांतिकारक चळवळ उभारण्याचा विचारहि त्यांच्या मनाला शिवत नाहीं. म्हणून समाजवाद वा समाजक्रांति याबद्दल अमेरिकन लोकांत जी चर्चा होते ती फक्त तात्त्विक स्वरूपाची असते. बहुशः प्राध्यापक व विचारवंत हेच त्या तत्त्वचर्चेंत रस घेतात.

बाकी अमेरिन बहुजनमाज आपल्या स्वतःच्या जीवनांतच गर्क असतो. त्याला साधारणपणें राजकारणाबद्दल आस्था नसते आणि तत्त्वचर्चेपासून तर तो पूर्णपणें अलिप्त असतो. खरें सांगावयाचें तर अमेरिकन माणसाला जगांतील घडामोडींबद्दलहि फारशी माहिती नसते व त्यांत ढवळाढवळ करण्याचीहि त्याला इच्छा नसते. त्या दृष्टीनें त्याला स्वयंकेंद्रित म्हणतां येईल. पण म्हणून तो केवळ स्वार्थी आहे असें मात्र नव्हे. आपल्या जीवनाच्या गरजा आणि त्या—आपल्या जीवनमानाशीं तुलना करतां विलासी म्हणतां येतील—भागविल्या गेल्यानंतर मागसलेल्या वा दुःखी अशा इतर

जगासाठीं स्वार्थत्याग करावयाला अमेरिकन कामगार तत्परतेनें तयार असतो. हळूहळू अमेरिकेंत अशी जाणीवहि बळावत चालली आहे कीं मागासलेल्या राष्ट्रांना आर्थिक साहाय्य देणें हें अमेरिकेच्याच अंतिम हिताचें आहे. कारण ती मदत मिळाल्याशिवाय कम्युनिस्ट आक्रमणाला पायबंद घालतां येणें शक्य नाहीं याची त्यांना जाणीव झालेली आहे.

वॉल्टर रूथर यांनीं माझ्याशीं बोलतांना हा दृष्टिकोन अत्यंत प्रभावीपणें मांडला. हिंदुस्थानाला ते नुकतेच भेट देऊन आले असल्यामुळें तेथील विकासयोजनांच्या प्रगतीची त्यांना चांगलीच कल्पना आलेली आहे. लोकशाही पद्धतीनें हिंदुस्थान जो विकास करीत आहे त्याबद्दल त्यांना आस्था तर वाटतेच, पण अभिमानहि वाटतो. वॉल्टर रूथर यांच्या मनावर हिंदुस्थानचा इतका प्रभाव पडलेला आहे आणि हिंदुस्थानची बाजू ते इतक्या हिरीरीनें मांडतात कीं अमेरिकेंतील अनेक लोक त्यांना "हिंदुस्थानची लॉबी" म्हणूनच संबोधतात. हिंदुस्थानांतील परिस्थितीबद्दल त्यांनीं आस्थेवाईकपणें माझ्याशीं चौकशी केली आणि मग कागदावर आंकडे मांडीत ते मला एकदम म्हणाले, "हिंदुस्थानला एकंदर दोन अब्ज डॉलर्सची मदत अमेरिकेनें केली पाहिजे. तरच हिंदुस्थानचें नियोजन पूर्ण होईल आणि जगांतील लोकसत्तेचेंहि संरक्षण होईल."

मी त्यांना म्हणालों, "अमेरिकेचे तुम्ही अध्यक्ष होईपर्यंत या मदतीसाठीं हिंदुस्थानला थांबावें लागणार काय?"

वॉल्टर रूथर खदखदून हसले आणि म्हणाले, "अमेरिकन कामकरी चळवळ राजकीय नेतृत्वापासून अलग राहते. आमचें उद्दिष्ट राजकीय अधिकारपद स्वीकारल्यामुळें साध्य होईल असें आज तरी आम्हांला वाटत नाहीं. म्हणून त्याविषयीं आज अंदाज बांधण्यांत अर्थ नाहीं."

रूथर यांचें म्हणणें खरें होतें. पण अमेरिकेंतील निरनिराळ्या राजकीय विचारप्रवाहांचा विचार करतां मला मात्र वाटूं लागलें कीं, अमेरिकन काम-

गार त्या देशांतील निवडणुकीवर अप्रत्यक्षपणें छाप टाकतात. पण कांहीं वर्षांच्या आंत प्रत्यक्षपणें निवडणुकीच्या रंगणांत—विशेषतः अध्यक्षीय निवडणुकीच्या—ते पाऊल टाकल्याशिवाय राहणार नाहींत.

त्या दृष्टीनें वॉल्टर रूथर ही अमेरिकन समाजजीवनांतील एक कर्तुमकर्तुम् शक्ति झालेली आहे. कांही अमेरिकन लोकांनीं तर मला असें सांगितलें कीं, अमेरिकन अध्यक्षपदासाठीं वॉल्टर रुथर यांचें नांव आजसुद्धां घेतलें जात आहे.

तसें जर लवकर घडलें तर अमेरिकन राजकारणाला एक नवीनच कलाटणी मिळेल आणि आज अमेरिका इतर जगापासून, विशेषतः आशिया खंडांतील स्वतंत्र झालेल्या आणि स्वतंत्र विचारसरणीच्या लोकांपासून जी अलग झालेली दिसत आहे तशी ती एकाकी राहणार नाहीं. अर्थात् अमेरिकन कामगार जगांत वॉल्टर रूथर यांना प्रबळ असे प्रतिस्पर्धी आहेत. तेथील दोन मध्यवर्ती कामगारसंघटना म्हणजे अमेरिकन फेडरेशन ऑफ लेबर व कॉंग्रेस ऑफ इंडस्ट्रियल ऑर्गनायझेशन यांचें एकीकरण झालेलें आहे आणि त्या संघटनेचे अध्यक्ष म्हणून जॉर्ज मीनी या दुसऱ्या एका अतिप्रबळ कामगार पुढाऱ्याचाहि अमेरिकन कामगारांवर तेवढाच प्रभाव आहे. जॉर्ज मीनी हेहि समाज-कारणांत पुरोगामी मताचे, पण कम्युनिस्टांना विरोध करण्याच्या ईर्षेत हिंदु-स्थानसारख्या देशाचें आंतरराष्ट्रीय राजकारणांतील तटस्थतेचें धोरण ते समाजावून घ्यावयालाहि तयार नाहींत. म्हणून वॉल्टर रूथर यांनीं हिंदु-स्थानची तरफदारी करावी आणि जॉर्ज मीनी यांनीं एखाद्याच भाषणानें त्यावर पाणी टाकावें असा प्रकार हिंदुस्थानच्या बाबतींत नेहमींच घडून आलेला दिसतो. वॉल्टर रूथर यांना त्याबद्दल मनस्वी खेद होतो. पण कम्युनिझमबद्दल अमेरिकन लोकमत इतकें प्रतिकूल झालेलें आहे कीं, तटस्थतावादी लोकांना शत्रुगटांत समाविष्ट करण्याकडेच त्यांचा कल होतो आणि वाल्टर रूथर यांच्या मिनतवारीचाहि अशा परिस्थितींत त्यांच्यावर परिणाम होऊं शकत नाहीं.

अमेरिकेंतील 'ड्रग स्टोअर' मध्यें एखादें पेय घेण्यासाठीं पाऊल टाकलें कीं चारदोन मिनिटांतच तेथें आपली एखाद्या माणसाशीं मैत्री जमते आणि त्या वेळीं अमेरिकन लोकमताची आपल्याला चुणूक भासते. प्रथम ड्रग स्टोअरमध्यें जातांना माझी अशी कल्पना होती कीं बहुधा हें औषधविक्रीचें दुकान असावें. पण प्रत्यक्षपणें पाहतां मला असें दिसून आलें कीं हें एक अजबघरच आहे. त्यांत सर्व प्रकारच्या वस्तू विक्रीला ठेवण्यांत आलेल्या असतात आणि त्यांतीलच एका कोपऱ्यांत एक उपाहारगृहहि चालविण्यांत येत असतें. तेथील काउंटरजवळील एका उंच खुर्चीवर आपण बसावें आणि

## ऐहिक सुस्थिति, तरीहि अध्यात्माकडे कल

पांच मिनिटांच्या आंत चहा आणि कॉफी, केक्स, सँडविचेस आणि हरएक प्रकारचीं थंड पेयें आपल्या समोर येतात. तेथें काम करणाऱ्या बहुशः स्त्रियाच असतात आणि त्यांचें काम कसें यंत्रासारखें आणि सुसूत्रपणें चाललेलें असतें. ऑर्डर ऐकायचा अवकाश कीं समोरचें गॅजेट फिरवून त्यांनीं आपल्याला हवी असलेली वस्तु काढून किंवा तयार करून दिलीच. येथें मद्याखेरीज सर्व पेयें मिळतात आणि अमेरिकन लोकांना तींच पेयें अधिक प्रिय दिसतात. साधारणपणें अमेरिकन लोकांना दूध, चाकोलेट, सोडा आणि फळांचा रस याच गोष्टी अधिक आवडतात. तेंच त्यांचें खरें पेय. त्या दृष्टीनें युरोपीय व अमेरिकन लोकांच्या आवडीनिवडींत बराच फरक आहे.

हाच फरक अमेरिकन लोकांच्या वागणुकींतहि दिसून येतो. ड्रग स्टोअर-चेंच उदाहरण पाहा ना. वरिष्ठ आणि कनिष्ठ असे सारेच लोक या स्टोअर-मध्यें येतात आणि खुर्चीला खुर्ची लावून खुल्या दिल्यानें ते एकमेकांशीं बोलतात. युरोपीय समाजजीवनांत जो लब्धप्रतिष्ठितपणा किंवा 'स्नॉबरी'

आहे ती अमेरिकेंत सहसा पहावयाला मिळत नाहीं. अमेरिकन लोकांचें वर्तन प्रांजल असतें, त्यांचें बोलणें अघळपघळ असतें आणि त्यांची वागणूक थोडीशी भाबडीच म्हणा ना. त्यांत पाचपेंच कांहीं नाहीं. मोठेपणाचा दिमाखहि नाहीं आणि भारदस्तपणाहि नाहीं. फक्त तीनशें वर्षांचें या देशाचें जीवन. त्या दृष्टीनें हें राष्ट्र पोरकट राहिलें तर त्यांत काय नवल? शिवाय या देशांत अनेक राष्ट्रांतील लोकांची सरमेसळ झालेली आहे. अमेरिकन गोरे लोक आणि नीग्रो यांची गोष्ट सोडूनच द्या. ते या खंडाचे रहिवाशीच म्हणावे लागतील. पण निरनिराळ्या अमेरिकन शहरांत, इटालियन, पोलिश, स्पॅनिश, जर्मन, चिनी, जपानी आणि हिंदी अशा अनेक देशांच्या लोकांचा फार मोठा भरणा झालेला दिसून येतो. खुद्द डेट्रॉइटमध्यें वॉरसॉच्या खालोखाल पोलिश लोकांची संख्या आहे असें मला कोणी तरी सांगितलें. मॅनहॅटनमध्यें इटालियन लोकांची मोठी वस्ती आहे. साहजिकच निरनिराळ्या लोकांचे रीतिरिवाज, त्यांचें वागणें, बोलणें, अमेरिकन लोकांनीं आत्मसात् केलें आहे. पण अमेरिकेचें वैशिष्ट्य असें कीं इतर देशांतील लोकांना ती आपल्या जीवनांत सामावून घेते. दुसऱ्याच पिढींत हे लोक इंग्रजी भाषा ही आपली मातृभाषा मानतात आणि अमेरिका हीच त्यांची मातृभूमि होते.

कांहीं पोलिश व इटालियन लोकांशीं बोलतांना मला या गोष्टीची प्रकर्षानें जाणीव झाली. हे लोक अमेरिकन जीवनाशीं पूर्णपणें समरस झालेले मला आढळून आले. त्यांना किंवा त्यांच्या मुलांना आपल्या देशाबद्दल प्रेम वाटत नाहीं असें नाहीं; पण त्यांना अधिक अभिमान व प्रेम अमेरिकन जीवन-पद्धतीबद्दल वाटतें. उद्यां वेळ आली तर अमेरिकेच्या संरक्षणासाठीं ते खुद्द आपल्या मातृभूमीशीं लढा द्यावयाला प्रवृत्त होतील असेंहि मला वाटलें.

ड्रग स्टोअरमध्यें बसल्याबसल्या मीं अनेक दृश्यें पाहिलीं आणि त्यामुळें अमेरिकन जीवन अगदीं जवळून पहावयाला मिळालें असें मला वाटलें. येथें संकोच असा कांहीं नाहींच. तेथील वेट्रेसला आपण खुशाल कांहींहि

माहिती विचारावी; ती प्रांजलपणें आपल्या प्रश्नांचीं उत्तरें देते. आपल्या खुर्चीजवळ बसलेल्या कोणाहि माणसाशीं बोलूं लागावें. तो नुसतीच माहिती देणार नाहीं तर अमेरिकेंतील कोणतेंहि नवीन ठिकाण दाखविण्याचीहि तो तयारी दाखवील. एका अपरिचित इसमानें तर केवळ कॉफी पिण्यासाठीं मला ऐशीं मैलांवरील एका प्रख्यात उपाहारगृहांत नेलें. अमेरिकेन लोक मैत्रीसाठीं भुकेलेले आहेत. त्यांना एकच आश्वासन हवें आहे आणि तें हें कीं, तुम्ही त्यांच्या जीवनांत ढवळाढवळ करणार नाहीं. त्या जीवनाचें त्यांना विलक्षण आकर्षण आहे आणि त्या जीवनाचें स्वातंत्र्य अबाधित राहावें ही एकच त्यांची मनोमन इच्छा आहे.

अमेरिकन लोकांच्या या मनोवृत्तीची कल्पना करून घेतल्यानंतर अमेरिकन जीवन व समाज यांचें महत्त्व आपल्याला यथार्थपणें कळून येईल. आणि मग अमेरिकेपासून आपल्याला कोणता बोध घेतां येईल याचीहि पहाणी करतां येईल; पण या मनोवृत्तीबद्दल आपल्या मनांत तेढ धरून आणि एकंदरीनें अमेरिकन जीवनाबद्दल पूर्वग्रह मनांत ठेवून जर आपण त्या जीवनाकडे पाहूं लागलों तर मात्र विनाकारण आपल्या पदरीं निराशा येईल आणि अमेरिकेनें आपल्या समृद्ध जीवनाचा जो आदर्श जगापुढें उभा केला आहे त्यापासून योग्य तो फायदा घेणेंहि आपल्याला शक्य होणार नाहीं.

अमेरिकेंत मीं जें पाहिलें आणि अनुभवलें त्याची माझ्या मनावर विलक्षण छाप पडली आहे. पण ही छाप केवळ तेथील उत्तुंग इमारती, भव्य रस्ते, डोळे दिपविणारे कारखाने, झगमगणारे चौक, रम्य बागबगीचे आणि इंद्रपुरी-लाहि लाजविणारें तेथील विलासी जीवन यांचीच नव्हे. त्याहिपेक्षां अधिक मोहिनी अमेरिकन लोकांनीं माझ्यावर टाकली. अमेरिका हें विलासी, सुख-लोलुप राष्ट्र नव्हे. तें खरें कामकऱ्यांचें, कष्ट करणाऱ्या लोकांचें राष्ट्र आहे याची कल्पना मला त्यांनीं करून दिली. आणि आश्चर्य असें कीं समाजांतील सर्वच थरांतील लोक या ना त्या क्षेत्रांत तेथें अहर्निश झटत असतात.

त्या बाबतींत बँकर आणि बँकनोकर, उद्योगपति आणि कामगार, राजकारणी पुरुष आणि अनुयायी, जमीनदार आणि शेतमजूर यांच्यामध्यें तेथें फरक नाहीं. दोघेहि एकाच प्रकारचे कपडे वापरीत नसतील कदाचित्. त्यांत तलम आणि भरडें असा फरकहि असेल; पण दोघांच्याहि शर्टची बाही मात्र वर दुमडलेली हमखास आढळून येईल. अमेरिकन जीवनाचें हेंच मोठें हृदयंगम वैशिष्ट्य आहे.

अमेरिकेंतील थोडीं शहरेंच मीं पाहिलीं आणि तीं फक्त पूर्व किनाऱ्यावरील. माझ्या स्वतःच्या अज्ञानाची मला त्या वेळीं जाणीव झाली; कारण वॉशिंग्टनमध्यें येऊन पोचल्यानंतर मला असें वाटलें होतें कीं हॉलिवुड कांहीं येथून फारसें दूर नसेल, पण नंतर मला कळलें कीं वॉशिंग्टनपासून तें फक्त दोन हजार मैलांवर आहे. म्हणजे, अर्थातच त्यापेक्षां दोनतीनशें मैल अधिकच. तेवढेंच अंतर अमेरिकेंतील जीवनांत आणि हॉलिवुडमध्यें चित्रित होणाऱ्या अमेरिकन जीवनांत दिसून येतें. म्हणजे, त्या चित्रपटांतील जीवन वास्तववादी नव्हे असें मला म्हणावयाचें नाहीं. पण त्यावरून अमेरिकन जीवनाबद्दलची जी कल्पना आपल्या मनांत उत्पन्न होते ती यथार्थ म्हणतां येणार नाहीं. तें अमेरिकन जीवनाचें एक अंग आहे एवढेंच.

प्रश्न आहे तो असा कीं आपण या जीवनाचा सर्वांगीण विचार करणार कीं कांहीं ठळक घटनांच्या आधारें आपण अमेरिकेच्या सामाजिक परिस्थितीबद्दल आणि तेथील नैतिक आचाराबद्दल कांहीं ठोकळे बाज आडाखे बांधून पसंती वा नापसंती व्यक्त करणार ? अमेरिकन समाजाच्या प्रगतीमुळें डोळे दिपून गेलेले लोक जसे या बाबतींत पसंतीचा एकतर्फी निर्वाळा देतात त्याचप्रमाणें तेथील समाजजीवन आपल्या मानसिक प्रवृत्तीनुसार नाहीं असें आढळून येणारे लोक त्या साऱ्याच समाजजीवनाविषयीं नाक मुरडतात. दोघांचाहि दृष्टिकोन त्या दृष्टीनें निकोप म्हणतां येणार नाहीं.

अमेरिकेंतील कांहीं महत्त्वाच्या शहरांतून हिंडतांना माझी मात्र भावना

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम वि: ...............
क्रमांक ............ नों: दि: ...............


अशी झाली कीं हें एक नवें जग आहे. त्याला पुराणा इतिहास नाहीं. आपली अशी म्हणतां येईल अशी संस्कृति नाहीं. दूर देशांतून जवळ जवळ निर्वासित म्हणून या राष्ट्रांचे संस्थापक येथें आले. त्यांना आढळून आलें तें हें कीं येथील खरे रहिवासी अगदींच रानटी अवस्थेंत आहेत. पण ही भूमि मात्र निसर्गाची लाडकी आहे आणि त्यानें आपला वरदहस्त या भूमीवर अखंडित ठेवला आहे. तेव्हां या वसाहतवाल्यांनीं येथील रहिवाशांना ताब्यांत घेतलें आणि निसर्गदत्त विपुल साधनसामग्रीचा उपयोग करून घेण्यासाठीं ते बद्धपरिकर झाले. त्या वसाहतवाल्यांना दैवानें हात दिला आणि मानवी प्रयत्नांची पराकाष्ठा करून त्यांनींहि या अज्ञात भूमि-भागाला प्रत्यक्ष नंदनवनाचें स्वरूप दिलें.

आतां या नंदनवनांत सुरा आणि अप्सरा यांचें एक मोहमय जग निर्माण झालें तर त्यांत नवल काय? संपत्तीचा अलोट प्रवाह वाहूं लागल्यानंतर तेथील लोकांना सुखसाधनेंहि उपलब्ध झालीं आणि सुखोपभोगासाठीं स्वस्थताहि त्यांना मिळूं लागली. पण ग्रीक वा भारतीय पुराणांतील असुरां-प्रमाणें—किंवा कांहीं अंशीं देवादिकांप्रमाणेंहि—ते सुरापानांतच मश्गूल झाले नाहींत किंवा मोहिनीच्या प्राप्तीसाठीं सुंदोपसुंदी करण्यांतच त्यांनीं आपलें शक्तिसर्वस्व खर्च केलें नाहीं. त्यांनीं सुखोपभोगासाठीं आठवड्यांतील फक्त दोन दिवसच राखून ठेवले आणि बाकीच्या पांच दिवसांत मात्र त्यांनीं कष्टानें निढळाचा घाम गाळून आपल्या राष्ट्राच्या संपत्तींत अमोल भर घातली.

त्या कष्टमय जीवनांतून अमेरिकेचें वैभव निर्माण झालें आहे आणि त्या वैभवाच्या साहाय्यानेंच बाल्यावस्थेंतील या राष्ट्रानें कला, क्रीडा, साहित्य आणि संशोधन या चारहि क्षेत्रांत अतुलनीय कामगिरी बजावली आहे. वॉशिंग्टनमध्यें मीं पाऊल टाकलें आणि अमेरिकेच्या या राजधानीची रचना पाहून मी स्तिमित झालों. या शहराची सारी रचना आखीव आहे. इतकी

आखीव कीं घरचा पत्ता नीट ठाऊक असला तर कोणालाहि न विचारतां अचूक मुक्कामाला पोंचावें. एकेक अव्हेन्यू भव्य आणि मैल न् मैल सरळ रेषा काढावी तसा आखलेला. पण या ॲव्हेन्यूवरून जातांना एकीकडे मानवनिर्मित शिल्पकलेचे उत्कृष्ट नमुने आढळतात आणि त्याच वेळीं निसर्गाशीं तादात्म्य निर्माण करणारी सौंदर्यस्थळेंहि ठायींठायीं विखुरलेलीं दिसून येतात. आधुनिक जीवनांतील साऱ्या कृत्रिम सुखसोयींची लयलूट चाखीत असतांनाहि अमेरिकन माणूस निसर्गाला पारखा झाला नाहीं; उलट त्याला निसर्गाचें इतकें वेड कीं राजधानीच्या अगदीं गाभाऱ्यांत प्रवेश करीपर्यंत आपण एखाद्या घाटमाथ्यावरून किंवा गर्द झाडींतून तर चाललों नाहीं ना असा संभ्रम मनांत उत्पन्न व्हावा.

वॉशिंग्टनबद्दल माझ्या मनांत जी कल्पना तरळत आहे ती आधुनिक औद्योगिक शहराची नव्हेच. मी तर त्याला एक निसर्गसुंदर उपनगरच म्हणेन. शहराच्या निरनिराळ्या भागांतून हिंडतांना क्षणभर मला वाटे, आपण नव्या दिल्लीच्या रस्त्यांतूनच जात नाहीं ना ? कोठेंहि पाहावें तेथें हिरवीगार झाडी दिसे. शहराच्या बाजूनें वाहणाऱ्या नदीचें स्वरूपहि असें कीं जणूं कांहीं हृषिकेषजवळच्या गंगेचें अवखळ रूपच आपण पाहत आहों. त्या नदीच्या प्रवाहाला त्यांनीं कलाटणी दिली नसेल असें नव्हे. पण तें करतांना नदीचें निसर्गदत्त रूप अणुमात्रहि बिघडूं नये याची त्यांनीं कसोशीनें काळजी घेतली आहे. म्हणून शहराच्या जवळपासच्या विभागांत जशीं जंगलें दिसतात तसाच नदीचा प्रवाह खळखळून वाहत असलेलाहि आढळून येतो. तेथेंच स्त्रिया आणि पुरुष सुट्टीच्या दिवसांत जलक्रीडेसाठीं जातात. शहरापासून फार तर पांच-चार मैलांचें तें अंतर असेल. पण तेथील वातावरण इतकें निःस्तब्ध असतें कीं शहराच्या गलबल्यापासून फार फार दूर अशा एकान्त स्थळीं आपण आलों आहों असा भास व्हावा. त्या शांततेचा भंग होत असेल तर खडकांवर आदळणाऱ्या पाण्याच्या प्रवाहामुळें किंवा आस-

पासच्या निविड झाडींत चिवचिवणाऱ्या पाखरांच्या किलबिलाटामुळें. निसर्गाचें सान्निध्य हें वॉशिंग्टनचें एक मोठेंच वैशिष्ट्य मानावें लागेल.

आणि हीं एकान्तस्थळें हें वॉशिंग्टनमधील तरुण जिवांचें तेवढेंच मोठें आकर्षण आहे. अर्थात् ज्या तरुण-तरुणींना एकान्त हवा असेल त्यांनीं शहरापासून इतक्या जवळच्या ठिकाणींच गेलें पाहिजे असें नव्हे. अंतर या शब्दाला अमेरिकेंत महत्त्वच राहिलेलें नाहीं. सर्वसाधारणपणें प्रत्येक माणसापाशीं भव्य आणि वेगवान् गाडी असल्यामुळें शें–दोनशें मैलांच्या प्रवासाचें त्यांना कांहींच वाटत नाहीं. माझ्या एका अमेरिकन मित्रानें एका विशिष्ट हॉटेलांतील कॉफी पिण्यासाठीं मला एके दिवशीं ऐशीं मैल दूर नेलें. एकंदर दीडशें मैलांचा तो प्रवास आम्ही फक्त दोन कप कॉफीसाठीं केला. शिवाय गांवोगांव आणि रानोमाळांतहि तेथें 'मोटेल्स' उघडण्यांत आलेलीं आहेत. या 'मोटेल्स' चें मला मोठें कौतुक वाटलें. कोणाहि पांथस्थाला यांत खोली भाड्यानें घेतां येते. त्याची आगाऊ वर्दीहि द्यावी लागत नाहीं. आणि तेथें गेल्यावर कोणाला नांवहि नोंदवावें लागत नाहीं. सहज जातांजातां आपण एखाद्या उपाहारगृहांत शिरावें त्याप्रमाणें या मोटेल्सच्या खोलीसमोर आपली गाडी उभी करावी आणि ठराविक पैसे भरून ती खोली ताब्यांत घ्यावी. शहराच्या गर्दीला कंटाळलेले बरेच लोक या मोटेल्सना उदार आश्रय देत असतात. येथें पिकनिकसाठींहि लोक येतात.

अमेरिकन सामाजिक जीवनांत तरुणतरुणींना खूपच स्वातंत्र्य आहे. या स्वातंत्र्याचा अर्थातच थोडाफार दुरुपयोगहि केला जातो. विशेषतः अगदींच लहान वयांतील मुलींना कांहीं कळूं लागण्यापूर्वींच जें स्वातंत्र्य देण्यांत येतें त्यामुळें त्यांच्या जीवनाला अनिष्ट वळणहि लागतें. तरुणवर्गांतील या वाढत्या अनाचाराबद्दल अमेरिकेंतील शिक्षणतज्ज्ञ आणि विचारवंत विचारहि करूं लागले आहेत. सामाजिक सुस्थिति आणि मनःपूत स्वातंत्र्य यांचा संयोग झाल्यानंतर अशा तऱ्हेचे प्रश्न निर्माण होणें साहजिकच आहे. एक विचारवंत

याविषयींच बोलतांना मला म्हणाला, "आधिभौतिक प्रगतीचा आम्ही उच्चांक गाठला आहे. आतां आम्हांला गरज असेल तर ती आध्यात्मिकतेची."

अमेरिकेमध्यें धार्मिक पुनरुज्जीवनाची जी लाट उसळलेली दिसत आहे तिचें तरी कारण हेंच होय. आधींच अमेरिकेचा पिंड साधारणपणें धार्मिकच आहे. त्यांत ऐहिक सुखसर्वस्व मिळाल्यामुळें अमेरिकन मनाला उच्च आणि पवित्र अशा विचारप्रवाहांबद्दल अधिकच ओढ वाटूं लागली आहे. त्यांतूनच त्यांना मनःशांति लाभते. निदान ती लाभण्यासाठीं तरी ते धर्म आणि आध्यात्मिकता यांकडे वळतात. शिवाय कम्युनिझम हा नास्तिकवादी असल्यामुळें त्याची प्रतिक्रिया म्हणूनहि अमेरिकन लोक धर्माची कांस धरतात. बिली ग्रॅहॅम यांच्यासारख्या प्रचारकांचें जें अमेरिकेमध्यें स्तोम माजलेलें दिसून येतें तें त्याचमुळें होय. भोळ्या, भाविक, अमेरिकन मनाला कांहीं तरी दिलासा हवा असतो. बिली ग्रॅहॅम त्याला ख्रिस्ताची आठवण करून देतो एवढेंच नव्हे तर आजच्या जगांतहि ख्रिस्तभक्ति कांहीं चमत्कार घडवून आणूं शकेल असें त्याला आश्वासन देतो. अमेरिकन लोक इतर धर्मांतील लोकांचेंहि तितक्याच आतुरतेनें ऐकून घेतात. एक अमेरिकन प्राध्यापक मला म्हणाला, "भारतीय संस्कृतीबद्दल अमेरिकेंत जेवढी आस्था तुम्हांला दिसून येईल तेवढी दुसऱ्या कोणत्याहि परकीय देशांत दिसून येणार नाहीं." वॉशिंग्टनमध्यें एका राजविलासी भागांत एक सुंदर मशीद उभारण्यांत आली आहे. इजिप्त, इराण वगैरे देशांच्या वकिलातींनीं मिळून ही मशीद बांधली. तिचें उद्घाटन खुद्द आयसेनहोअर यांच्या हस्तें झालें. ही मशीद पाहण्यासाठीं जेव्हां मी गेलों तेव्हां अमेरिकन लोकांची तेथें रीघ लागलेली मला दिसून आली. मी त्यांच्यापैकीं कांहीं लोकांना विचारलें, "तुम्हांला या मशिदींत आकर्षण कां?" त्यांनीं लगेच उत्तर दिलें, "एक धर्ममंदिर म्हणून आम्हांला हें स्थान प्रिय आहे. जगांतील सर्व धर्मांच्या लोकांचीं मंदिरें आमच्यासमोर आदर्श म्हणून असावींत असें आम्हांला वाटतें."

अमेरिकन लोकांना कशांत आकर्षण वाटेल याचा नियम नाहीं. फिलाडेल्फियाच्या म्युझियममध्यें मी गेलों तेव्हां त्या लोकांच्या म्हणण्याची सत्यता मला पटून आली. त्या म्युझियममध्यें जगांतील सर्वश्रेष्ठ कलाकृति आणि जगांतील सर्व दुर्मिळ वस्तू ठेवण्यांत आल्या आहेत. पण मी आश्चर्यानें थक्क झालों तो त्या म्युझियममध्यें जेव्हां मला एक शिवमंदिर आढळलें तेव्हां. पण शिवमंदिरच कां? त्याच्याच शेजारीं एक बुद्धमंदिरहि ठेवण्यांत आलें आहे. ठेवण्यांत म्हणजे अक्षरशः ठेवण्यांत आलें आहे. म्हणजे शिवमंदिराचा आणि बुद्धमंदिराचा प्रत्येक दगड न् दगड हिंदुस्थानांतून आणून या म्युझियममध्यें त्या मंदिराची उभारणी करण्यांत आली आहे. त्यावरून हें वस्तुसंग्रहालय केवढें मोठें असेल याची तुम्हांला कल्पना करतां येईल. आणि अमेरिकन लोकांच्या कामांत कोठेंहि अर्धवटपणा असणार नाहीं. परिपूर्ण असें शिवमंदिर मला तेथें आढळलें. त्यांत मूर्ति होत्या, घंटा होती व मंदिराचें सारें वैशिष्ट्य तेथें यथार्थपणें मांडलेलें होतें. इतक्या काटेकोरपणें कीं कदाचित् आपल्या मंदिरांतच त्याची उणीव भासली तर न कळे.

पण मी कोठेंतरीच वाहवत चाललों आहें. माझ्या सांगण्याचा उद्देश एवढाच कीं अमेरिकेंत भक्तिभावाचा सुकाळ आहे. आणि तेथील तरुणवर्गांत सुस्थितीमुळें जे प्रश्न निर्माण होत आहेत त्यामुळें तर धर्माकडे तेथील लोकांचा अधिकच कल होऊं लागला आहे. पण धार्मिकतेच्या प्रसारानें वा आध्यात्मिकतेच्या ओढीनें हे प्रश्न सुटतील काय? कोण जाणे! त्यावर मत देण्याचा मला काय अधिकार? पण मला मात्र असें वाटतें कीं, मोटारी आणि मोटेल्स यांच्यावर थोडेंफार नियंत्रण ठेवणें हा तरुणांना बंधनांच्या पलीकडे जाण्यापसून परावृत्त करण्याचा एक मार्ग होऊं शकेल. वॉशिंग्टनसारख्या शहरांतून हिंडतांना किंवा कांहीं अमेरिकन कुटुंबांत राहात असतांना कोवळीं मुलें व मुली मोटारी चालवीत असलेल्या मीं पाहिल्या. त्या इतक्या लहान वयांत खुलेपणानें भेटीगाठी घेणेंच नव्हे तर पिकनिकसाठीं दूर जाऊन राहाणें यालाहि

त्यांना परवानगी असते. स्वतःच मोटारी चालवीत असल्यामुळें आणि मोटेल्ससारख्या ठिकाणीं त्यांना एकान्ताची सोय मिळत असल्यामुळें त्यांचें पाऊलहि प्रसंगीं वाकडें पडणें शक्य असतें. मला आश्चर्य वाटलें तें असें कीं अमेरिकन पालक आपल्या मुलांच्या सर्वांगीण विकासासाठीं झटतांना दिसतात, त्यांच्या अभ्यासांत लक्ष घालतात, त्यांच्या शारीरिक व मानसिक विकासासाठीं कसोशीनें प्रयत्न करीत असलेले दिसतात, पण कोवळ्या, अपरिपक्व मुलांना मोहप्रसंगांपासून अलिप्त ठेवण्याच्या बाबतींत मात्र ते फारशा जबाबदारीनें वागतांना दिसत नाहींत. अर्थात् ते जें स्वातंत्र्य देतात तें सद्हेतूनें. त्यांना असें वाटतें कीं मुलें-मुली आहेत, त्यांच्या जीवनांत आपण हस्तक्षेप करणें बरें नाहीं. उलट आपल्या मुलीनें 'डेट' घेतली नाहीं तर तिच्यांत उणीव राहील असेंहि त्यांना उत्कटपणें वाटतें. अमेरिकेंतील मुलें या स्वातंत्र्याचा सर्रास दुरुपयोग करतात असेंहि नव्हे. पण कोवळ्या वयांतील मुलांची गुन्हेगारी तेथें वाढत चालली आहे हें मात्र नाकबूल करून चालणार नाहीं. तिला आळा घालण्यासाठीं स्वातंत्र्याला थोडीशी मर्यादा घालणें अपरिहार्य आहे.

एका शिक्षणतज्ज्ञानें त्याच दृष्टीनें मला सांगितलें कीं, "चवदा पंधरा वर्षांच्या मुलांमुलींना स्वतंत्रपणें मोटारी चालविण्याचा मनाई केली आणि अविकसित अवस्थेंतील त्या मुलांच्या वागणुकीवर पालकांनीं देखरेख ठेवली तर बऱ्याच मुलांमुलींच्या जीवनाचें नुकसान होण्याचें टळेल."

मीं त्यांना म्हटलें, "आणखी एका गोष्टीला तुम्ही कटाक्षानें मनाई केली पाहिजे, आणि ती म्हणजे वेळींअवेळीं चाकोलेट चघळणें ही होय."

"कां बरें?" त्यांनीं आश्चर्यानें मला विचारलें.

"त्याचें असें आहे—" मी शांतपणें म्हणालों, "नीतिमत्ता सुधारण्याचा प्रश्न अगदींच मर्यादित आहे. पण दांत सुधारण्याचा प्रश्न मात्र तुमच्याकडे सार्वत्रिक स्वरूपाचा आहे."

तो शिक्षणतज्ज्ञ मनापासून हसला आणि लगेच आपल्या हातांतील चाकोलेट फेकून देत मला म्हणाला, "माझ्यापासून सुधारणेची सुरुवात करूं या, नाहीं का ?"

अमेरिकेंतील लोकांना चॉकोलेटचें विलक्षण वेड आहे. मला तर वाटलें, एक चाळा म्हणूनच ते चॉकोलेट चघळीत असावेत. एकदां न्यूयॉर्कच्या भोंवतीं बोटीनें मी एक फेरी मारली. सारी बोट उतारूंनीं भरली होती. अशी फेरी मारणें हा तेथील एक नैमित्तिक क्रम आहे. लोक हौसेनें बोटींत बसतात आणि त्या वेळीं खाण्यापिण्याची त्यांच्यापाशीं जय्यत तयारीहि असते. पण त्यांत खरा भर असतो चॉकोलेटवर. अमेरिकन व्यक्तीचें चित्र माझ्या डोळ्यासमोर आलें म्हणजे चॉकोलेट चघळीत असलेला त्याचा भाबडा चेहराच मला दिसतो.

बोटींत बसल्याबसल्या मी न्यूयॉर्कचें सारें वैभव पाहत होतों. एखाद्या चलचित्रपटाप्रमाणें न्यूयॉर्कचा एकेक भाग माझ्या डोळ्यांसमोरून सरकत होता. ही एम्पायर स्टेट बिल्डिंग. जगांतील सर्वांत उंच इमारत. त्याच्याच शेजारीं पण जवळजवळ तीन मैल दूर असलेली आर्. के. ओ. इमारत. या इमारतीच्या अठ्ठ्याहत्तराव्या मजल्यावर प्रेक्षकांच्या सोयीसाठीं एक गॅलरी काढण्यांत आली आहे. तेथून न्यूयॉर्कची जी शोभा दिसते तशी दुसऱ्या कोठूनहि दिसणार नाहीं. मात्र त्यासाठीं दीड डॉलरची किंमत द्यावी लागते. पण आकाशांतील ढगांशीं, उघड्या माथ्यानें सामना देण्याचें जें सुख आपल्याला मिळतें त्या मानानें ही किंमत कांहींच नव्हे. ढगांच्या वर प्रत्यक्षपणें उभे राहून खालच्या मानवसमाजाकडे दृष्टि टाकली कीं जें दृश्य दिसतें तें पाहून मन स्तिमित होऊन जातें. क्षणभर वाटतें, या मोटारी खेळण्यांतील तर नव्हेत ? आणि हीं माणसेंच का खरीं ? मुंग्यांची रांगच जणूं आखीव रस्त्यानें चालली आहे. लिलिपुटमधील माणसें कशीं दिसत असतील त्याची कल्पना या दृश्यावरून येते. पण याच आकाशाला भिडणाऱ्या इमारती बोटींतून पाहिल्या कीं

त्याच चित्रांत काढल्यासारख्या वाटतात—आखीव कापलेल्या इमारती, एकापेक्षां एक सरस. मला आठवण झाली ती महाबळेश्वरावरील ऑर्थर पॉइंटची. तेथून सह्याद्रीचें जें दर्शन घडतें तें अशाच प्रकारचें. कापलेले कडे–निरनिराळ्या आकारांचे तेथून दिसतात. या मानवनिर्मित इमारतींएवढेच. एक दृश्य भव्योदात्त, दुसरें चमत्कृतिपूर्ण.

आमची बोट संयुक्त राष्ट्रसंघटनेच्या इमारतीपुढें आली तेव्हां तर या चमत्कृतीनें मन अगदीं दिपून गेलें. उंचच्या उंच तीस मजली इमारत आहे ही; जणुं एक भिंतच उभी करावी तशी दुरून दिसते. वाटतें, तिला धक्का दिला तर पत्त्यांच्या बंगल्याप्रमाणें कोसळून पडेल. शिल्पकलेचा हा नमुना कांहीं अपूर्वच. पण प्रत्यक्ष आवारांत गेलें कीं जादूचा दिवा उघडावा आणि आंतील भव्य प्रासाद दिसावा तसें वाटतें. आतां एक विटेची भिंत राहत नाहीं ती. त्यांत अनेक दालनें आहेत. असंख्य खोल्या आहेत. भव्य सभागृह आहे. एकेका दालनांत पाऊल टाकावें आणि तेथील चककीत फरशी आणि अद्ययावत् साधानांनीं नटवलेल्या कचेऱ्या पाहिल्या कीं डोळे निवून जातात. त्यांत साधेपणा आहे. पण विलक्षण कलात्मकता आहे. आधुनिक शिल्पकलेचा आदर्श कोणता असें मला कोणी विचारलें तर मी त्या इमारतीकडे बोट दाखवीन.

पण असें किती वर्णन करूं ? अमेरिकेंत अशीं असंख्य रम्य स्थळें आहेत, अशा अनंत रम्य कलाकृति आहेत. न्यूयॉर्क हें त्यांतल्या त्यांत अधिक परिचित स्थळ. म्हणून त्याचें कौतुक मला अधिक वाटलें. जगांतील सर्वांत उंच इमारत येथील. जगांतील सर्वांत सधन बाजारपेठ म्हणजे वॉलस्ट्रीट हीहि येथील. नदीच्या पृष्ठभागाखालून जाणारे टनेलसहि येथलेच. आणि मला वाटतें, ब्रॉडवेमध्यें जी दररोज रोषणाई होते तशी जगांतील कोणत्याहि ठिकाणीं होत नसेल.

पण न्यूयॉर्कचें सारेंच जीवन उजळलेलें आहे असें नव्हे. ज्यांना ‘ स्लम्स ’

म्हणतात तशाहि न्यूयॉर्कमध्यें वस्त्या आहेत. विशेषतः हार्लेम हा जो नीग्रो वस्तीचा भाग आहे, त्यांत पाऊल टाकलें म्हणजे एका नव्या जगांत प्रवेश केल्यासारखें आपल्याला वाटतें. अमेरिकेच्या धवल यशाला मलिनता आणणाराच हा भाग आहे. मी तेथें पाऊल टाकलें आणि मला वाटलें, आपल्या स्वप्नसृष्टीचा भंग झाला. आतां पुन्हा आपण भूमितलावरून चालूं लागलों आहों.

हार्लेम—न्यूयॉर्कमधील नीग्रो वस्तीचा हा विभाग. या विभागांतच इंडिया—पाकिस्तान उपाहारगृह आहे. त्या उपाहारगृहांत जेवण्यासाठीं मी गेलों तेव्हां हिंदुस्थानांतील एखाद्या दरिद्री उपाहारगृहांत पाऊल टाकल्यासारखेंच मला वाटलें. तितकीच स्वच्छता तेथें होती आणि जेवण्यासाठीं तेथें आलेल्या लोकांत नीग्रो लोकांचाच अधिक भरणा होता.

नीग्रो विभागाला ही माझी पहिलीच भेट नव्हती. डेट्रॉइटमध्यें मुद्दाम मी नीग्रो लोकांपैकीं कांहीं प्रमुखांना भेटावयाला गेलों होतों. त्या वस्तींत मी पाऊल टाकलें आणि समोरच्याच एका पार्कमध्यें अनेक मुलें खेळत असलेलीं

# आब्राहॅम लिंकननीं पेटवलेली ज्योत

मला दिसलीं. त्या मुलांची संख्या मला जाणवली. कारण युरोपीय वस्तींत मुलें दिसलीं तरी अगदींच तुरळक. कुटुंब-नियोजनाचा अभाव मला प्रथम जाणवला तो नीग्रोंच्या वस्तींत. साहजिकच त्या मुलांची राहणी विशेष प्रसन्न नव्हती आणि त्यांत स्वच्छता मुळींच नव्हती. घरासमोरच्या अव्यवस्थित बागेंत, मोडक्या तोडक्या फर्निचरवर बसून तीं खेळत होतीं. त्यांचे कपडेहि फारसे चांगले नव्हते आणि कांहीं मुलें उघडीं-वागडींहि हिंडत होतीं.

डेट्रॉइट आणि शिकागो वगैरे भागांत नीग्रोंची फार मोठी लोकसंख्या आहे व दक्षिणेकडे नीग्रो लोकांविरुद्ध गोऱ्या कातडीच्या लोकांनीं जी मोहीम आंखली आहे त्यामुळें तेथून हजारों नीग्रो लोक निर्वासितहि होत आहेत. त्यांची संख्या इतकी वाढत आहे कीं, शिकागो शहराला हा निर्वासितांचा ओघ थांबविण्याची वेळ आली आहे. वर्णभेदांतून निर्माण झालेल्या त्या संघर्षामुळें शिकागोंतील वातावरणहि तंग होत चाललें आहे. खुद्द नीग्रो लोकांच्या पुढाऱ्यांना आतां अशी भीति वाटूं लागली आहे कीं, गोऱ्या लोकांविरुद्ध नैसर्गिक

प्रतिक्रिया म्हणून नीग्रो लोकांमध्येंहि अत्याचाराच्या भावना कदाचित् प्रकट होऊं लागतील. नीग्रो लोकांचे पुढारी समंजस आणि संयमी आहेत. त्यांना वर्णभेदांतून यादवी युद्ध निर्माण व्हावें असें वाटत नाहीं. त्यांना अमेरिका ही स्वतःची मातृभूमि वाटते आणि मातृभूमीबद्दलचा त्यांचा अभिमानहि ज्वलंत आहे; म्हणूनच क्लुक्स क्लान यांच्यासारख्या अत्यंत प्रतिगामी आणि हिंसावादी अशा एका गोऱ्या संघटनेला प्रतिस्पर्धी अशी नीग्रो संघटना निर्माण होऊं नये म्हणून त्यांचे अहर्निश प्रयत्न चालू असतात. कारण तशी संघटना तयार झाली आणि अत्याचाराला अत्याचारांनीं जबाब दिला जाऊं लागला तर ती गोष्ट नीग्रो लोकांनाच जाचक नव्हे तर अमेरिकेलाहि धोक्याची होईल हें ते जाणून आहेत.

अमेरिकेंतील वर्णभेदाचा प्रश्न ही अमेरिकेपुढील एक फार मोठी समस्या आहे. त्या प्रश्नाचा विचार करूं लागलों कीं मला वाटतें कीं आपल्याकडील अस्पृश्यतेचा प्रश्न हा अगदींच मामुली प्रश्न आहे. त्याचें कारण असें कीं अस्पृश्य हे पिळले जात असले, मागासलेले राहिले असले तरी रंगानें आणि रूपानें, ते बहुसंख्य जनतेपेक्षां वेगळे असे नाहींत. बहुजनसमाजाच्या व त्यांच्या राहणींत व संस्कृतींतहि फारसा फरक नाहीं. म्हणून अस्पृश्यता जशी कायद्यानें दूर करण्यांत आलेली आहे त्याचप्रमाणें वाढत्या शिक्षणाबरोबर ती बहुजनसमाजाच्या मनांतूनहि नाहींशी झाली तर अस्पृश्यांना समाजांत समरस करून घेणें इतकें कठीण होणार नाहीं. हळूहळू अस्पृश्य समाजाची शैक्षणिक, सामाजिक व आर्थिक प्रगति होत चालल्यामुळें तो समाज व इतर समाज यांतील अंतरहि कमी होत चाललें आहे.

अमेरिकेंतील नीग्रो लोक व गोरे लोक हे एकमेकांशीं समरस होण्याच्या मार्गांत मात्र रंगाची, रूपाची, राहणीची, संस्कृतीची अशी प्रत्येक अनुल्लंघनीय अडचण आहे. दोन भिन्न जगांचे हे रहिवासी परिस्थितीमुळें एकत्र आले आहेत एवढेंच. सांस्कृतिक दृष्टीनें तर त्यांच्यामध्यें कांहीं शतकांचें

अंतर पडलें आहे. म्हणून अमेरिकेंत—उत्तर आणि दक्षिण अशा दोन्ही भागांत—जरी प्रगतिपर विचारसरणीच्या लोकांचा फार मोठा प्रभाव पडला तरी या दोन्ही लोकांचें एक कुटुंब होणें, त्याच्यामध्यें एकरूपता निर्माण होणें अवघड आहे.

या दोघांतील ही मूलभूत भिन्नता ध्यानीं घेतली तर मात्र ही कठीण समस्या सोडविण्यासाठीं अमेरिकेंतील लोकांनीं जे प्रयत्न चालविले आहेत त्यांबद्दल कौतुक वाटल्यावांचून राहाणार नाहीं. प्रथम एक गोष्ट लक्षांत ठेवली पाहिजे कीं, अमेरिकेंतील नीग्रो लोकांना गुलामगिरींतून मुक्त करण्यासाठीं जे झटले ते गोरे लोकच. आब्राहॅम लिंकननें मानवतेच्या दृष्टिकोणांतून हा प्रश्न हाताळला. त्यानें मानवतेला जें आवाहन केलें, त्याचे पडसाद साऱ्या अमेरिकेंत उठले. त्यांतून दक्षिण व उत्तर भागांत यादवी युद्ध निर्माण झालें. सहस्रावधि लोकांची त्या युद्धांत आहुति पडली. पण लिंकननें प्रगतिशीलतेची जी ज्योत पेटविली ती पुढें कधींहि विझली नाहीं. तेव्हांपासून अमेरिकेंतील गोऱ्या लोकांत अधिकाधिक जागृति होत गेली आणि नीग्रो लोकांना सामाजिक हक्क मिळावे, आर्थिक समानता मिळावी, मानवतेची वागणूक मिळावी म्हणून झटण्यासाठीं गोऱ्या लोकांतीलच प्रगतिपर विचारसरणीचे लोक पुढें येऊं लागले.

आज परिस्थिति अशी आहे कीं अमेरिकेंतील नीग्रो लोकांना पूर्ण आर्थिक समानता मिळालेली आहे, कोणत्याहि कारखान्यांत नीग्रोला काम करण्यास मज्जाव नाहीं. गोऱ्या व नीग्रो कामगाराच्या मजूरींतहि अणुमात्रहि फरक करण्यांत येत नाहीं. अमेरिकेच्या औद्योगिक व सामाजिक जीवनांत नीग्रो लोकांना समानतेचें इतकेंच नव्हे तर समान मानाचें स्थान आहे. कायदेशीर दृष्टीनें नीग्रो मुलांना कोणत्याहि शाळेंत प्रवेश नाकारतां येत नाहीं. अमेरिकेच्या सुप्रीम कोर्टानें याबाबतींत जो निर्णय दिला आहे तो अमेरिकेच्या दृष्टिकोनाचा निदर्शक मानतां येईल.

आतां प्रश्न असा आहे कीं या निर्णयांची अंमलबजावणी कशी होणार ? दक्षिणेंतील लिटल रॉक या विभागांत जेव्हां कित्येक प्रतिगामी गोऱ्या लोकांनीं नीग्रो मुलांना प्रवेश मिळूं देण्याला बंदी केली तेव्हां अमेरिकन सरकारनें आपली सारी नैतिक शक्ति आणि फौजदारी सामर्थ्य त्या निर्णयामागें उभें केलें. लिटल रॉकमध्यें घडलेले प्रकार जितके गर्हणीय आहेत तितकीच आयसेनहोअर-सरकारनें केलेली उपाययोजना अभिमानास्पद आहे. डेट्रॉइट-मधील कांहीं नीग्रो पुढाऱ्यांनींच माझ्यापाशीं उद्‌गार काढले कीं: "आयसेनहोअर यांच्या राजवटींत आम्हांला जेवढें संरक्षण मिळालें तेवढें पूर्वी कधींहि मिळालें नसेल. नीग्रो लोकांना समानता मिळवून देण्याच्या दृष्टीनें गेल्या पंचवीस वर्षांत फार मोठी कामगिरी करण्यांत आली आहे. तिच्या-मुळेंच आम्हांला अधिक आत्मविश्वास वाटूं लागला आहे."

ही आत्मविश्वासाची भावना उत्तर विभागांतच प्रामुख्यानें दिसून येते. कारण तेथें वर्गभेद सामाजिक जीवनांत दिसून येत नाहीं. शाळा, कॉलेजें, होटेल्स यांत नीग्रो लोकांना येथें मुक्तद्वार आहे. मोठमोठ्या अधिकाराच्या जागाहि निग्रो लोक येथें भूषवीत असलेले दिसतात. उदाहरणार्थ, मॅनहॅटन हा विभाग तर अमेरिकेंतील सर्वांत सधन विभाग होय आणि त्या विभागाचा मेयर एक निग्रो आहे. त्याच्या भेटीला मी गेलों तेव्हां त्यानें मला सांगितलें, "विचार करण्यासारखी गोष्ट आहे ती अशी कीं, नीग्रोप्रश्नांत प्रगति होत आहे कीं परागति ? आणि माझें मत असें आहे कीं एकंदर अमेरिकन समाजाचा दृष्टिकोनच या बाबतींत बदलत चालला आहे. आमच्या प्रश्नाकडे आतां सर्वचजण सहानुभूतीनें पाहूं लागले आहेत. तेव्हां दक्षिणेंत कोठें अनुचित प्रकार घडला म्हणून आम्ही एकदम भावविवश होऊन चालणार नाहीं. प्रवृत्ति कोणत्या दिशेनें आहे तें पाहून आपण या प्रश्नांकडे पाहिलें पाहिजे. अर्थातच ही प्रवृत्ति प्रगतीच्या दिशेनें आहे, हें मी येथें बसत आहें यावरूनच सिद्ध होत नाहीं काय ?"

कालांतरानें प्रगतिपर विचारसरणीचें हें लोण दक्षिणेपर्यंत पोचेल अशी नीग्रो लोकांनाहि श्रद्धा वाटत आहे. त्यांच्यापैकीं जे पुढारलेले लोक आहेत त्यांना आर्थिक सुबत्ता आणि मानसन्मान दोन्हीहि भरपूर प्रमाणांत प्राप्त होत आहेत. मी कित्येक नीग्रो लोकांना कॅडिलॅक गाड्यांतून जातांनाहि पाहिलें. अमेरिकेंतील सर्वोत्कृष्ट हॉटेलांत नाचगाण्यासाठींहि ते जातात. तेथें समाजांतील वरच्या थराशींहि ते समरस झालेले आहेत. पण त्याचा एक परिणाम असा होत आहे कीं नीग्रो लोकांतील वरिष्ठ वा यशस्वी लोक त्यांच्यांतील बहुजनसमाजापासून अलग होत असलेले दिसत आहेत.

पुढेंमागें नीग्रो प्रश्न त्यामुळेंहि अधिक गुंतागुंतीचा होण्याचा संभव आहे. कारण नीग्रो समाजाला योग्य वळण देणारें नेतृत्व जर अधिकाराच्या आमिषांत गुरफटत गेलें आणि गोऱ्या लोकांशीं आपल्याला समरस होतां येतें याच आनंदांत ते गर्क राहिले तर नीग्रो बहुजनसमाज मात्र अविवेकी लोकांच्या हातीं जाईल आणि नीग्रो लोकांच्या चळवळीलाहि एक अनिष्ट वळण लागेल. नीग्रो नेते आणि नीग्रो बहुजनसमाज यांच्यामध्यें आचार-विचारांची भिन्नता निर्माण होत असल्याचें माझ्या अनेक ठिकाणीं निदर्शनास आलें. हे नेते अधिक संपन्न आहेत असें नव्हे. पण त्यांना गोऱ्या समाजांत प्रवेश मिळाल्यामुळें त्यांच्या अचारावर त्या समाजाची छाप पडूं लागली आहे. त्यांची जीवनपद्धति आणि आशाआकांक्षा याहि बदलत चालल्या आहेत. सहाजिकच कुटुंबनियोजन करणें त्यांना अपरिहार्य वाटतें. त्यामुळें त्यांची रहाणी सुधारत जाते आणि स्वच्छता, टापटीप इतकेंच नव्हे तर थोडा ऐषआराम ही त्यांना जीवनाची एक आवश्यकता वाटूं लागते. तसें नीग्रो बहुजनसमाजाचें नाहीं. त्यांच्यापैकीं बहुतेक लोक आर्थिक दृष्टीनें सुधारलेले आहेत. त्यांच्याहि दारासमोर मोटारगाडी उभी असते. पण त्यांचें कुटुंबहि मोठें, आणि सुसंस्कृत जीवनाचा त्यास संपर्क नसल्यामुळें त्यांच्या राहणींत आवश्यक ती सुधारणा घडून येत नाहीं.

त्यांतूनच न्यूनगंडाची भावना निर्माण होते आणि गोऱ्या लोकांच्या जीवन-मानाविषयीं एक प्रकारची कटुता त्यांच्या मनामध्यें निर्माण होते. मग आपल्याला जें मिळत आहे त्याचा विचार न करतां जें मिळत नाहीं किंवा जाणूनबुजून जें दिलें जात नाहीं त्याबद्दल आकसाची भावना त्यांच्यामध्यें जागृत होते आणि गोऱ्या लोकांपासून ते विचारानें आणि मनानें अधिकच दुरावले जातात.

हार्लेममध्यें गेल्यानंतर आणि तेथील नीग्रो लोकांशीं बोलल्यानंतर मला नीग्रो लोकांच्या अंतकरणांत सलत असलेल्या या शल्याची पुरेपूर जाणीव झाली. ते मला म्हणत, "आमची आर्थिक परिस्थिति सुधारली आहे खरी; पण आम्ही झगडून त्या परिस्थितींत सुधारणा घडवून आणली आहे. त्याचें श्रेय गोऱ्या लोकांना आम्ही कां देऊं? आम्हांला सामाजिक दर्जा ते कोठें देतात? आमच्या वस्त्या वेगळ्या ठेवल्या आहेत. त्यांच्या विभागांत आम्हांला राहावयालाहि जागा मिळत नाहीं. रोटी-बेटी व्यवहारहि ते कटाक्षानें टाळतात. एकजीव समाज निर्माण करण्याची ही रीत नव्हे. आम्हांला आर्थिक स्वातंत्र्य आहे. घटनेनुसार आम्हांला हक्कहि मिळाले आहेत. पण त्यांच्या दृष्टींत आम्हांला एक प्रकारची तिरस्काराची, अलिप्ततेची भावना दिसते. आमच्याशीं ते बोलतात. पण किती गुर्मींत! आम्ही 'निगर' आहोंत, कोणीतरी क्षुद्र आहोंत असा आविर्भाव त्यांच्या चर्येवर कोरलेला आम्हांला दिसतो."

त्यांचें म्हणणें बऱ्याच अंशीं खरें आहे. एका नीग्रो नेत्यानें दक्षिणेंतील आपला अनुभव मला सांगितला. त्या नेत्यानेंच नीग्रो लोकांना बसमध्यें मिळणाऱ्या वागणुकीविषयीं निषेध व्यक्त करण्यासाठीं बसेसवर बहिष्कार घालण्याची चळवळ पुकारली होती. तो म्हणाला, "हा सवाल माणुसकीचा आहे. बसमध्यें मी शांतपणें बसलों असतांना एका गोऱ्या स्त्रीनें मला बसमधून खालीं उतरावयास सांगितलें. ती म्हणाली, 'या

निगरबरोबर मी बसमधून प्रवास करणार नाहीं.' मी माणुसकीच्या भावनेनें त्या अत्याचाराचा प्रतिकार केला. माझें सारें स्वत्व त्या क्षणीं नाहींसें होत आहे असें मला वाटलें. मानवी इभ्रतीला धक्का पोचविणारा हा अपमान आहे.''

अशा अपमानाच्या कहाण्या जोंवर नीग्रो लोकांच्या कानीं येतील तोंवर त्यांना कितीहि आर्थिक सुस्थिति मिळाली आणि इतर हक्क मिळाले तरी त्यांच्या मनांतील किंतु नाहींसा होणार नाहीं. खरें सांगावयाचें तर 'लिटल रॉक' मध्यें इतका मोठा संघर्ष झाला, इतकी तणातणीची परिस्थिति निर्माण झाली पण तेथें एकहि खून झाला नाहीं किंवा जाळपोळ झाली नाहीं हें खरें आहे. पण स्वाभिमान डिवचला जाणें याच्याइतका अपमान दुसरा कोणताहि नाहीं. अमेरिकेंतील नीग्रो लोकांचीं अंतःकरणें दक्षिणेंतील तुरळक तुरळक अशा ठिकाणीं घडून येणाऱ्या या प्रकारच्या विटंबनेमुळें विद्ध झालेलीं आहेत. अमेरिकेच्या उज्ज्वल यशाला मलिनता आणणारी ही परिस्थिति आहे आणि पुरोगामी जगांत अमेरिकेच्या इभ्रतीला कमीपणा येऊं नये म्हणूनच नव्हे तर ज्या कम्युनिस्टांचा प्रतिकार करण्यासाठीं अमेरिका आपलें सर्वस्व पणाला लावूं पाहत आहे त्यांच्या हातीं अमेरिकेविरुद्ध प्रचार करण्यासाठीं एक अमोघ हत्यार मिळूं नये म्हणूनहि अमेरिकेंतील पुरोगामी लोकांनीं वर्णभेदांतून निर्माण होणाऱ्या या संघर्षांचीं पाळेंमुळें खणून काढलीं पाहिजेत. नीग्रो-प्रश्नानें निर्माण केलेली समस्या अमेरिका कोणत्या पद्धतीनें आणि किती थोडक्या काळांत सोडविते त्यावरच सुसंस्कृत जगांतील अमेरिकेचें स्थान अवलंबून आहे. अमेरिकेची खरी कसोटी त्याच प्रश्नाच्या सोडवणुकीवर तावून सुलाखून निघणार आहे.

तथापि, अमेरिकेंत जाणाऱ्या हिंदी लोकांनीं नीग्रो-प्रश्नावर अमेरिकेला डिवचण्याचें वा हिणविण्याचें कारण आहे असें मला वाटत नाहीं. नुकतेंच एका इंग्रज इसमाशीं या प्रश्नावर माझें बोलणें झालें त्यावेळीं तो मला एकदम

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रमांक २५४५१ वि: भू-प्रवास
नों: दि: २४/३/६०


म्हणाला, "तुम्ही लिटल् रॉकचा नेहमीं उल्लेख करतां. पण तेथें मनुष्यहानि किंवा वित्तहानि मुळींच झाली नाहीं. उलट तुमच्या येथील रामनाथपुरम्च्या दंगलींत किती लोक मारले गेले याचा तुम्ही कधीं विचार करतां का? त्याच्याच बरोबर सुमारें तीस हजार घरांची तेथें जाळपोळ झाली याहि गोष्टीकडे लक्ष देणें आवश्यक नाहीं का?"

भारतांतील एका नाजुक प्रश्नावर त्या इंग्रजानें बोट ठेवलें खरें. त्या दोनहि प्रकरणांचा विचार करतां मला असें वाटलें कीं अमेरिकेंत गेल्यानंतर हिंदी लोक नीग्रो प्रश्नाविषयीं जे बोचक प्रश्न विचारतात आणि अमेरिकेंतील वर्णभेदाबद्दल जो सात्त्विक संताप व्यक्त करतात तो करण्याचा आपल्याला काय खरें अधिकार आहे? काचेच्या घरांत रहाणाऱ्या लोकांनीं दुसऱ्यावर दगड फेकूं नये या म्हणीचा भावार्थ आपण तरी लक्षांत ठेवूं नये काय?

हाच तरतमभाव अमेरिकन जीवनाचें परीक्षण करतांना, विशेषतः त्याविषयीं आपलें मत व्यक्त करतांना ठेवणें आवश्यक आहे असें माझें प्रांजळ मत आहे. अमेरिकेबद्दल आपल्याकडे सर्वसाधारणपणें जो गैरसमज पसरलेला दिसून येतो त्यापासून मन अलिप्त ठेवून जर अमेरिकेची पहाणी केली तर त्या देशापासून शिकण्यासारखें फार आहे असें प्रत्ययाला आल्यावाचून रहाणार नाहीं. पण त्यासाठीं मन अहंकाररहित आणि संस्कारक्षम ठेवण्याची मात्र आवश्यकता आहे. हा अहंकार स्वतःबद्दलच असतो असें नाहीं. आपला देश, त्याची परंपरा याबद्दलचा अहंकार हा तर त्याहिपेक्षां ज्वलंत असतो. त्या अहंकाराच्या भावनेनें अमेरिकेकडेच काय पण कोणत्याहि देशाकडे पाहिलें तर देशांतील उणिवा व दोषच फक्त आपल्या नजरेंत भरतील. खरें पाहिलें तर उणिवा व दोष कोणांत नाहींत? गुंतागुंतीचे प्रश्न व समस्या या तर प्रत्येकाच्याच पांचवीला पुजलेल्या असतात. महत्त्वाची गोष्ट विचारांत घेण्यासारखी असते ती ही कीं या उणिवांवर मात

करणारें कांहीं कर्तृत्व त्या देशापाशीं आहे किंवा नाहीं ? अमेरिकेचा विचार मनांत आला की त्या देशाच्या असीम कर्तृत्वाचा सारा चित्रपटच माझ्या डोळ्यांसमोर उभा राहतो. त्या चित्रपटांत अमेरिकन जीवनाचे अनेक पैलू निदर्शनास आलेले मला दिसतात. प्रत्यक्षपणें त्या पैलूंचें दर्शन आणि अनुभव घेतलेला असल्यामुळें साहजिकच तें चित्र मला विलक्षण कल्पनारम्य वाटतें. मग मी क्षणभर डोळे मिटून घेतों आणि त्यावेळीं अमेरिकेंत मिळालेल्या अल्पकालीन पण रोमांचकारी सुखाचा पुनःप्रत्ययच मला मिळाल्यासारखा वाटतो.

अमेरिकेंत जाण्यापूर्वी ब्रिटिश पार्लमेंटच्या एका सभासदानें मला म्हटलें होतें : " It's a wonderful world. " त्या शब्दांची साक्ष अमेरिकेंतील मुक्कामाच्या प्रत्येक दिवशीं मला पटली. खरोखरच अविस्मरणीय असें तें जग आहे. निसर्गसौंदर्यानें नटलेलें, मानवी कर्तृत्वानें बहरलेलें, कलाविकासांत रममाण झालेलें आणि स्वातंत्र्यप्रेमी व उदार अंतःकरणाच्या बहुसंख्य लोकांनीं ओतप्रोत भरलेलें तें जग श्रीमंत आहे म्हणून तें भांडवलदारांचें आहे असें म्हणूं नका. कष्ट करणाऱ्या कामकरी शेतकऱ्यांनींच त्या देशाला संपत्तिमान बनविलें आहे. तें सुखांत आहे म्हणून सुखलोलुप आहे असें मानूं नका. स्वतःच्या स्वातंत्र्यासाठीं त्याच राष्ट्रानें एका प्रबळ साम्राज्यशाहीशीं निकराचा सामना दिला आणि आपल्यांतील गुलाम झालेल्या लोकांच्या शृंखलाहि त्यांतीलच लोकांनीं शर्थीची लढाई करून तोडल्या. गुलामगिरीविरुद्ध झुंज घेणाऱ्या लिंकनच्या वारसदारांचाच हा देश आहे. लिंकनचें रक्तच त्यांच्या अंगांत सळसळत असल्यामुळेंच दोन्ही महायुद्धांत या राष्ट्रानें महनीय कामगिरी बजाविली आणि हेच सुखासीन म्हणून मानले जाणारे लोक आजहि जगांतील प्रत्येक भागांतील दुःख आणि दारिद्र्य यांचें निवारण करण्यासाठीं आपल्या साऱ्या थैल्या मोकळ्या सोडून बाहेर पडत असलेले दिसत नाहींत का ?

अमेरिकन जीवनाचें मला जें क्षणदर्शन झालें त्यांत तेथील लोकांच्या अंतःकरणांतील या भावनांची मला पदोपदीं साक्ष पटली. ती साक्ष माझ्या हृदयावर कोरल्यासारखी झाली आहे. तेथून परतल्याला आज कित्येक दिवस झाले असले तरी अमेरिकेच्या आठवणी आल्या कीं माझ्या मनाला एक प्रकारची हुरहुर लागल्यासारखें वाटतें.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम २६४५१ वि: भू-प्रवास
क्रमांक १७८ नों: दि: २४/३/६०

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
१०७८६

REFBK-0010786